
किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित –

# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

नॅक प्रमाणन ‘ब’ दर्जा



आसूड

# आत्मनिर्भर

## ‘कोव्हिड-१९’ विशेषांक

२०१९-२०

आसूड

# आत्मनिर्भर

## 'कोव्हिड-१९' विशेषांक

२०१९-२०


**मुख्यसंपादक**
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

**संपादक**
उपप्राचार्य डॉ. डी.डी. चौधरी

**संपादक मंडळ**
डॉ. सतीश ससाणे
डॉ. अनिल मुंढे
डॉ. मारोती कसाब
प्रा. अतिश आकडे
प्रा. परमेश्वर इंगळे
श्री पी. वाय. डोंगळीकर


**टीप :** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.


वि द्या र्थी सं पा द क

**मराठी विभाग**
संतोष वैजनाथ सोनकांबळे

**हिंदी विभाग**
ज्ञानेश्वरी व्यंकटराव श्रीरामे

**संस्कृत विभाग**
रिंका नंदकुमार सूर्यवंशी

**इंग्रजी विभाग**
मिस्बा अलिमुद्दीन शेख

**समाजशास्त्र विभाग**
प्रगती गणेशराव पांचाळ

**अर्थशास्त्र विभाग**
पूजा रमाकांत पांचाळ



अक्षर जुळवणी
**अब्दुल अतिख**

**मुखपृष्ठ**
**नयन बाराहाते**

**मुद्रक**
**सतीश कुलकर्णी**
मयूर प्रिंटर्स, कैलासनगर, नांदेड
mayur.ned@gmail.com




'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य घेऊन किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर येथे इ. स. २००० पासून उच्चशिक्षण क्षेत्रात ग्रामीण, गोरगरीब, व संधीपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता युक्त शिक्षण देण्याचे सेवाकार्य अविरतपणे करत आहे.

आमच्या महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूरने किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव,सहसचिव तसेच सर्व मान्यवर पदाधिकारी, महाविद्यालय विकास समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, आणि कल्पक व अनुशासनप्रिय प्राचार्यांच्या नेतृत्त्वाखाली, कार्यसमर्पित असलेले प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी वर्ग, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचा विश्वास या पंचसूत्रीच्या आधारे अल्पकालावधीतच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या कार्यक्षेत्रात गुणवत्तेसह, क्रीडा क्षेत्रात स्वत:चा वेगळा ठसा उमटवला आहे.जो 'फुले पॅर्टन' म्हणून ओळखला जात आहे.

क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, गुणवत्ता विकास विभाग, स्पर्धा परीक्षा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र,या व इतर वेगवेगळ्या विभागातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासह सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला जात आहे. महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विविध कार्यक्रमांच्या द्वारे विद्यार्थ्यांतील संशोधन लेखनासह व्यक्तिमत्त्व विकासाला चालना दिल्या जाते.

विद्यार्थ्यांना 'आसूड' या वार्षिक अंकातून वेगवेगळ्या विषयावर बोलतं करण्याचा, लिहितं करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रतिवर्षी महाविद्यालय वेगवेगळा विषय घेऊन, त्या विषयाची गंभीरता लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना त्या विषयाचे आकलन व्हावे हा हेतू समोर ठेवून अंक प्रकाशित करते. यापूर्वी 'रोख विरहित अर्थव्यवस्था', 'मॅग्नेटीक महाराष्ट्र', 'ज्यांच्या हाती शून्य होते' या विषयांवर संशोधनाला पूरक ठरतील असे अंक प्रकाशित करण्यात आले आहेत.

नोव्हेंबर २०१९ नंतर चीन मधील वुहान मध्ये आढळून आलेल्या 'कोरोना' साथीचे संकट मार्च २०२० पर्यंत अंटार्क्टिका वगळता पूर्ण जगावर आले असताना या कोरोना साथीचा प्रादुर्भाव वेगवेगळ्या क्षेत्रावर कसा झाला. तसेच, 'कोव्हिड -१९' हे संकट नसून संधी आहे, हे, लक्षात घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रबोधित करून त्यांनी त्यांच्या मार्फत गावातील नागरिकांना, परिसराला जनतेला प्रबोधन करण्यासाठी 'कोरोना', संसर्ग जन्य साथीच्या रोगामुळे विविध क्षेत्रातील होणारे बदल, स्थित्यंतरे लक्षात यावीत, 'करोना' साथीच्या काळात काय करावे ? काय करू नये ? याबद्दल जनजागृती करावी या हेतूने स्वत: व स्वत:सह परिसराला 'आत्मनिर्भर' बनवण्यासाठी बळ मिळावं, 'आत्मनिर्भर' उद्योग, शेतीचा, व्यवसायाचा मंत्र समजावा म्हणून चला, जाऊ या 'आत्मनिर्भर'ते कडे हा संदेश समोर ठेवून 'आत्मनिर्भर'ता हा अंक प्रकाशित करीत आहोत.

विद्यार्थ्यांनी विविध विषयावर अत्यंत अभ्यासू पद्धतीने लेखन केले. आहे. 'कोरोना' संसर्गामुळे उत्पादनासह, शैक्षणिक क्षेत्रात अनेक आव्हाने उभी राहिलेली आहेत. प्रत्यक्ष फेस-टू-फेस शिक्षण देण्याचे काम पूर्णत:थांबले आहे. या ठिकाणी आता फेसबुक, ऑनलाईन, झुम च्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याधारे 'शिक्षण', अध्यापन करण्याचे काम केले जातआहे. हे झालेले परिवर्तन, त्या परिवर्तनाची प्रासंगिकता व सोबत येणारी आव्हाने यासारख्या 'कोरोना'च्या महामारी मुळे उभे असलेल्या संकटाची माहिती देणारे, 'आत्मनिर्भर' भारतासाठी कोणते निर्णय घेण्यात आलेले आहे याची सर्वसामान्य वाचकांना व्हावी, असे लेख या अंकात विद्यार्थ्यांनी शब्दबद्ध केलेले आहेत.

या हेतूने हा 'आत्मनिर्भर' वार्षिकांक आपणासमोर ठेवत आहोत. या अंकाचे आपण स्वागत कराल,हा विश्वास आहे.या अंकाचे मुख्यसंपादक म्हणून संपादन करण्याची संधी मला दिल्याबद्दल प्राचार्य मा. डॉ. वसंत बिरादार साहेब यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच या अंकासाठी प्रेरणा व सहकार्य देणारे संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. विजयकुमार पाटील साहेब, सचिव मा. ज्ञानोबाराव झोडगे साहेब व अन्य सन्माननीय सदस्यांचा मी ऋणी आहे.

अंकाच्या प्रसिद्धीसाठी माझे सहकारी संपादक व विद्यार्थी संपादक मंडळाचा तसेच ज्या प्राध्यापक सहकाऱ्यांनी, प्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांनी , विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले आहे, त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. तसेच हा अंक प्रकाशित करण्यासाठी मयूर प्रिंटर्सचे संचालक सतीश कुलकर्णी, सृजन कम्युनिकेशन्सचे संचालक नयन बाराहाते, टंकलेखक अब्दुल अतिख यांचे तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

**प्रा. डॉ. डी.डी. चौधरी**
संपादक



# आत्मनिर्भर

## प्राचार्यांचे मनोगत...!

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीरने मराठवाड्यातील नव्हे तर महाराष्ट्रात आपली स्वतंत्र मुद्रा शैक्षणिक क्षेत्रात अधोरेखित केली आहे.करीत आहे.'बहुजन हिताय! बहुजन सुखाय!'या ध्येयाने प्रेरित होऊन आपला शैक्षणिक कार्यभाग साधत आहे.ग्रामीण भागातील, वाडी तांड्यांवरील, तळागाळातील, दीन, दलित, उपेक्षितांना, वंचितांना, कष्टकरी, सालदार, मजुरदार, यांच्यासह समाजातील सर्वच घटकांना त्यांना त्यांच्या हक्काचं शिक्षण मिळाले पाहिजे ही भूमिका किसान शिक्षण प्रसारक मंडळाची राहिलेली आहे.

शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीरने अहमदपूर येथे शैक्षणिक रोपटे लावले. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते पदवी पर्यंत शिक्षाणाची सोय टप्प्या टप्प्याने येथे उपलब्ध झाली. महात्मा फुले प्राथमिक विभाग, मराठी माध्यमांसह सेमी इंग्लिश, इंग्रजी माध्यम तसेच महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि इ. स. जून २००० मध्ये स्थापन झालेल्या महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरने आज २०व्या वर्षात पदार्पण केले आहे. या दरम्यानच्या काळात महाविद्यालय हे विद्यापीठात अहमदपूरच्या शैक्षणिक क्षेत्रात 'अव्वल' स्थानावर आहे.

रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापीठीय परीक्षेत आमच्या महात्मा फुले महाविद्यालयाचा विद्यार्थी तानाजी कांबळे हा इ.स.२०१६-२०१७ विद्यापीठात

गुणानुक्रमे सर्व प्रथम आला तसेच तो भूगोल या विषयात सर्व प्रथम येऊन गोल्डमेडलचा मानकरी ठरला.

इ.स.२०१७ –१८ मध्ये आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. दीपाली परतवाघ हीने संस्कृत या विषयामध्ये सर्व प्रथम येऊन गोल्ड मेडलची मानकरी ठरली.

इ.स. २०१८–२०१९मध्ये कैलाश ससाणे हा विद्यार्थी विद्यापीठात सर्व द्वितीय आला.तसेच तो इंग्रजी आणि भूगोल या विषयामध्ये सर्वप्रथम येऊन गोल्ड मेडलचा मानकरी ठरला.महाविद्यालयाच्या गुणवत्तेची कमान ही सतत वृद्धिंगत होत आहे.

महाविद्यालयाच्या प्रगतीचे सर्व श्रेय हे किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिका–यांचे डोळस मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची जिद्द, आणि उच्च विद्याविभूषित असलेले सर्व प्राध्यापकवृंदांचे अचूक व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन, तर शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गांच्या सहकार्याला जातेय.

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरचा 'आसूड' हा वार्षिक अंक नियमितपणे दरवर्षी विविध शीर्षनामाने प्रकाशित होत असतो.याही वर्षी 'आत्मनिर्भर' या शीर्षकाखाली आम्ही तो प्रकाशित करीत आहोत. या मध्ये जगात थैमान घातलेल्या 'कोव्हिड–१९'या महामारीच्या अनुषंगाने मानवी जीवनातील झालेले अनेक परिवर्तने या सह इतर बाबींचा आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतलेला वेधक आणि वेचक आढावा लेख रूपाने या अंकातून आम्ही सादर करीत आहोत.

**प्राचार्य डॉ.वसंत बिरादार**
मुख्यसंपादक

# अ । नु । क्र । म


संपादकीय

- **'कोरोना' महामारीचे भारतावर झालेले परिणाम...!** / कु. रोहिणी कदम
- **कोव्हिड महामारी संकट नव्हे 'संधी'** / नामदेव हाके, बी.ए. तृतीय
- **'कोरोना' संकटाच्या काळात शिक्षणाच्या नवीन संधी** / कु. ज्ञानेश्वरी श्रीरामे
- **'कोरोना' महामारी; समस्या नहीं अवसर है।** / सुरज पवार
- **कोरोना : संकट नव्हे संधी** / कु. अनुसया समदरले
- **'कोरोना' किती 'घातक' व 'पोषक' ?** / कु.पूजा देशमुख
- **कोरोना आणि व्यसनमुक्ती ...!** / कु. प्रगती पांचाळ
- **कोरोनाच्या पार्श्वभूमीवर झालेले परिवर्तन** / शुद्धोधन वाघमारे
- **आता तेल नुन्न पैसा नही... सुखानू किम जगनू ...अन् किम खानू... ?** / सुरज पवार
- **'कोव्हिड-१९' ची महामारी आणि महाराष्ट्रातील राजकारण...!** /परमेश्वर सूर्यवंशी
- **शुऽऽ शुऽऽ... वसुंधरा विश्रांती करतेय...!**/ हणमंत होळे
- **शेती कधीही श्रेष्ठच...!** /संतोष सोनकांबळे
- **पुन्हा गळ्यात गाडगे बांधावी लागतील...!** / शुभम् गुंजरगे
- **'कोरोना'ची निर्मिती व जगभर झालेला प्रसार** / विष्णूदास पांचाळ
- **चला, आत्मनिर्भर बनू या...!** / कु. मनीषा दराडे
- **'कोरोना' राजकीय नेत्यांच्या कठीण परीक्षेचा काळ** / कु. पल्लवी पाटील
- **'कोरोना-१९' और आज का भारत** / कु. अंजली बनसोडे
- **'कोविड - १९' व्यक्तिगत स्वच्छता** / कु. प्रगती पांचाळ
- **The Covid-19 Catastrophe has Another Face/** Akshata Devkatte
- **'कोरोना'चे संकट : रोजगाराच्या नव्या संधीच्या रूपात** / कु. महादेवी हुल्लाळे
- **'कोरोना' महामारी नव्हे तर एक संधी...!** / कु. प्रतिभा सुरनर
- **मानव जातीच्या इतिहासातला पहिलाच 'लॉकडाऊन' ...!** / कु. राणी मकापल्ले
- **'कोरोना'त माणूसच माणसाला आडवा येतोय... !** / कु. भाग्यश्री वाघमारे
- **कोरोनारेमाईबेहाल फक्त गोर - गरीबच !** / राहूल राठोड
- COVID 2019: Turning Adversity Into Opportunity / Ganesh Narvate
- **कोरोना : संकटातून संधीकडे... !** / कु. मनाली अंभोरे
- **'कोव्हिड १९'चे कौटुंबिक जीवनात झालेले परिवर्तन** / कु. मेघा ससाणे
- **'कोरोना' : महामारी... ? छे, ही तर संधीच... !** / कु. समीक्षा कांबळे
- **'कोरोना' काळात बस, वाहक व चालकांना 'अच्छे दिन'** / महेश पांचाळ
- **जो 'घरी' त्याच्यावरच 'कोरोना' 'कृपा करी '...!** / कु. गीता दोडे
- **कोरोना काळात घ्यायची काळजी ...!** / शंकर कदम
- **COVID-19: Not Peril but an Opportunity** / Samiksha Kamble
- **ऑनलाईन शिक्षण - देणाऱ्यांचे हात हजारो 'दुबळी' माझी झोळी..!** / विजय कांबळे
- **माणसाला, माणसाची जागा दाखविली 'कोरोना'ने ...!** / महेश पांचाळ
- **शनिवार माझा, रविवार तुमचा...!** / वीरेंद्र द्याडे
- **'कोरोना'ने 'उंदरा' सारखी गिळंकृत केली...!** / कु. प्रियंका जाधव
- **कामगारांसाठी काळ तर मोठा कठीण आला...!** / कु. भाग्यश्री वाघमारे
- **पंतप्रधान नरेंद्र मोदींचे : 'कोरोना' विरूद्धचे 'तिसरे महायुद्ध' !** / कु. नवनीता रड्डेवाड

## ।। महाविद्यालय गीत ।।

क्रांतिसूर्य ज्योतिबांच्या लेखणीमधली ही शिक्षण वाणी ।
ज्ञानमंदिरी भारतभूमी दिसे शोभुनी ।।धृ।।
सर्वांचा निर्मिक एक जानी
माणूस इथला आत्मज्ञानी
सत्याने वर्तावे सद्‌गुण मानी
ज्ञानचक्षु विद्यार्थी इथे अभिमानी
ज्ञानदीप लावुनी तेवत ठेवुया मनोमनी ।।१ ।।
घेवुनिया वसा ज्योतिबांचा
ठेविला आदर्श सावित्रीचा
फुलविला मळा शिक्षणाचा
मिळाला आधार किसान शिक्षण मंडळाचा
फुले महाविद्यालायचे रोप लाविले दूरदृष्टीने ।।२ ।।
बालाघाटच्या डोंगर रांगा
मन्याड खोऱ्यात फुलती ज्ञानबागा
शिक्षण क्रांतीचा गुंफला धागा
माणूस इथला सदैव जागा
फुले पॅटर्नचा झरा वाहे शिक्षण पंढरीतुनी ।।३ ।।
शिक्षण ज्ञान विज्ञानाचे
मानवतेचे गुणवत्तेचे
जिजाऊ सावित्री अन् अहिल्याबाईंचे
स्वराज्य स्थापण्या शिवरायांचे
'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' चा
ध्यास घेऊनी मनोमनी ।।४ ।।
विद्यार्थी सारी मिळूनी राहती
एकतेचे गीत गाती
ज्ञानदिव्यांच्या पेटवून वाती
शूरवीरांचे गुण गाती
शब्दरत्नांच्या अलंकाराने दिसते शोभुनी ।।५ ।।

**- प्रा. डॉ. अनिल मुंढे**



# `keÀejevee' ceneceeje®e Yeejleeleej Peeueue HeejCeece...!

**कु. रोहिणी कदम,** बी.ए. तृतीय वर्ष

**प्रस्तावना –**

कोरोनाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर भारतात होत असल्याने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या रोगाबाबत अनेक शंका आणि प्रश्न आहेत. कोरोनाचं नामकरण कसं झालं ? त्याची लागण भारतातच नव्हे, तर जगाला झाली आहे. हा विषाणू आला तरी कोठून ? त्याची उत्पत्ती कशी झाली ? तो जगभर पसरण्याचे कारण काय ? त्यावर उपाय काय ? हे याचा परिणाम देशावर काय होतो आहे. त्यामुळे जगभर लॉकडाऊन लागू करण्यात आला आहे. त्यामुळे लोकाना कामेच नाहीत ना. ते घरात बसून आहेत. मग जगायच कसं हा प्रश्न निर्माण होतोच की ? हे, मान्य आहे की, सरकार मोफत राशन देत आहे. पण ते राशन सर्वाना मिळतं का ? हा प्रश्न निर्माण होतोच की सर्वच जीवनावश्यक गोष्टी सरकार पुरवू शकत नाही ना ? एवढेच नव्हे, तर कामाधंद्यासाठी बाहेर स्थंलातर झालेली लोकं तेथेच अडकून बसलीत ना ?

**कोरोनाचं नामकरण कसं झालं ?**

'कोरोना' हा शब्द लॅटिन भाषेतून आला आहे. त्याचा शब्दश: अर्थ 'मुकूट' असा होतो. क्विन्सलँड सरकारच्या आरोग्य विभागाच्या माहितीनुसार कोरोनाच्या विषाणूला इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शिकेने पाहिल्यास त्याची रचना मुकुटासारखी दिसते. त्यामुळे या विषाणूला कोरोना नाव देण्यात आले.

**'कोव्हिड – १९' (Covid-19) म्हणजे काय आणि असे का म्हटले जाते ?**

'कोव्हिड – १९' हा संसर्गजन्य विषाणू आहे. कोरोनालाच Covid-19 म्हणतात. co म्हणजे कोरोना. Vi म्हणजे विषाणू, D म्हणजे आजार आणि १९ म्हणजे २०१९. म्हणून 'Covid-19' म्हणतात. कारण २०१९ मध्ये या विषाणूचा फैलाव झाला. पहिल्या संक्रमित व्यक्तिची डिसेंबर –२०१९ मध्ये पॉझिटिव्ह चाचणी झाली म्हणून याला 'Covid-19' असे म्हणतात.

**हा विषाणू किती गंभीर आहे ? सामान्य लक्षणे कोणती आहेत ?**

सामान्य लक्षणे : सर्दी, खोकला लक्षणासह ताप, अंगदुखी, थरथरणे ही प्राथमिक लक्षणे दिसून येतात. ताप सहजपण कमी होत नाही. कोरडा खोकला, डोके दु:खी, थकवा आणि स्नायूच्या वेदनांसह श्वास लागणे हे लक्षणे आढळतात. शिंका येणे, नाक वाहणे, घसा खवखवणे, मळमळणे, उलट्या आणि अतिसार यासारखी लक्षणे अल्प प्रमाणात आढळतात. खोकताना शिंकताना, संक्रमित व्यक्ती सारखीच श्वास घेताना श्वसनाच्या थेंबाद्वारे संसर्ग एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरतो.

**भारतात झालेली कोरोनाची लागण :–**

कोरोनानं सध्या अनेकांना धडकी भरली आहे. चीन मधून जगभरात पसरलेल्या कोरोनानं आतापर्यंत

कित्येक रुग्णाचा बळी घेतलाय. आजपर्यंत भारतात साडे पाच लाख ऐवढे करोना व्यक्ती आढळलीत. तर त्यापैकी हजारो व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. ते आपल्याला खालील तक्त्यावरुन सांगता येईल.

| **राज्य** | **भारतात कोरोना रुग्ण** |
|---|---|
| दिल्ली | ४८९८ |
| महाराष्ट्र | १४५४१ |
| उत्तर प्रदेश | २८५९ |
| राजस्थान | ३०६१ |
| मध्यप्रदेश | ३०४९ |
| गुजरात | ५८०४ |
| तामिळनाडू | ३५५० |
| तेलंगणा | १०८५ |
| प. बंगाल | १२५९ |
| बिहार | ५२९ |

**कोरोना व्हायरसची निर्मिती :**

कोरोना व्हायरसच्या निर्मितीबाबत अनेक तज्ज्ञानी मत मांडले आहेत. कोरोनाची निर्मिती ही चीनमधील 'वुहान' या शहरात झाली असून हा व्हायरस वटवाघूळ या प्राण्यापासून आल्याचा काही तज्ज्ञानी दावा केला, तर काही तज्ज्ञ म्हणतात की, हा व्हायरस चीनच्या एका मेडिकल लॅबमध्ये हा व्हायरस निर्माण केला आहे.

जगभरातील तज्ज्ञ लोक अजूनही संशोधन करीत आहेत की, हा व्हायरस रोखण्यासाठी कोरोना व्हायरस झाल्यावर प्रतिबंध करणारी लस किंवा अँटिव्हायरस औषधे अद्यापही तयार झालेली नाहीत.

**कोरोनाचे फायदे :-**

चीन मधून येणाऱ्या मालावर सक्त बंदी घालण्यात आली आहे. आयात - निर्यात करण्यावर सरकारने बंदी केली आहे. त्यामुळे भारत हा स्वत: 'Product' निर्माण करतो आहे. व भारत हा आत्मनिर्भर बनण्याच्या वाटचालीवर आहे. सध्या जरी भारताची अर्थव्यवस्था १-९-१०ऐवढी खालावलेली असली, तरी इतर राष्ट्राच्या तुलनेत उंचावलेली आहे व येणाऱ्या पुढील काळात भारताची अर्थव्यवस्था ही उंचावलेली असेल. १९३० मध्येही अशा महामारीमुळे भारतात मंदी आली होती.

माणसा - माणसात जी आपुलकी, प्रेम, जिव्हाळा होता. तो नाही राहिला पण या कोरोनामुळे माणसे एकत्र आली. आपल्या परिवारासाठी वेळ देऊ लागलीत. प्रदूषण कमी झाले आहे.

**कोरोनाचे दुष्परिणाम :-**

१) लोकसंखेत घट झाली आहे.
२) कारखाने, उद्योगधंदे, कंपन्या बंद झालीत.
३) बेरोजगारी, वाढली आहे.
४) भारताची अर्थव्यवस्था ढासाळली गेली आहे.

'लोग कहते है, की ज्ञानेश्वरी मे यह पहले ही लिखा हुआ था । मै तो नही जानती लिखा था या नही। हाँ मगर मै बस इतना जानती हूँ की विनाशकालीन विपरीत बुद्धी'

मानवजात अस्तित्वात येण्यापूर्वी डायनॉसोरचे अस्तित्व होते. पण कालांतराने त्याचे अस्तित्व नष्ट झाले. आणि त्याठिकाणी मानवजात अस्तित्वात आली. डॉयनासोरचे अस्तित्व होते. हा पुरावा लिहिण्यासाठी मानव होता. पण मानव जात अस्तित्वात होती हा पूरावा लिहिण्यासाठी मात्र मानव असेल की, नसेल हे मात्र सांगता येणार नाही.

◆◆◆



# keÀeeJn[ ceneceeje mekeÀì veJn `meOee'

**नामदेव हाके,** बी.ए. तृतीय वर्ष

**'कोरोना' व्हायरस रोग २०१९ (कोविड-१९):-**

हा एक अति संसर्गजन्य रोग आहे. जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम – संबंधित कोरोना व्हायरस, अथवा (एसएआरएस–कोव्ह–२) या नावाच्या नवीन विषाणुद्वारे होतो. ज्या सार्स या रोगाने दक्षिण – पूर्व एशियामध्ये थैमान घातले होते त्या करोना व्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहानमध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती. त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व त्याने जागतिक महामारीचे रुप घेतले. या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये थकवा, स्नायू दुखणे, अतिसार, घसा खवखवणे, गंध कमी होणे, पोटदु:खी इत्यादी या लक्षणांचा समावेश असू शकतो. सामान्यत: लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्या पर्यंतचा कालावधी हा दोन ते चार दिवसांचा असू शकतो. बहुतेक प्रकरणामध्ये सौम्य लक्षणे आढळतात, तर काही रोग्यामध्ये व्हायरल निमोनिया आणि बहु – अवयव निकामी होण्याची भीती असते.

हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्काद्वारे खोकल्यामुळे, शिंकण्यामुळे किंवा बोलण्याने नकळत बाहेर पडणाऱ्या थुंकीच्या तुषारांमुळे लोकांमध्ये पसरतो. हे थेंब अथवा तुषार श्वासोच्छवासाच्या दरम्यान देखील बाहेर पडून आजूबाजूच्या जमिनीवर किंवा पृष्ठभागावर पडतात व अशा दुषित पृष्ठभागाला हाताने स्पर्श करुन आणि नंतर तोच त्यांच्या चेहऱ्याला लावल्यानेही लोक संक्रमित होऊ शकतात. हे विषाणू सर्वात जास्त संक्रमक असतो, परंतु रोगाची लक्षणे दिसण्यापूर्वी देखील आणि रोगाच्या नंतरच्या टप्प्यात देखील फार संक्रमक असतो. या रोगाच्या निदानाची मानक पद्धत म्हणजे नाकातून घेतलेल्या नमुन्यांची रिअल–टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमेरेज चेन रिएक्शन (आरआरटी–पीसीआर) नावाची तपासणी होय.

वारंवार साबणाने व्यवस्थित हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे (विशेषत लक्षणे असणाऱ्या लोकांकडून) खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर करणे. अचानक शिंक आली असताना व रुमाल जवळ नसल्यास कोपर तोंडावर धरुन

आताल्या बाजूला शिंकणे, न धुतलेले हात चेहऱ्यापासून दूर ठेवणे या व अशा उपायांचा वापर केल्यास विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यास मदत होते.

ज्या विषाणूची लागण झाल्याचा संशय होणे अथवा सौम्य लक्षणे दिसत आहेत अशांना आणि त्यांची काळजी घेणाऱ्या अथवा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांनी मास्क वापरण्याची शिफारस केली जाते. सध्या, 'कोरोना'व्हायरस रोग २०१९ (कोव्हिड-१९) वर जगात कोणतीही लस किंवा विशिष्ट उपचार नाहीत. फक्त रोगाच्या लक्षणावर अधारीत उपचार, प्रतिकार शक्ती वाढविण्याचे उपाय, विलगीकरण व काही प्रयोगात्मक उपाय या गोष्टींचा उपचार म्हणून वापर केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेने हा 'कोरोना'व्हायरस रोग २०१९ (कोव्हिड-१९) चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगत या उद्रेकाला 'जागतिक महामारी' जाहीर केले.

पण जरी 'जागतिक आरोग्य' संघटनेने या रोगा 'जागतिक महामारी' जाहीर केला असले तरी मला वाटते 'कोव्हिड-१९ महामारी संकट नव्हे संधी' आहे. या संकटाला प्रत्युत्तर देऊन, मात करुन आपण विजयी होऊ आणि दुसऱ्या राष्ट्रांना आपली विविधतेत असणारी एकता दाखवण्याची संधी आहे, तर एकजुटीने या संकटावर मात करु या आणि ते ही घरी राहून. जरी या महामारीच्या दरम्यान लॉकडाऊन असले तरी आपण विविध काही कला अवगत करु शकतो. घरी राहून सिनेमाचा आनंद घेऊ शकतो. ऑनलाईन लेक्चर करुन आपला मागे पडत असलेला अभ्यास करु शकतोत.

आवांतर कथद कादंबऱ्या चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णनपर साहित्य वाचू शकतात. हे सर्व करीत करीत.

'स्वत:ची काळजी स्वत:च घेऊया, कोरोना वर मात करुया!'

◆◆◆

आता लग्नात वधू-वर एकमेकांना, घास भरवताना काय उखाणा घेतील...
कोरोनाच्या काळात लग्न म्हणजे 'टास्क'...!
जिलेबीचा घास भरवते, काढा तुमचा 'मास्क'... !

**- परमेश्वर सूर्यवंशी (बी.ए. तृतीय वर्ष)**

'कोरोना को हराना है' इथून सुरु झालेला प्रवास 'कोरोना के साथ जीना है' इथं पर्यंत येऊन संपाला. यावरुन 'अग्निपथ' चित्रपटातील एक संवाद आठवला, 'दुष्मन की उमर लंबी हो जाये तो उससे दोस्ती कर लेनी चाहिये, अपनी उमर लंबी हो जाती है.'

**- कु. सुम्मैया चाऊस (बी.ए. द्वितीय वर्ष)**



# `keÀejevee' mekeÀì e®³ee keÀeUele eMe#eCee®³ee veJeeve meOee

**कु. ज्ञानेश्वरी श्रीरामे** , बी. ए. तृतीय वर्ष

मानवाला जीवन जगत असताना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. विविध समस्या व संकटांना तोंड देत तो जीवन जगत असतो. म्हणूनच जीवन हे संघर्षाचे दुसरे नाव आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. संघर्ष करत–करत येणाऱ्या संकटावर मात करत तो पुढे जात आहे. सध्याचे कोरोनाचे संकट हे असेच आहे. 'कोरोना' विषाणूचा प्रादुर्भाव हे जगासमोर फार मोठे संकट आहे. मानवी जीवनाच्या सर्वच स्तरावर त्याचा प्रभाव पडला आहे. या रोगाला अजून प्रतिजैविके न सापडल्यामुळे रोग पसरू नये व होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजने एवढाच आता सर्वासमोर पर्याय उरला आहे. म्हणून लॉकडाऊन सारखे धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा सर्व देशात प्रयत्न चालू आहे. या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भीतीचे वातावरण पसरले आहे. कोरोनाला रोखण्यासाठी संपूर्ण स्तरातून शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत.

**शाळा बंद, कॉलेज बंद.... !**

शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत विचार करायचा झाला तर जगातील अनेक देशांनी आपल्या शिक्षण संस्था सध्या बंद केल्या आहेत. 'युनेस्को' च्या अहवालानुसार एप्रिल २०२० मध्ये १८८ देशांमध्ये १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात १५ लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८९ लाख शिक्षक घरी बसले आहेत. तर उच्च शिक्षणामध्ये ५० हजार शिक्षण संस्था बंद आहेत. यातील ३.७० कोटी विद्यार्थी आणि पंधरा लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. एवढे विद्यार्थी व शिक्षक रिकामपणे बसणे म्हणजे हे एक टाईम बॉम्ब आहे. रिकामे डोके हे सैतानाचे घर मानले जाते. त्यामुळे लोकांचे रिकामेपण, एकटेपण घालवण्यासाठी 'रामायण', 'महाभारत' या सारख्या मालिका दूरदर्शन वर दाखवून, भूतकाळातील पौराणिक कथा दाखवून जनतेला गुंतवून ठेवून वर्तमानातील समस्यावर मात करता येणार नाही. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर अनेक संकटावर मात केली आहे. इ.स.१७२०. इ.स.१८२०, इ.स.१९२० आणि आता इ.स.२०२० असे सतत दर शंभर वर्षांनी आलेले संकट हे काही नवीन नाही. त्यामुळे आता विचार करत बसण्यापेक्षा कृतीवर भर दिला पाहिजे. आता आपण पाहतो की, हळूहळू जगातील देश लॉकडाऊन शिथिल करत आहेत. भारतात सध्या तरी ३० जून २०२० पर्यंत लॉकडाऊनचा चौथा टप्पा सुरू आहे. परंतु यामुळे सर्व काही ठप्प आहे अशातला भाग नाही. यापैकी शिक्षण हे एक होय.

**'कोरोना' सोबत अनेक संधी उलब्ध**

कोरोना हे संकट तर आहेच पण त्याचबरोबर संधी सुद्धा आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. ज्या गोष्टी आपण ऐकत होतो वा वाचत होतो. आता आपण माहीत करून घेऊन त्या स्वत: वापर करीत आहोत. दूरशिक्षण, माहिती तंत्रज्ञानाचा वापर,

मल्टीमीडिया, मोबाइल-फोन, ई-लायब्ररी झूम ॲप, गुगल मीट इत्यादी उपक्रमांचा वापर करायला लागलोत. यातून आपल्याला काही नवीन शिकायला मिळालेच ना ! सध्या परीक्षा पुढे ढकलणे, परीक्षा रद्द करणे, परीक्षा न घेता पुढील वर्गात प्रवेश देणे हे जरी निर्णय होत असले तरी हे तात्पुरत्या स्वरूपातील निर्णय आहेत. म्हणून आपण आपले शिक्षण हे थांबवता कामा नये. 'ऑनलाइन शिक्षण' ह्यातूनच पुढे आलेली संकल्पना होय. याद्वारे आपण आपल्या घरी बसून शिक्षण घेऊ शकतो. 'घरी रहा, सुरक्षित रहा' या नियमांचे पालन ही होते आणि शिक्षण ही होते. आपल्यासारख्या विकसनशील भारत देशांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी आहेत. त्यामागे आपल्या शिक्षण पद्धतीचा फार मोठा वाटा आहे. आपले शिक्षण हे तंत्रज्ञानयुक्त असले तर त्याला मागणी आहे. ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून आपल्याला तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण घेता येते. ही फार मोठी संधी आहे.

माणसाच्या जीवनाचा परिवर्तनाचे साधन हे शिक्षणच आहे. म्हणून यावर मात करण्यासाठी ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा चांगल्या प्रकारे वापर होऊ शकतो. ऑनलाइन ज्ञान आपल्याला स्मार्ट बनवते. आपल्या स्मार्ट फोनच्या माध्यमातून हे शिक्षण घेता येऊ लागले आहे. आताच्या नवीन पिढीचे हे एक प्रमुख साधन बनले आहे. आपल्या वेळेनुसार, घरबसल्या व कमी खर्चामध्ये हवे ते शिक्षण घेता येते. त्याची परीक्षा देता येते व सर्टिफिकेट प्राप्त करता येते. एखादी गोष्ट समजली नसली तरी ती पुन्हा बघून समजावून घेता येते. आपल्या देशांमधून इतर देशांमधील विद्यार्थ्यांना बोलता येते. विविध तज्ञांशी संवाद साधता येते. त्यामुळे तिकडे प्रत्यक्ष जाण्याची गरज नाही. एवढी मोठी सुविधा या मधून प्राप्त होते आहे. थेट ऑनलाईन संभाषण, चर्चा, प्रश्नोत्तरे यासारख्या गोष्टी घर बसल्या कम्प्युटर अथवा मोबाईलवर करता येऊ लागले आहेत.

कोरोनाच्या या संकटाच्या काळात अनेकांनी या संधीचा फायदा घेतला आहे आणि घेत आहेत. जसे की, अनेक महाविद्यालयाकडून वेगवेगळ्या विषयांवरच्या प्रश्नावलीची लिंक देऊन दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सोडवल्यानंतर लगेच त्यांच्याकडून मेलवर सर्टिफिकेट मिळण्याची सुविधा प्राप्त होत आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरचे चर्चासत्र (वेबिनार) आयोजित केले जात आहेत. स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडसह अनेक विद्यापीठांमधून फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) रिफ्रेशर, ओरिएंटेशन कोर्सेस केले जात आहेत. याला सर्वस्तरातून प्रतिसादही मिळत आहे. ही फार मोठी संधी उपलब्ध होत आहे. नाहीतर यापूवी देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन, त्या-त्या विद्यापीठांमध्ये किंवा इतर राष्ट्रांमध्ये जाऊन हे सर्वकरावे लागायचे. त्यामुळे जाण्या-येण्याचा खर्च, तेथे राहण्याचा खर्च करावा लागत असे. आता ते सर्व टाळून घरबसल्या सर्व साध्य होत आहे. गुगल फॉर्म, गुगल डॉक्स, गुगल क्लासरूम अशा एका क्लिकवर सर्व काही मिळत आहे.

उद्या शासनाने आम्हा विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावयाची ठरवली तरी आम्हांला त्याची भीती वाटणार नाही. कारण कोरोनाच्या संकटाच्या काळामध्ये संगणकाचे पुरेसे ज्ञान आम्हाला मिळाले आहे. निश्चितपणाने या काळात करणाऱ्यासाठी खूप काही आहे. फक्त आपण त्याचा सकारात्मक बाजूने विचार केला पाहिजे आणि ती गोष्ट साध्य केली पाहिजे. संकटातून संधी मिळवता आली पाहिजे. ती शोधता आली पाहिजे आणि ती आम्ही शोधत आहोत.

◆◆◆

# `keÀejevee' ceneceeje; mecem³ee vene DeJemej n~

**सुरज पवार,** बी. ए. तृतीय वर्ष

कोरोना की वजहसे सामाजिक राष्ट्रीय एकात्मता निर्माण हो चुकी है। क्योंकि पूरा देश लॉक डाऊन की वजहसे अपने अपने घरों में कैद हो चुका है। परंतु लॉकडाऊन की वजहसे गोर गरीब, मजदूर, कामगार इनकी रातों का नींद उड़ चुकी है। और चुका ही नही इनकी खाने-पीने की, राशन की, सुव्यवस्थाओं शासन इनकी मदत कर रही है। परंतु कोरोना की वजहसे पुरा देश सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता में जागरुक हो चुका है। एक-दूसरे के लिए मदद की हाथ बढ़ा रहा है। कोरोना एक अवसर है क्योंकि पूरा देश लॉकडाऊन होने की वजहसे यु.पी., एम.पी. इन राज्यों के नागरिकों को कोरना की वजहसे अपने - अपने व्यवसाय या कंपनी में काम करने वाले कामगार काम छोडकर वापस अपने-अपने राज्यों में जाना पड रहा है। यु.पी. या एम.पी. में के नागरिक जादातर कंपनीयों में काम करते थे। अब लॉकडाऊन खतम होने के बाद अपने महाराष्ट्र के नागरिकों को अवसर कंपनीयों में या किसी भी क्षेत्रों में काम करने का बड़ा अवसर मिल सकता है। एम.टी. एस.सी. के छात्रों को भी पढ़ाई करने को बहुत ज्यादा समय हैं। इन समय का फायदा उठाना चाहिए। क्योंकि एम.पी.एस.पी. और यु.पी.एस.सी. के छात्रों को ज्यादा समय मिलने के कारण छात्रोंकी जो भी इच्छायँ है। अपने पढ़ाई के माध्यम से सपना पूरा कर सकते है। इसलिए छात्रों ने समय सचु उपयोग नाँ करे एसी मेरी इच्छा है।

कोरोना कि वजह से पूरे भारत देश में लॉकडाऊन का पालन कर रहैं है। और आगे भी करें। इतना ही नहीं कोरोना की वजह से सामाजिक, एकात्मता, समता बंधुता, प्रेम, पूरे देश में निर्माण हो रही है। लॉकडाऊन में अपने अपने परिवारों की रक्षा करें और अपने परिवारों को समय दे।

नागरिकों अब बेरोजगार इधर - उधर घूमने कि नौबत नहीं आयेगी क्योंकि लॉकडाउन खत्म होने के बाद बहुत बडा अवसर मिलेंगा इसलिए यु.पी., एम.पी. छत्तीसगढ़ इन राज्यों के नागरिक नहीं आ सकते। इसलिए महाराष्ट्र के नागरिकों को बहुत बड़ा अवसर है। गाव के सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, पोलिस पाटिल, अलग अलग पोलिस निरीक्षक नागरिकों की मदत कर रहें है।

गाँव, गाँव में सामाजिक एकता, एकात्मता, समता, बंधुता इनका सही तरह से एक दूसरे को मदद की हाथ समता, बंधता, सामाजिक एकता इन्सानियत के नाते इनका सही तरिके से पालन कर रहैं है। आज दूनिया में कोरोना की वजह से पूरी दुनिया में हाहाकार मच गया है। अलग अलग गाँवों में के ग्रामसेवक उन गाँव कें नागरींकों को चौदह दिन कॉरोंटाईन कर रहें है। पोलिस, डाक कर्मचारी, सफाई कर्मचारी, बहुत बड़ा योगदान दे रहें है। पोलिस कर्मचारी २४ घंटे अपना काम सही ढंग से कर रह हैं। इस में कोइ संदेह नहीं है। इतना ही नही डॉक्टरक, नर्स अपना पूरा समय कोरोना रुग्ण को ठिक करवाने मे लगे हुए हैं। इतना ही नहीं सफाई कर्मचारी लोग स्वच्छता के माध्यम से पूरी दुनिया में स्वच्छता का

या देखरेख, हॉस्पीटल के साफ सफाई में लगी हुई है। इसमें कोई संदेह नहीं है। पोलिस निरीक्षक, डॉक्टर, सफाई कर्मचारी, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच को धन्यवाद कहना चाहिए।

कोरोना के कारण व्यक्तिगत स्वच्छता और गांव की स्वच्छता की आदत लग गई है।

कोरोना के कारण व्यक्तिगत स्वच्छता की बहुत आदत लग गई है। क्योंकि व्यक्ति अपनी स्वच्छता कर रहा है। इसमें कोई संदेह नहीं है । इतना ही नहीं वे घर की भी स्वच्छता कर रहा है। इसमें कई संदेह नहीं है। कोरोना के कारण व्यक्ति अनेक प्रकार के साबण का इस्तेमाल कर रहे हैं। उदा. लाईफबॉय, डेटॉल ऐसे अनेक प्रकार साबण इस्तेमाल कर हैं। व्यक्ति कोरोना के कारण अपने पूरे परिवार एवं दोस्त पडौसी का अच्छी तरह से ध्यान रख रहा हैं। इसमे को संदेह नही हैं। कोरोना के कारण पाँच पाँच मिनटों में बीस सैंकड के समय में हाथ धो रहा है। ये जो क्रिया है। वह बार – बार कर रहा हैं। इसलीए की वो अपने व्यक्तिगत स्वच्छता को बढ़ा रहा है। क्यों कि कोरोना के कारण ये क्रिया बार – बार व्यक्ति को करना पड रही है। क्योंकि अपने देश में कोरोणा का नामो निशान मिट जाए। इतना ही नही पूरे दुनिया में कोरोना का नाम निशान मिट जाए। ना अपना भारत एक देश कोरोणा मुक्त हो जाए, और पहिली जैसी अवस्था है। वैसी अवस्था फिर भारत में नहीं पूरी दुनिया में आयेगी। फिर से पहिले जैसी खुशी भारत में या पुरी दुनिया में आयेगी।

कोरोना के कारण गाँव की स्वच्छता अच्छी ढंग से कर रहे है। इसमें कोई संदेह नहीं है। गांव की स्वच्छता के लिए ग्राम पंचायत समिती एवं पंचायत समिती अपना पूरा समय गाँव के स्वच्छता को दे रही हैं। इसमें कोई संदेह नहीं है। पंचायत समिती एवं ग्राम पंचायत प्रत्येक गाव में पंधरा पंधरा सफाई कर्मचारी व्यवस्था कर चुकी है। गाँव – गाँव में स्वच्छता आ गई तो कोरोना गाँव – गाँव में मुक्त हो जाएगा. गाँव – गाँव में खत्म होने के बाद शहरों में खत्म हो सकता है और शहरों में खत्म होने के बाद देशों – देशों में खत्म हो सकेगा। इसलिए कोरोना के कारण व्यक्तिगत स्वच्छता और गांव की स्वच्छता की आदत लगकर अपने भारत देश के लिए और पूरी दुनिया के लिए अच्छी खुश खबरी है। इतना ही नहीं स्वच्छता के कारण कोरोना मुक्त हो जाएगा और भारत एक अच्छा उज्वल देश बनेगा । आगेचलकर व्यक्तिने अपने व्यक्तिगत स्वच्छता के साथ – साथ अपने गाँव – गाँव का स्वच्छता रखनी चाहिए यह भारतीय समाज के लिए अच्छी खबर है।

कोरोना ने हमें आत्मनिर्भर बनाया है। इसमें कोई संदेह नही। क्योंकि कोरोना की वजह से हम हमारे बलबुते पर जीवन जी रहे हैं। कोरोना के कारण व्यक्ति अपना ध्यान अच्छी तरह से रख रहा है। इसमें कोई संदेह नही । उदा. बूढ़े व्यक्ति अपना ध्यान खुद रख रहे हैं। कोरोना का अच्छे ढंग से, मजबूती से सामना कर रहे हैं। ऐसा सामना करे तो आगे चलकर भारत उज्वल देश बनेगा और भारत का नाम विकसनशील नहीं विकसीत यादी में दर्ज हो जाएगा। कोरोना के कारण व्यक्ति खुद के बलबुतेपर अपना जीवन सुरक्षित जी रहै हैं इस में कोई संदेह नहीं है। कोरोनाने हमें यह सिखाया है की खुद के बलबुतेपर हम अपना जीवन जीना चाहिए।

◆◆◆



# keÀejevee ë mekeÀì veJn meOee

**कु. अनुसया समदरले,** बी.ए. तृतीयवर्ष

काही दिवसांपासून भारतात नव्हे तर जगभरात कोरोनाने थैमान घातले आहे. 'कोरोना' हा विषाणू आहे. जगभरात जनतेला सर्व क्षेत्रात माघार घ्यावी लागली आहे. व सर्वत्र लोकांच्या मृत्युचे कारण बनले आहे. मोठ्या प्रमाणात याचे वाढते प्रमाण आपणास माहिती आहे.

महत्त्वाचे म्हणजे 'कोरोना एक संकट नसून संधी आहे' कारण युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. कर्मचाऱ्यांना नोकऱ्यांबदल माहिती देणाऱ्या ग्लोबलहंटच्या अहवालानुसार यावर्षी भरती प्रक्रिया जवळपास थांबली आहे. परंतु असे काही उद्योग आहे, जिथे अजुनही कुशल कामगारांची मागणी आहे.

कोरोनामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था कोडमडललेल्या स्थितीत असल्याने रोजगाराचेही मोठे संकट निर्माण झाले आहे. कोरोनाचा संसर्ग वाढल्यामुळे काही कंपन्यांनी नवीन नेमणुका लांबणीवर टाकल्या आहेत. तरी उद्योगा वार्ता आकडेवारी नुसार, या वर्षी नवे कर्मचारी नियुक्त होतील मात्र त्यांचा वेग मंद राहण्याची शक्यता आहे.

**युवकांसाठी रोजागाराची संधी**

असे असलेतरी महाराष्ट्रात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात भेटणार आहेत. कारण विविध घटकातील लोक महाराष्ट्रात कामासाठी (रोगारासाठी) वास्तव्यास होते. आणि ते आता महाराष्ट्रातून त्या – त्या राज्यातील लोक त्यांच्या राज्यात कोरोनाच्या संसर्गामुळे परतले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत व महाराष्ट्रातील युवक युवतीना रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. महाराष्ट्रात विविध भागात विविध ठिकाणी शासकीय, बिगरशासकीय अशा रोजगाराच्या संधी निर्माण होतील व मग मोठी समस्या नष्ट होईल ती म्हणजे बेरोजगारी ही समस्या नष्ट होईल म्हणून मला 'कोरोना' हे संकट नव्हे तर युवकांसाठी मोठी रोजगार संधी आहे वाटते.

**कोरोना आणि ऑनलाईन शिक्षणाचे फायदे :**

भारतात तसेच महाराष्ट्रात कोरोना संसर्ग रोगावर

मात करण्यासाठी 'Stay at Home' हे एकमेव हत्यार म्हणजे उपाय आहे. सर्व आपआपल्या घरात राहून रोगापासून वाचू शकतो. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचे वर्ष जावू नये म्हणून भारत व महाराष्ट्र सरकारने 'Online education' हे मोहीम राबविली आहे. यामुळे विद्यार्थ्यांची शिक्षणाची भरपाई करण्यासाठी ऑनलाईन शिक्षण देण्यात येत आहे.

'कोरोना' मुळे व्यसनमुक्ती मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. अनेक कुटुंबात एकजिनसी पणा निर्माण होत आहे. कोरोनामुळे कुटुंब हे उध्वस्त होत नाही उध्वस्त होण्या पासून वाचवता येते तसेच कुटुंबात भांडण, तंटे होत नाही. मग हे कुटुंब चांगले आदर्श निर्माण करतात.


'कोरोना' मुळे निसर्गाच्या सानिध्यात राज्याची संधी मिळते आणि निसर्गाच्या मध्यमातून मानव प्रगती करतो. निसर्गात काही महिन्यापूर्वी वातावरणात मोठ्या प्रमाणात प्रदूषण पसरले होते. त्यात वायू (हवा) प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण जास्त प्रमाणात वाढलेले होते आणि ते मानवी मृत्युचे एक प्रमुख कारण बनलेले होते कोरोना मुळे वातावरणातील सर्व दूषित घटक कमी झाले आहे. त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे गंगा, गोदावरी इत्यादी नद्यांच्या पाण्याचे प्रदूषण कमी झाले आहे. कोरोना यामुळे वातावरणात कमी अधिक प्रमाणात चांगला बदल झालेला दिसून येतो.

'कोरोना' मुळे चोरी, बलात्कार, खून अशा विविध समाज घातळ घटनांना कुठेतरी प्रतिबंध बसला आहे. हे आपल्या लक्षात आले असणार. सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'कोरोना' या व्हायरसशी लढण्यासाठी पोलीस, डॉक्टर कर्मचारी यांचे योगदान सर्वात महत्त्वाचे आहे. व 'कोरोना' या विषाणू मुळे मानवी जीवनाला एका चांगल्या प्रकाराची शिस्त लागली आहे. सर्व नागरिक आपल्या कुटुंबाला वेळ देऊ लागले आहेत. तसेच त्यांना आपल्या कुटुंबासोबत एक प्रकारे देशसेवा करण्याची संधी मिळाली आहे.

◆◆◆

जगात विळखा घातलेल्या 'कोव्हिड-१९' च्या संसर्गा पासून बचाव करण्यासाठी गर्दी टाळणे हा एकमेव उपाय आहे. त्यासाठी लॉकडाऊनची अंमलबजावणी केली जात असून, लोक घरी बसले आहेत. सगळे व्यवहार थंडावले आहेत. 'कोरोना'च्या मुकाबल्यासाठी वैद्यकीय क्षेत्राबरोबर आघाडीवर आहेत, ते देशातील पोलीस! सध्या या दलातील कर्मचारी रात्रंदिवस रस्त्यांवर असून, लॉकडॉऊनची अंमलबजावणी करीत आहेत. त्याच बरोबर अडचणीत सापडलेल्यांच्या मदतीसाठी पोलिसच धावत आहेत. कोरोना विषाणूपासून सुरक्षेसाठी पोलिसांनाही पुरेशा साधनाची गरज आहे.

**- कु. नम्रता होळे, (बी.ए. तृतीय वर्ष)**



# `keÀejevee' ekeÀlee
# `leeleekeÀ' Je `Hee<ekeÀ' ?

**कु. पूजा देशमुख,** बी.ए. तृतीय वर्ष

चीनधील वुहान प्रांतात 'कोरोना' विषाणूचा उगम झाला, हे आता सर्वश्रुत आहे. चीनमधील नर संहारानंतर या विषाणूचा फैलाव हा हा म्हणतात अतिवेगाने जगातल्या सर्वच राष्ट्रात झाला आहे. जगात आम्हीच बलशाली, शक्तीशाली; आमचाच वर्चस्वी परमाणू पण एका विषाणूमुळे अमेरिका, जपान, इटली, फ्रान्स, चीन या राष्ट्रांनी अक्षरश: गुडघेच टेकले आहेत.

आजपर्यंत जगात अनेक संसर्गजन्य साथीचे रोग आले आणि आले तसे काही दिवसात निघून ही गेले. कोरोना सारखे तळ ठोकून बसले नाहीत. जगातल्या अखिल मानवाला लॉकडाऊन करुन ठेवावे लागले नाही. या आजारावर अद्याप तरी लस उपलब्ध झाली नसल्यामुळे लोकांमध्ये 'कोरोना' विषाणूची दहशत निर्माण झाली आहे. त्यावर प्रभावी लस म्हणजे घरात बसून राहणे, लॉकडाऊन करुन घेणे, रस्त्यावर न फिरणे, प्रशासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे. 'पळा रे पळा'...! म्हणून सतत धावपळ करणारा माणूस आता घरात बसून जगाची चिंता आणि मानवाच्या सहअस्तित्त्वाचे चिंतन करु लागला आहे. जगातील जीव घेण्याचा स्पर्धेत माणूस स्वत:ला विसरुन गेला. स्वत:च्या अमर्याद गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाने वृक्षांची जंगले नष्ट करुन सिमेंट काँक्रेटचे जंगले निर्माण केली त्यामुळे जागतिक तापमान वृध्दी वाढत आहे. दुष्काळ, पाण्याची टंचाई या गोष्टीचा सामना करता करता आता कोरोनाचा प्रहार होत आहे. त्यामुळे 'कोरोना' या विषाणूने जगभरात थैमान घातले आहे. लोक जीव मुठीत धरुन जीवन जगू लागले आहेत. माणसाला माणसाची भीती वाटू लागली आहे. अशाप्रकारे कोरोनाचे समाज जीवनावर झालेले घातक, वाईट परीणाम पुढील प्रमाणे नमूद करता येतात. ते असे–

१) जागतिक पातळीवर आर्थिक महामंदी निर्माण झाली आहे.

२) हातावर पोट असणाऱ्या कामगार, मजुरांचे हाल बेहाल झाले आहेत.

३) आधिच कासव गती, त्यात कोरोनाची भीती.

४) जगभरात पन्नास लाखाहून अधिक रुग्णांची वाढती संख्या (आजमितीची ही संख्या आहे.)

५) वेगवेगळ्या राज्यातील कामगारांना स्वगृही

जाण्याच्या अडचणी.

६) लॉकडाऊनमुळे आर्थिक चक्र थांबले आहे.

७) गर्भवती मातेच्या नाळेला जखमांचा धोका वाढला आहे.

८) मृतांच्या अत्यंविधीला नातेसंबंधाची आलेली मर्यादा.

९) सण आणि महोत्सवा वर आलेली बंदी.

१०) शहरांकडून खेड्याकडे कोरोनाची होत असलेली वाटचाल.

११) ऑनलाईन शिक्षणाचे घडे घेण्यासाठी सर्वसामान्य विद्यार्थ्यांना येत असलेल्या अडचणी.

१२) 'कोरोना' उपचारासाठी प्लाझमाचा होत असलेला काळाबाजार.

अशा प्रकारे कोरोना या विषाणूंमुळे समाज जीवनावर होत असलेले वाईट किंवा विनाशक परिणाम सांगता येतात. नाण्याला दोन बाजू असतात. 'कोरोनाची एक बाजू अगदी वाईट आहे.' नक्कीच मानवी जीवनात दहशत निर्माण करणारी ठरली आहे. पण त्याच्या दुसऱ्या बाजूचाही आपणास विचार करावा लागेल.

कोरोना ही महामारी संकट नव्हे तर एक मोठी संधी म्हणून त्याच्याकडे पाहिले तर नवीन दिशा, नवीन वाटा प्राप्त करता येतात. 'वाईटातूनही चांगले होत असते.' फिनिक्स पक्षी हा जसा राखेतून भरारी घेवून आपले ध्येय गाठतो. इतिहासात आपण पाहिले आहे अनेक युद्ध, लढाया झाल्या, अस्मानी, सुलतानी संकटे आली पण त्यातून मानवाने शोध आणि बोध घेऊन प्रगती केली. कोरोना–कोरोना आज संपूर्ण जगाने याचा 'धसका' घेतला असला तरी त्यातून सकारात्मक धडाही घेतला पाहिजे.

**कोरोनाचा समाजजीवनावर झालेले चांगले परिणाम पुढील प्रमाणे दर्शविता येतात.**

१) आज रस्ते, चौक मोकळे श्वास घेत आहेत.

२) वाहनांच्या 'ट्राफीकची' समस्या दिसत नाही.

३) जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात घटले आहे.

४) स्वदेशी चळवळीला चालना मिळाली आहे.

५) अपघाताचे प्रमाण लक्षणीय घटले आहे.

६) गुन्हेगारीचे प्रमाण अंत्यत कमी झाले आहे.

७) लग्नकार्य अंत्यत मोजक्या लोकात व अनावश्यक खर्च टाळून केले जात आहेत.

८) जंकफूड, फास्टफूड खावून लोकांचे आरोग्य बिघडण्याचे प्रमाण घटले आहे.

९) प्लॅस्टीक मुक्त भारत निर्मितीला गतीमानता मिळाली आहे.

१०) सण, उत्सव, मेगा महोत्सवात होणारा अनाठायी खर्च व अनावश्यक लोकांची गर्दी लॉकडाऊन मुळे कमी झाली आहे.

११) हागणदारी मुक्त गाव अभियान गतीमान झाले आहे.

१२) तंटामुक्त गाव चळवळीला गती मिळाली आहे.

१३) चित्रपटगृहे, मॉल, रेस्टॉरंट बंद मुळे लोकांचा वेळ व पैसा मोठ्या प्रमाणात वाचत आहे.

१४) 'Work from Home' या नवीन संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

१५) लॉकडॉऊन मुळे कुटुंबात प्रेम स्नेह, जिव्हाळा, सलोखा, माया, ममता एकोपा मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

१६) मद्य, तंबाखू, गुटखा यावर बंदी केल्यामुळे अनेकांनी व्यसने सोडली आहेत.

१७) लॉकडॉऊन मुळे लोकांना अत्यावश्यक

कामाशिवाय घर सोडू नये याची शिस्त लागली आहे.

१८) समाजभान जपणाऱ्या समाजकार्य करणाऱ्या लोकांनी मदतीचा हात पुढे केलेला आहे.

१९) सरकारकडून व सेवाभावी संस्थाकडून अन्नधान्याच्या किट्स, सॅनिटाईझर, मास्कचे वाटप करण्यात येत आहे.

२०) लॉकडॉऊन नंतरच्या काळात आपआपल्या राज्यातील तरुणांना स्वगावी, स्वराज्यात, स्वजिल्ह्यात रोजगाराच्या नोकरीच्या नवनवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

२१) K.G. to P.G. च्या विद्यार्थ्यांना Online धडे मिळू लागले आहेत.

२२) नोकरदार माणसाच्या आयुष्यात आज झूम मिटींग, झुमतासिका, झुमवर्ग, ड्युओ मिटींग, गुगल मिटींग 'Webinar', 'Online Seminr' या माध्यमातून आपआपली कामे (वर्क फ्रॉम होम) केली जात आहेत.

अशा प्रकारे इतकेच नव्हेतर नव्या शतकाची वाटचाल करताना आधुनिक जगाची वाटचाल रीती रिवाज समजून घेण्याची जणू संधी निर्माण झाली आहे.

सारांश, असे म्हणता येइल, की जगातील अनेक विद्‌वानांनी अनेक जागतिक परिषदा घेवून, चर्चासत्र आयोजित करुन पर्यावरणाचे कसलेच नियोजन करु शकले नाहीत. शाश्वत विकासाच्या केवळ गप्पाच ठरत होत्या. पण कोरोना या विषाणूने मानवाला घरात लोटले आणि निसर्गाची जणू साफ सफाईच केली. आज नद्याचे पाणी शुद्ध होत आहे, ध्वनी प्रदूषण, वायू प्रदुषण घटले आहे. या विषाणूने माणसाचे डोळे उघडले आहेत. मानवी जीवनाला एक प्रकारे शिस्त लावली आहे. माणसातील अहंकार, राग, द्वेष मत्सर, हेवे दावे नष्ट केले आहेत.

आज माणूसकीचा झरा वाहू लागला आहे. डॉक्टर, पोलीस, नर्स, सफाईकामगार स्वत:च्या जीवाची पर्वा न करता आपला जीव धोक्यात घालून कोरोनाग्रस्त रग्णांना वाचवत आहेत. रुग्णांना सेवा देत आहेत. देशावरच्या जवानाप्रमाणे दिवस – रात्र ते रुग्णांची काळजी घेत आहेत. युद्ध अजून जिंकायचे आहे, 'इन योध्दोंयो का करो 'सन्मान' तो देश जितेगा कोरोना से हरहाल' असा सकारात्मक विचार अंगिकारुन राष्ट्रीय एकोपा, राष्ट्रीय एकात्मता, भाईचारा, सद्‌भावना मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या सर्व गोष्टी म्हणजे संपूर्ण जगात 'न भूतो न भविष्यती' परिवर्तन घडून येत आहे. म्हणून 'कोरोना' हे महामारी संकट नव्हे तर एक नवीन संधी म्हणून आपण पाहिले पाहिजे. अंधाराची कितीही युगे आली तरी माणूस प्रकाशवाट निर्माण करणार आहे. गेल्या अठ्ठावीस युगापासून विठ्ठलही विटेवर उभा आहे. माणसानेही आता सकारात्मक दृष्टीकोण ठेवून उभे राहण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे. उद्या आपणच कोरोनावर मात करणार आहोत. अंधारलेल्या वाटेवरचा उजेड आपणच निर्माण करणार आहोत...!

◆◆◆



# keÀejevee DeeeCe J³emevecekelee ...!

**कु. प्रगती पांचाळ,** बी.ए. तृतीय वर्ष

**कोरोनाची निर्मिती –**

कोरोनाची निर्मिती चीनमध्ये झाली. दररोज चीनमध्ये कोरोना या रोगाची संख्या जास्त प्रमाणात वाढत होती. तेथील कर्मचारी, डॉक्टर, नर्स, सफाई कामगार, पोलिस इत्यादीनांही रोगाची लागण झाली. तरीही हे कर्मचारी आपल्या कुटुंबापासून दूर राहून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपले कर्तव्य पार पाडत आहेत. हा रोग वटवाघळाच्या मांसापासून म्हणजे कच्चे मांस खाल्याने हा रोग झाला असे मानले जात आहे. हा रोग झपाट्याने जगातील प्रत्येक देशात तेजीने वाढत आहे. या रोगावर आणखी लस सापडली नाही. तरीही अमरिकेत एका महिलेवर लस देऊन चाचणी केली त्यानंतर उंदरावर, मांजरावर आणि इतर प्राण्यांवर लस देऊन चाचणी केली.

हा रोग प्रथम भारतात म्हणजे दिल्लीत आला. एका समाजाची बैठक होती त्या ठिकाणी प्रत्येक जिल्ह्यामधील लोक सामील होते त्या बैठकीच्या काळात 'कोरोना' रोगाची लागण १५० लोकांना झाली ते लोक दिल्लीहून आपल्या जिल्ह्यात जात असताना त्यांना आपणाला लागण झाली हे त्यांना जाणवत नव्हते. म्हणून इतर लोक त्यांच्या संपर्कात आल्यामुळे ह्या लोकांना कोरोनाची लागण झाली. त्या ठिकाणी मुंबई, दिल्ली, पुणे, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, बीड, नाशिक, मालेगाव, यवतमाळ, वर्धा ज्या ठिकाणी हे लोक गेले, तिथे कोरोना पोहचला. म्हणून जिल्हांना कोरोना सील केले आहे. मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ही वाढवण्यात आला आहे. पोलिस फोर्स कमी पडत असल्यामुळे पोलिसांच्या मदतीसाठी म्हणून इतर कर्मचारी म्हणजे तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक, आशा कार्यकर्ता इत्यादी प्रत्येक गावा गावात अँटी कोरोना फोर्सची निर्मिती केली. कलेक्टरच्या आदेशाप्रमाणे लोकाना सूचना देण्यात आल्या परजिल्हातून येणाऱ्या लोकाना मेडिकल करुन क्वारंटाईन झोन मध्ये १४-१५ दिवस ठेवण्यात येत आहे. खेड्यामध्ये सुद्धा गाव पातळीवर कोरोनाचा शिरकाव होवू नये म्हणून गावे ही सील केली गेली आहेत.

**कोरोनाची लक्षणे –**

१) सर्दी.

२) खोकला.

३) ताप.

४) श्वास घेण्यासाठी त्रास.

असे लक्षण आढळून आलेल्या व्यक्तींपासून इतर व्यक्तीने ३ फूट अंतर लांब राहणे, हाच एक रामबाण उपाय आहे.

**कोरोनापासून सावध राहण्याचे उपाय** –

१) वारंवार सॅनिटायझर लाऊन पाण्याच्या धारेखाली हाथ धुणे.
२) हाथ धुतल्यावर तोंडाला, नाकाला, डोक्याला स्पर्श न करणे.
३) शिंकताना किंवा खोकताना तोंडाला व नाकाला रुमाल लावणे किंवा बांधणे.
४) वारंवार मास्क घालणे किंवा रुमाल बांधणे.
५) दुसऱ्याच्या हाताला स्पर्श न करणे.

व्यसन म्हणजे व्यसनामध्ये वेगळे प्रकार आहे त्यामध्ये दारु, गुटखा, तंबाखू, मद्यपान करणे इत्यादी ही सगळे व्यसने मानवाच्या जीवनाला धोका निर्माण करतात. तरीही लोक या व्यसनाला न घाबरता, कधी ही एकदा मरायचे आहे असे म्हणून व्यसन करतात ते धोकादायक आहे.

*'संसार तोडू*
*पण*
*दारू न सोडू'*

असे व्यसन करणारे लोक म्हणतात. लोकांना दारु सुटत नव्हती, आजच्या माहगाईमुळे त्याच्या खाण्यासाठी कांही नसले तरी चालेल पण दारु ही त्यांच्यासाठी आवश्यक बनली होती. दारुमुळे कित्येक लोकांचे संसार उद्धवस्त झाले आणि त्यामुळे संसार लागत नव्हते. दारु पिऊन आल्यावर घरामध्ये मारपीट, भांडण, किरकिऱ्या होत असत. बायकोला, लेकराला घराच्या बाहेर काढणे.

*'दारुच्या पाण्यापाई*
*संसार वाया गेला गं बाई'*

राज्य सरकारने कायदे केले, पण त्यामुळे काही फरक पडला नाही. त्यांना आता मात्र हाताला काम नाही आणि पैसा नाही, म्हणून दारु सुटली आहे, असे म्हणता येते. दारुमुळे कित्येक महिला पोलीस स्टेशन अंतर्गत महिला समुपदेशन केंद्रामुळे त्यांच्या तक्रारी येऊन त्यांना ६ महिने दोघांना वेगवेगळ्या तारखा देऊन दोघाचे म्हणणे ऐकून घेऊन, पुन्हा दोन्ही व्यक्तींना एकत्र बोलवून घेऊन, समोरासमोर तुटलेली मनं जोडून त्यांचे संसार एकत्र करुन दिली आणि त्यामुळे महिला पोलीस अधिकाऱ्याने त्यांना संसार उपयोगी वस्तू देऊन त्या नवऱ्याने दारूसाठी लेकरं, बायको एकत्र घेऊन त्यांना चांगल्या वळणाला लावले. त्या महिला अधिकाऱ्याने त्यांच्या गाडीत नेऊन थाटामात त्यांचा सत्कार केला.

आता मात्र दारु पिणाऱ्यासाठी सुद्धा एकच बाब कठीण आहे ती म्हणज दारुची किंमत! ही आता ३ पटीने वाढली आहे. दारुला सोन्याच्या बरोबरीने भाव आला आहे. आता कोणत्याही प्रकारचे ज्याला व्यसन आहे, त्याला मात्र आता व्यसन सोडण्याची गरज आहे. ज्या व्यक्तींना, जी व्यसने होती ती व्यसने आता सोडली आहेत. आता त्यांच्या घरात दिवाळी सारखे वातावरण असून ते अगदी आनंदात संसार करीत आहे.

त्याच व्यक्ती आता असे म्हणत आहेत, 'दारु सोडवा, जीवन वाचवा'...! आताच्या परिस्थितीनुसार काही व्यक्तींना कसल्याच प्रकारचे व्यसन राहिले नाही, असे म्हणतात येईल. आता मात्र आमचा गांव खरोखर या कोरोनामुळे 'व्यसनमुक्त' झाले आहे.

◆◆◆



# keÀejevee®³ee heeéeYeceeJej Peeueue heejJeIeve

**शुद्धोधन वाघमारे** , बी. ए. तृतीय वर्ष

मानवी समाज हा सतत परिवर्तनाच्या दिशेने जात असतो. निसर्गात होणारे बदल हे त्याला स्वत:त आणि स्वत:च्या परिस्थितीत बदल करायला भाग पाडत असतात. आदिम काळापासून माणूस आणि निसर्ग यांच्यात बदलाचा झगडा सुरू असलेला दिसून येतो. निसर्ग माणसाच्या आधी निर्माण झाला. निसर्गातूनच माणूस निर्माण झाला. हे जरी खरे असले तरी माणसाने निसर्गाला सतत ओरबाडले आहे. संधी मिळताच माणूस निसर्गाच्या विरुद्ध वागत असतो. निसर्गाला आपल्या मर्जीनुसार लुटत असतो. मात्र निसर्ग हा शेवटी माणसाचा बाप आहे. हे यासारख्या आपत्ती वरून वारंवार सिद्ध झाले आहे.

**नैसर्गिक आपत्ती आणि माणूस**

जगाच्या उत्पत्ती पासूनच निसर्ग आणि माणूस यांच्यात संघर्ष असलेला दिसून येतो. कधी माणूस पुढे तर कधी निसर्ग पुढे अशाप्रकारे एकमेकांचा लपंडाव आपल्याला पहावयास मिळतो. निसर्गाने माणसाला जन्मास घातले. त्याचबरोबर निसर्गातूनच निर्माण झालेल्या फळभाज्यावर, धान्यावर माणूस जगतो. निसर्गातूनच माणसाने स्वत:साठी शेती आणि निवारा निर्माण केला. हे सगळे खरे असले तरी माणूस निसर्गाच्या नेहमीच विरुद्ध वागत आला आहे. त्यामुळे निसर्गानेही आपले रौद्ररूप धारण करून माणसाला वेळोवेळी वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे.त्यामुळे कोरोनासारखी नैसर्गिक आपत्ती ही माणसासाठी नवी गोष्ट नाही. याच्या आधीही अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना माणसाला तोंड द्यावे लागले आहे. कधी कोरडा दुष्काळ, तर कधी ओला दुष्काळ , कधी भूकंप, तर कधी महापूर, तर कधी वादळी वारे अशा अनेक नैसर्गिक संकटांपासून माणसाने आतापर्यंत स्वत:ला वाचवले आहे.

**साथीचे रोग**

नैसर्गिक आपत्ती बरोबरच आतापर्यंत अनेक साथीच्या रोगांनी माणसाला हैराण केले आहे. कोरोनाच्या आधी संपूर्ण जगाला प्लेग सारख्या रोगाने हैराण केले होते. प्लेग हा उंदरापासून माणसात पसरलेला रोग. प्लेगचा संसर्ग झालेल्या माणसाला प्रचंड ताप येत असे. तसेच त्याच्या काखेत आणि

जांघेत मोठ–मोठे गड्डे उठत असत आणि त्यातच माणसे मरत असत. या आजारात माणसं कोंबड्यासारखी पटापट माना टाकून मरत असत. म्हणून या आजाराला 'पटकी' असे म्हटले जाते.

तसं पाहिलं तर माणसाचं शरीर हे रोगाचं माहेरघर म्हटलं जातं. त्यामुळे अनेक रोग, आजार माणसाला जडतात. मात्र त्यापैकी साथीचे आजार हे मानव जातीसाठी भयंकर असतात. जसा प्लेग होता, तसाच हा कोरोना आहे. ज्याप्रमाणे प्लेगवर, टीबीवर, देवीच्या रोगावर आणि हागवकीवर माणसाने मात केली त्याचप्रमाणे माणूस यावरही मात करील हे नक्की.

**'कोरोना'ने केलेले परिवर्तन**

कोरोना सारखी जागतिक महामारी बऱ्याच मोठ्या कालखंडानंतर संपूर्ण जगात पसरली असून, या महामारी मुळे संपूर्ण समाजात मोठा बदल झालेला दिसून येतो. या जागतिक महामारीचे परिणाम यापुढील काळात आपल्याला भोगावे लागणार आहेत. लॉकडाऊनच्या काळात आपण पाहिले, हजारो मजूर स्त्री पुरुष लहान मुले आपल्या गावाच्या ओढीने रस्त्याने शेकडो किलोमीटर पायी चालत होते. भारतासारख्या लोकशाही देशात लोकांचे सरकार असूनही लोकांना कोरोनाच्या काळात सरकारने अक्षरक्षः हा वाऱ्यावर सोडलेले दिसून आले.

सोशल डिस्टन्स, फिजिकल डिस्टन्स, कॉरन्टाईन, होम कॉरन्टाईन , संस्थात्मक कॉरन्टाईन असे भारी भारी शब्द वापरून माणूस आपल्या माणसापासून, गावापासून, घरादारापासून दूर केला गेला. कोरोनामुळे समाजात भयग्रस्तता निर्माण झाली आहे. जे लोक आपल्या गावापासून दूर आहेत, त्यांना आपल्या घरी आपण जाऊ किंवा नाही याबद्दल शाश्वती उरली नाही. या काळात लोकांचा सरकारवरचा विश्वास उडून जावा अशी परिस्थिती निर्माण झाली. काही दानशूर व्यक्ती, समूह पुढे आले. परंतु ती मदत तोकडी पडली. आणि संपूर्ण कामगार मजूर वर्ग कोरोनामुळे कोलमडून पडला. यापुढील काळात कोरोनाच्या संकटामुळे भयावह परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून शिक्षण, आरोग्य हे प्रश्न अधिक तीव्र होतील अशी शक्यता आहे. म्हणून या काळात सरकारने पूर्णपणे आरोग्यसेवेचे आणि शिक्षणाचे राष्ट्रीयकरण केले पाहिजे. सर्वांना सारखे आरोग्य आणि सारखे शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे. तरच आपला समाज कोरोनाच्या काळात तग धरू शकेल, असे मला वाटते.

◆◆◆

कोणतेही संकट नुसते येत नाही, तर ते काहीतरी धडा देऊन जाते. कोरोनाच्या साथीने आपल्या, कंपन्याना त्यांची कार्यसंस्कृती बदलणे भाग पाडले आहे. कार्यालय म्हणजे कर्मचाऱ्यांची गर्दी, गजबज आणि गोंधळ असे असलेले समीकरण आता मोडीत निघेल. कारण, या संपर्कातून संसर्गाची भीती आहे.

**– कु. शिवानी मेकाले (बी.ए. प्रथम वर्ष)**



## Deelee leue veVe hemee vene...
## meKeeve ekeAce peieve ...Deve ekeAce Keeve...?

**सुरज पवार,** बी. ए. तृतीय वर्ष

'... आता तेल नुन्न पैसा नही... सुखानू प्रश्न पडेत... किम जगनू किम खानू... सरकार मदत कराइ नैना...तेलनुन्नी मदत पायजेल... सात मनुष्य किम जगनू ...? रोडपर पालंचं मारी...!' अशा भावव्याकुळ शब्दांत 'घिसाडी' भाषेतून शासनाला भारतबाई चव्हाण या महिलेने आर्त हाक दिलीय.. !

नांदेड –लातूर रस्त्यावरील छ. शिवाजी महाराज चौकाच्या नजीक... भारतबाई चव्हाण ह्या ...आपले पती श्रावण व मुलांसह एक छोट्याशा पाला मध्ये वास्तव्य करून गेल्या १५ वर्षा पासून राहतीय... पती श्रावण चव्हाण हे दररोज त्यांच्याकडे येणाऱ्या कामाच्या मोबदल्यातून आपलं घर चालवत असतात... म्हणजेच त्यातून तेल.. मीठ... मिरची... जिरे.. आदी जीवनावश्यक साहित्य खरेदी करतात ...रॅशन कार्ड असल्यामुळे घरातील ७ जणांचे दरमहा धान्य मिळते... दररोजच्या 'घामाच्या' कामाचे या कुटुंबियांना मुश्किलीने... कधी १०० तर कधी १५० रुपये पदरात पडतात ...यातूनच या कुटुंबाचा आनंदी संसार चिल्या–पिल्यांसह चालू होता ...!

पण कोरोना विषाणूमुळे ...आणि त्यापासून होणाऱ्या संसर्गजन्य मृत्यू सारख्या परिणामांमुळे... यांच्या आनंदी जीवनात माशी शिंकली ...! गेल्या २२ मार्च २०२०पासून यांचा भाता... वा कोळश्याचा शेक पेटलाच नाही ... ? ऐरणीचे घाव तप्त झालेल्या लोखंडावर बसलेच नाहीत... ना कधी कोणता शेतकरी ...वा कोणता व्यक्ती... खुरपे ...विळे... कुऱ्हाड... कत्या ...सब्बल ...यासारखे अवजारे घेऊन तयार करण्यासाठी ...वा दुरूस्तीसाठी साधे फिरकले सुद्धा नाहीत ...सध्या लोखंडही विकत मिळत नाही...त्यामुळे औजारे तयार करता येत नाहीत.. त्यामुळे जगण्याचे मोठे प्रश्नचिन्ह त्यांच्या समोर आता तब्बल १५ दिवसानंतर उपस्थित झाला

असल्याचे भारतबाई म्हणाल्या...!

पुढे त्या म्हणाल्या की... आता येथून सहा... सात... दिवस काढावेत तर कसे काढावेत...? या प्रश्नाची...अन् जगण्याच्या भावनेची दुखरी सल ...त्यांच्या मनातल्या भावभावनेला वाट मोकळी करून देत आहेत...!

भारतबाईचा एक छोटा मुलगा शाळेत जातो...तो पाचवीत आहे... बाकी सगळी माणसं पालातच राहतात... घिसाडी काम करतात...याच जागी गेल्या १५ वर्षांपासून अहमदपूर येथे वास्तव्य करून राहत असल्यामुळे ...व आपल्या समाजाची काही घरे येथेआहेत असे त्यांनी म्हटले... भाऊ राम घिसडी काम करतो... पण आज आम्हा प्रत्येकाच्या समोर जगण्याचा प्रश्न आ वासून उभा राहीला आहे...? रेशेन दुकानातून तांदूळ आणि गहू मिळाले खरे... पण गहू दळण्यासाठी कमीत कमी पायलीला १५ रुपये मोजावे लागतात... ते दळणाचे पैसे आणायचे तर कुठून अणायचे ...जवळची असलेली रक्कम तेव्हाच संपली...! तेल ...मीठ... मिरची... जिरे ...भाजीपाला ... वर खर्चून ...उडून गेली ...आता जवळ एक छदामही नाही ...मग गहू कशाने दळून आणायचे...? हा नगदी सवाल आमच्यासमोर उभा आहे ...?असेही भारतबाई चव्हाण आर्ततेने उद्गारल्या...!

बरे , आम्ही गहू पैशा आभावी दळून नाही आणले ... अन् तांदूळच खायचे ठरवले. तर तांदळाचा भात कशा बरोबर खायचा...? हा आणखी प्रश्न मागे उरतोच ...? माय –बाप सरकारने आता किमान या रस्त्याच्या बाजूला... पालामध्ये आयुष्य कंठणाऱ्या 'घिसाडी' समाजाच्या व्यथा... वेदनांची ... दखल घेऊन या भीषणसंकट काळात... लॉकडाऊनच्या... आणि कोरोना साथीच्या दुर्धर प्रसंगात ... किमान तेल ...मीठ मिरची उपलब्धी करून देण्याची सोय करून द्यावी ... असे केले तरच रस्त्यावरील या पालातील लोक जगू शकतील ... अन्यथा आमचे काय होईल हे... आम्हांला माहीत नाही ... अशी आर्त... केविलवाणी हाक ... भारतबाई चव्हाण यांनी दिली आहे...!

अहमदपुरातील याकुटुंबासह इतर 'घिसाडी' कुटुंबियांच्या तेला... मिठाची तजवीज येथील तहसील विभाग... पोलीस ठाणे... येथील नेते... नगरपालिका... नगरसेवक... पुढारी... पदाधिकारी... प्रतिष्ठित नागरिक... नेहमीच मदतीसाठी धावून जाणाऱ्यांनी वा दात्यांसह आदिंनी स्वंस्फुर्तपणे पुढे येऊन या कुटुंबाना मदतीचा हात पुढे करणे आजचे परम कर्तव्य ठरणारे आहे.

◆◆◆

साथीमुळे सुरु असलेले लॉकडाऊन आणि अन्य निर्बंधामुळे सगळे समाज जीवन विस्कटले आहे. साथीनंतरचे जग फार वेगळे असेल, याची जाणीव आता होऊ लागली आहे. येणाऱ्या जगात 'आत्मनिर्भरता' महत्त्वाची आहे.

**– होळे हणुमंत (बी.ए. तृतीय वर्ष)**



# `keÀeeJn[-19' ®ee ceneceeje DeeeCe cenejeäeleeue jepekeÀejCe...!

**परमेश्वर सूर्यवंशी** , बी.ए. तृतीय वर्ष

आपणाला विज्ञानाच्या सहाय्याने कितीही प्रगती केली आहे असे वाटत आसले तरीही कोव्हीड १९ या संसर्गजन्य आजाराने जगाला फार मोठ्या संकटात टाकले आहे. पण जगाने अशा संकटासमोर हतबल होऊ नये म्हणून निसर्गानेच प्रचंड बुद्धीमता आसलेले शास्त्रज्ञ जगाला दिले आहेत. या शास्त्रज्ञाच्या रुपानेच जग आशेचा किरण शोधत आहे. कारण या पूर्वीच्या वेगवेगळ्या महाभयंकर रोगावर शास्त्रज्ञांनी औषध शोधलेली आहेत. या महामारीचा मुकाबला करण्यासाठीही शास्त्रज्ञ अहोरात्र झटत आहेत. त्यांच्या कष्टाला निश्चित फळ येणार आहे.

पण, दरम्यानच्या काळात या महामारीने बाधीत लोकाचे जीव वाचवण्यासाठी वैद्यकीय कर्मचारी, पोलीस, प्रशासनातील इतर घटक अहोरात्र झटत आहे. जनताही मोठ्या प्रमाणात या घटकाच्या पाठीमागे उभी आहे. कारण जनतेला हे आपल्यासाठी जीव धोक्यात घालत आहेत याची जाणीव आहे. महाराष्ट्रातील सरकारही या महामारीचा मुकाबला करण्यासाठी लोकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी आहे. असे आसले तरी जागतिक स्तरावर या महामारीच्या संदर्भात जगच चायनाकडे बोट दाखवत आहे कारण या महामारीच्या अनुषंगाने चायनाने जगाला ज्याप्रकारे अंधारात ठेवले आणि त्या पाठीमागून जगाला संकटात लोटण्याचे जे राजकारण केले ते जगाला अजिबात आवडले नाही. असे आसले तरी जगातील अनेक देशांना औषधी निर्मितीच्या क्षेत्रात बहुतांश प्रमाणात अवलंबून रहावे लागते. म्हणून, कांही देश चायना सोबत संबंध राखून आहेत.

भारतासारख्या लोकशाहीवादी देशात अंतर्गत राजकारणामुळे संकट कोणतेही असो जनता मात्र प्रभावित होत असते कारण भारतासारख्या मोठ्या लोकशाही प्रदेशात राजकीय व्यवस्था, राजकीय घडामोडी व राजकारण या विषयी लोक जागरूक असणे लोकशाही शासन व्यवस्थेसाठी चांगली बाब आहे. पण ही जागरुता व्यक्तिनिष्ठ व पूर्वग्रहदूषित असू नये हे अपेक्षित आहे. किंबहुना भारताला त्या प्रकारचा वारसाही नाही आपल्याला माहीत आहे. इंग्रज सरकार अडचणीत असेल तेंव्हा गांधीजींनी अशा परिस्थितीचा कधीही फायदा घेतला नाही याचा अर्थ त्यांनी निकोप राजकारण केले.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष प्रभावी व जिवंत असले पाहिजेत किंबहुना लोकांनीही तशी व्यवस्था

निर्माण करुन ठेवली पाहिजे त्या शिवाय लोकशाही यशस्वी होवू शकत नाही. पण त्या विरोधी पक्षाकडून जनतेची अपेक्षा असते, की तो जागरुक आणि शुद्धीवर असला पाहिजे याचाच अर्थ असा की विरोधी पक्षाने कोणत्या वेळेला सरकारला घेरले पाहिजे याची जाणीव विरोधी पक्षाला असावी लागते. संकटाच्या काळात जर विरोधी पक्ष सत्तेची संधी शोधत असेल तर त्या विरोधी पक्षाचा उद्देश चांगला नाही असा त्याचा अर्थ होतो.

महाराष्ट्रातील भा.ज.पा. च्या नेत्यांनी जागतिक महामारीला रोखण्यासाठी आपले वेतन महाराष्ट्र सरकारला देणे अपेक्षित होते. कारण केंद्र सरकार पेक्षा राज्य सरकारची आर्थिक अडचन अधिक असते भा.जा.पा. च्या नेत्यांनी जाणीवपूर्वक आपली मदत पी.एम. फंडाला केली. यात काही गैर नाही पण तेवढीच मदत सी.एम. फंडाला केली असती तर महाराष्ट्रातील जनतेला योग्य वाटले असते आणि विरोधी पक्षाविषयी जनतेत आणखीन आदर वाढला आसता आणि त्याचा भविष्यात पक्षाला फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विरोधी पक्षाची बैठ बोलावली त्या बैठकीत विरोधी पक्षांनी आपल्या अनुभवाचा सरकारला मार्गदर्शनपर फायदा रुन देणे अपेक्षित होते. पण तसे कांही घडले नाही हे जरी खरे असले तरी विरोधी पक्षातील मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी संकटाच्या काळात सरकारला न घेरता जे कांही मार्गदर्शन केले यातून त्यांची राजकारणातील प्रगल्भता लक्षात येते.

महाराष्ट्रातील भा. ज. पा. चे नेते 'कोरोना' संसर्ग रोखण्यास महाविकास आघाडीला जिम्मेदार मानत आहे. पण जगाचा विचार करता प्रगत राष्ट्रातील लोकांना सुद्धा या महामारीवर उपाय सापडला नाही. याचा अर्थ अमेरीका, फ्रान्स, इंग्लड, इटाली इत्यादी राष्ट्रातील सरकारे त्याला जिम्मेदार आहेत असा त्याचा अर्थ होत नाही. पण सातत्याने जगातील इतर राष्ट्रांचा विचार करता सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्यात जो समन्वय दिसतो तो समन्वय भारतासारख्या लोकशाहीवादी देशात दिसत नाही. कारण महाराष्ट्रातील बी.जे.पी. चे नेते ज्या प्रमाणे 'कोरोना' संसर्ग रोखन्यात महाराष्ट्र अपयशी ठरल्याची टीका करत असताना हे विसरत आहे. त्यांचीच सरकारे आसणारी राज्ये मध्यप्रदेश व गुजरात या राज्यालाही हा संसर्ग रोखन्यात म्हणावे तेवढे यश आले नाही. त्याचप्रमाणे केंद्रसरकारलाही हा संसर्ग रोखन्यात म्हणावे तेवढे यश आले नाही. कारण केंद्र सरकारनेही म्हणावी तेवढी गंभीरता या प्रश्नाच्या अनुषंगाने घेतली असली तर बाहेर देशातून येणाऱ्या आपल्याच प्रवाशांना विमानतळावर रोखून त्या संदर्भात महत्वाची पाउल उचलली असती तर राज्य सरकारवर हे संकट कोसळले नसते पण महाराष्ट्रातील बी.जे.पी. च्या नेत्यांना केंद्र सरकार दोषी वाटत नाही. कारण, केंद्र सरकार त्यांच्याच पक्षाचे आहे. राज्य सरकारने अडचणीत असताना केंद्र सरकारने म्हणावी तेवढी मदत केली नाही तसेच आपल्या पक्षाचे सरकार नसणाऱ्या राज्यांना म्हणावी तेवढी मदत केली नाही. अशी चर्चा महाराष्ट्रातील सरकारकडून केली जात आहे.

महाराष्ट्रातील विरोधी पक्षाने म्हणजेच बी.जे.पी. च्या नेत्यांनी पक्षीय राजकारणात घटनात्मक प्रमुख मा. राज्यपालांनाही ओढले. त्यामुळे महाराष्ट्रात सत्ताधारी पक्ष संवाद करायला तयार असताना सुद्धा या संकटाच्या काळात मा. राज्यपाल, मुख्यमंत्री व विरोधी पक्ष नेते यांच्यात सुसंवाद नसल्याचे लक्षात आले. कधी नव्हे तेवढी चर्चा मा. राज्यपाल पदाची

या काळामध्ये झाली.

डिसेंबर २०१९ मध्ये महाविकास आघाडीच्या सरकारने मा. राज्यपाल कोट्यातून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करावे अशी शिफारस केली होती. या शिफारशी संदर्भात बरीच चर्चा झाली.

त्यामुळे महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांना कोणत्याच सभागृहाचे सदस्य होता येत नव्हते. जे, की त्यांना सहा महिन्याच्या आत हे सदस्य होणे अपेक्षित होते. या संधीचे सोने होईल अशी अपेक्षा महाराष्ट्रातील विरोधी पक्षात होती त्या अनुषंगाने राजकीय खल निर्माण होत होता. पदाचे अधिकार अयोग्य पद्धतीने ताणले जात होते.

◆◆◆

'कोव्हिड-१९' च्या साथीने आपल्या जीवनात बरीच उलथापालथ घडवून आणली आहे. साथीनंतरचे जग कसे असेल? काय होईल? वगैरे बाबत माहितीचा धबधबा रोज वाहतोय. मार्च मध्ये लॉकडाऊन सुरु झाल्यावर पुढील नऊ महिन्यानंतर मुलांच्या जन्माचे प्रमाण वाढेल. असा दावा काही तज्ज्ञांनी केला होता. पण, तो फोल ठरणार असल्याचे दिसते. कारण, साथीनंतरचे जग कसे असेल? याची काळजी असलेल्या असंख्य जोडप्यांनी सध्यातरी मूल नको, असा निर्णय घेतला आहे. आधीच प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात हा निर्णय योग्य असला तरी युरोपातील आणि उत्तर अमेरिकेसारख्या कमी लोकसंख्या असलेल्या देशात या निर्णयाचे विपरीत परिणाम होतील.

**- कु. विद्या राठोड, (बी.ए. प्रथम वर्ष)**

'कोव्हिड-१९' विषाणूच्या साथीमुळे घरात राहून काम (डब्ल्यूएफएच) करण्याची पद्धत आता रुजू लागली आहे. पाश्चात्य देशांमध्ये हा प्रकार नवा नसला, तरी आपल्या भारतीयांना त्यांची अद्याप सवय झालेली नाही. पण लॉकडॉऊनमुळे घरातूनच काम करणे भाग आहे. अशा प्रकारे काम करण्याची एक पद्धत असते. ती अंमलात आणून आपल्या कार्यसंस्कृतीत वाढ करणे गरजेचे आहे.

**- कु. रागिर श्रावणी (बी.ए. प्रथम वर्ष)**

## Meçç Meçç... JemeOeje eJeÞeelee keÀjle³e...!

**हणमंत होळे,** बी.ए. तृतीय वर्ष

आपण आजारी पडल्या नंतर डॉक्टर आपणास 'बेड रेस्ट' घेण्याचा सल्ला देतो मग वसुंधरेला ही बेड रेस्ट ची गरज नाही का ? आज संम्पूर्ण जगात 'कोव्हिड - १९' या व्हायरसने मृत्यूचे तांडव माजवले आहे यावर उपाय म्हणून संपूर्ण जग आज 'लॉकडाऊन' मध्ये आहे त्या मुळे कारखाने वाहतूक सर्व काही बंद आहेत त्याचा चांगला परिणाम म्हणजे प्रदूषण हे खूप झपाट्याने कमी झाले आहे. नद्या शुद्ध झाल्या आहेत. हवा शुद्ध झाली आहे इतकेच नसून चंदीगड मधून २०० की.मी. वरील हिमालय पर्वत स्पष्ट डोळ्यांना दिसू लागले आहे याचाच अर्थ आपली वसुंधरा विश्रांती घेत असून त्याचा परिणाम आपणास पाहावयास मिळत आहे.

◆◆◆

## Melee keÀOeene Þeÿ®e...!

**संतोष सोनकांबळे,** बी.ए. तृतीय वर्ष

'कोव्हिड - १९' यालाच लाडाने करोना हे सुंदर नांव असले तरी संपूर्ण जगाला या महामारीने रडविले आहे. यावर उपाय आज पर्यंतर कोणी स्पष्ट सांगु शकलेले नाही किंवा कोणती लस तयार झालेली नाही. या मुळे संपूर्ण जगाची कार्यव्यवस्था ठप्प पडलेली आहे. आज आपण पाहतो देशाची आर्थिक राजधानी मुंबई मधून पलायन करणाऱ्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, राज्यातील कामगारांची संख्या सर्वाधिक आहे. घराकडे जात असताना हे त्याना प्रचंड समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

पूर्वी शेतीला उच्च स्थान होते व नोकरीला कनिष्ठ होते ते दिवस पुन्हा आज या महामारी निमित्त केलेल्या 'लॉकडाऊन' मुळे झालेले आहेत. जगातील प्रत्येक उद्योगधंदा बंद आहे. मात्र केवळ शेती हा एक असा उद्योग आहे. जो की भारतात देखील 'लॉकडाऊन' काळात देखील सुरळीत चालू होता. याचाच अर्थ असा होतो की शेती ही श्रेष्ठ होती आणि श्रेष्ठच राहणार यात शंका नाही.

*जय जवान जय किसान !*

◆◆◆

## Hevne ieÈ³eele iee[ie yeeOeeJee ueeieleeue...!

**शुभम् गुंजरगे,** बी.ए. तृतीय वर्ष

संपूर्ण जग 'कोव्हिड - १९' या संसर्गजन्य महामारीला तोंड देत आहे. हा आजार थुंकीतून फार लवकर पसरतो व खोकलल्या मुळे व शिंकल्यामुळे देखील वेगाने याचा प्रसार होतो. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हे घातक ठरु शकते विदेशात पूर्वी पासूनच या संदर्भात कडक कायदे आहेत व दंड लावण्याची तरतुदी आहेत. मात्र आपल्या देशात रस्त्यावर थुंकणे हा कायदेशीर गुन्हा असला तरी त्याचे पालन कोणीही करीत नाही.

पान, तंबाखू, गुटखा या सारखे पदार्थ खावून आपल्या देशात रस्त्यावर खुलेआम लोक थुंकताना दिसून येतात. तसेच सरकारी कार्यालय, महाविद्यालयाच्या जिन्यावर, कोपऱ्यात खुले आम सूचना लिहलेले असताना देखील थुंकतात. यावर उपाय म्हणजे पूर्वी जशी गळ्यात गाडगी बांधत असत तसेच आधुनिक गाडगे गळ्यात बांधावी लागतील त्या शिवाय पर्याय नाही...!

◆◆◆



# `keÀejevee'®ee eveeecelee Je peieYej Peeueuee Ûemeej

**विष्णूदास पांचाळ,** बी.ए. तृतीय वर्ष

'कोरोना' व्हायरस हा एक विषाणूंचा भाग आहे. या व्हायरसमुळे सस्तन प्राण्यांना आणि पक्षांना विविध रोग होतात. यात गाईंना व कोंबड्यांना होणाऱ्या अति साराचा आणि होणाऱ्या सस्जन रोगाचा समावेश आहे. या विषाणूंचा प्रसार मानवामध्ये स्वसन संसर्गाने होतो. हे संसर्ग बऱ्याचदा सौम्य, परंतु, संभाव्य प्राणघातक असतात.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहानमध्ये या व्हायरस पहिली ओळख झाली आणि त्यांनतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला, व त्याने महामारीचे रुप घेतले.

**कोरोना निर्मिती :**

'कोरोना' व्हायरसच्या निर्मितीबाबत अनेक शोध समोर आलेले आहेत. जेव्हा चीनमध्ये 'कोव्हिड-१९' ची प्रकरणं झपाट्यानं वाढू लागली, तेंव्हा एका मेडिकल अभ्यासानुसार हा व्हायरस वढवाघूळ याच्यापासून तयार झालेला आहे.

'कोरोना' व्हायरस हा विषाणू प्रथम १९६० च्या दशकता सापडलेला आहे.

**'कोरोना' व्हायरस निर्मिती होण्यासाठी लक्षणे:**

'कोव्हिड-१९' व्हायरस वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या प्रकारे प्रभावित करतो. बऱ्याच संक्रमित लोकांमध्ये सौम्य ते मध्यम लक्षणे असतातत आणि त्यांना रुग्णालयात दाखल न करता ते बरे होतात.

**सामान्य लक्षणे :**

१) ताप.
२) कोरडा खोकला.
३) थकवा.

**अधिक सामान्य लक्षणे :**

१) वेदना होणे .
२) घसा खवखवणे.
३) जुलाब होणे.
४) डोळे लाल होणे.
५) डोके दुखी.

**गंभीर लक्षणे :**

१) श्वास घेण्यास त्रास होणे किंवा श्वास लागणे.
२) छातीत दुखणे किंवा दबाब येणे.
३) बोलता न येणे किंवा हालचाल करता न येणे.

वरील काही लक्षणे कोरोना निर्मिती होण्यासाठी ही लक्षणे असतात.

**'कोरोना' व्हायरसचा जगभर झालेला प्रसार :**

हा रोग कसा पसरतो याबद्दल काही तपशील निश्चित केले गेले आहेत. (W.H.O.) जागतिक आरोग्य संघटनेने आणि अमेरिकेच्या 'गैटप फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशल' (S.D.C.) या संस्थाच्या म्हणण्यानुसार, हे विषाणू मुख्यत: दोन व्यक्तिंच्या जवळच्या संपर्काच्या वेळा तसेच खोकता, शिंकता येणे किंवा बोलताना बाहेर व थेंबाद्वारे पासरतात. जवळचा संपर्क म्हणजे, एक मीटर अथवा ३ फूट समजले जाते.

सिंगापूरमधील एका संशोधनात असे आढळले आहे की, खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर न केल्यास किंवा मास्कचा वापर न केल्यास कोरोना व्हायरस रोग (Covied - 19) विषाणू हवेतून १५ पुटापर्यंत लांब पसरु शकतात. हे विषाणू जवळच्या लोकांच्या तोंडात किंवा नाकात शिरतात आणि श्वासो द्वसाद्वारे फुफ्फुसांमध्ये पोचतात. प्रारंभिक अभ्यासानुसार कोरोना व्हायरस रोग (Covied - 19) विषाणूंच्या संक्रमीत व्यक्तींची संख्या ही दर सहा ते सात दिवसांनी दुप्पट होते. आणि याचे मूलभूत प्रमाण हे २.२ – २.७ असल्याचे मानले जाते, परंतु ७ एप्रिल २०२० रोजी प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार वुहान मधील साथीच्या सुरुवातीच्या काळात संक्रमित व्यक्तिंची संख्या ही दर २.९ ते ३.३ दिवसांनी दुप्पट झाली होती.

जेंव्हा एखादी व्यक्ती एखाद्या दूषित भागाला स्पर्श केल्यानंतर त्याच हाताने डोळ्यावर, नाकात किंवा तोंडाला स्पर्श करते तेंव्हा अशा कृतीने ती व्यक्ती संक्रमित होते त्यास फोमेट ट्रान्समिशन म्हणून ओळखले जाते.

संक्रमित व्यक्तीच्या मूलमूत्रातून विषाणूंचे संक्रमण पसरते अशी शंका व्यक्त केली जात असली तरी हा धोका कमी असल्याचे ही मानले जाते.

लक्षणे दिसू लागताना हा विषाणू सर्वात जास्त संक्रमक असतो परंतु लक्षणे नसतानाही व ती उद्‌भवण्याची ही एखाद्या व्यक्तीद्वारा विषाणू पसरवला जाण्याची शक्यता आहे, परंतु अशी जोखीम कमी असल्याचे मानले जाते. युरोपीयन सेंटर फोन डिसीज प्रिव्हेशन एंज कंट्रोल (E.C.D.C.) या संस्थेच्या म्हणण्या नुसार हा रोग किती सहजतेने पसरतो हे पूर्णपणे स्पष्ट नसले तरी एक व्यक्ती साधारणपणे दोन ते तीन इतर व्यक्तींना संक्रमित करते.

अशा प्रकारे कोरोना व्हायरसचा जगभर प्रसार झालेला आहे.

◆◆◆

लॉकडॉऊन मध्ये दरवाजाचीही कडी काढतांनाही लोक घाबरत आहेत. तसे घाबरण्याचे कारण नाही. कोरोना पेक्षाही 'भयाचा' व्हायरस झपाट्याने पसरत आहे. कोरोनाला भिण्याचे कारण नाही. तो दुरुस्त होणारा आहे. आत्मविश्वासाने जगावे.

**– शेख अमेर (बी.ए. प्रथम वर्ष)**




**कु. मनीषा दराडे** , बी.ए. तृतीय वर्ष

**प्रस्तावना** –

भारत देश हा दक्षिम आशिया मधील एक प्रमुख प्राचीण महान स्वरुपाचा मानला जाणार देश आहे क्षेत्रफळाच्या दृष्टिने विचार केला असतात जगातील ७व्या क्रामांकाचा सर्वात मोठा मानला जाणारा देश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारताला हजारो वर्षाचा वैभवशाली इतिहास आहे. भारताने आजपर्यंत जगाला नम्रता. बुद्धिमता, सभ्यता, सदाचार, एकता, एकात्मता भाईचारा, साहिष्णूता धर्म निरपेक्षता आदर्श मूल्य मोठ्या प्रमाणात दिली आहेत. संबंध विश्वामध्ये भारता तितकी विविधता, भिन्नभिन्नता कुठेच नाही.

भारत हा गरीब लोकांचा श्रीमंत देश मानला जातो. माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी असे म्हटले होते, भारत हा २०२०मध्ये महासत्ताक राष्ट्र होइल त्या दिशेने भारताची वार चाल चालू आहे. उदा. 'Make India', 'Digital India', 'Cash Less India' अशा पद्धतीने भारत देश महासत्ताकाची वाटचाल करत आहे. परंतू 'Covid-19' मुळे जगाबरोबरच भारताच्या परिवर्तन चक्राला गतिरोधक लागला असला तरी देशाचे खंबीर नेतृत्त्व करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच आपल्या देशाची मान सदैव ऊंच राहील या दृष्टीने त्यांचे कार्य चालूच आहे. त्यामध्ये आवर्जून उल्लेख करावा लागल तो म्हणजे 'आत्मनिर्भर' भारत योजनाचा या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे १३० केरोड भारतीयांना 'आत्मनिर्भर' बनवणे होय.

'कोरोना' महामारीमुळे सर्वच देशाच्या अर्थव्यवस्था संकटात सापडल्या आहेत. त्यामुळे या संकटातून बाहेर पडण्यासाठी पंतप्रधान नेरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भ भारत उभारण्याच्या दृष्टीने पाऊल उचलण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी केंद्रसरकार तर्फे एक स्पेशल घोषणा केल्यानंतर या पॅकेज मध्ये नक्की काय असणार आहे. याचा खुलासा अर्थमंत्री सीतारामन् यांनी केला. अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेले 'पॅकेज' हे सुमारे २० लाख कोटीचे आहे. हे पॅकेज देशांच्या एकूण जीडीपीच्या १०टक्के असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. तर, अर्थमंत्री सीतारामन यांनी जाहीर केलेले बुस्टर मध्ये महत्त्वाच्या पाच घोषणा पुढील प्रमाणे आहेत.

१) लघु आणि मध्यम उद्योगक क्षेत्रात बळ.

२) विदेशी कंपन्याचा पत्ता कट.
३) टी.डी.एस. मध्ये २५टक्के कपात.
४) विनातारण कर्ज पुरवठा.
५) विदेशी कंपन्याशी स्पर्धा आता संपुष्टान येणार.
अशा प्रकारे भारतीय नागरिकांनी आता इतर कुठल्या देशाच्या कुबडयान घेता आत्मनिर्भरता निर्माण केली पाहिजे. आपल्या देशातल्या तरुणांकडे इतर देशाच्या तुलनेत टँलेट, आहे कुशाग्र बुद्धीमत्ता आहे, हार्डवर्क पॉवर आहे. कौशल्य विकासाची गुणवत्ता आहे. फक्त या तरुणांकडे या गोष्टी करण्यासाठी भांडवल नाही त्यामुळे असे तरुण. गाव, खेडे सोडून शहराकडे, देशातून विदेशाकडे स्थलांतर होतात आणि स्वत: मालक न होता दुसऱ्यांचे नोकर होवून आयुष्यभर लाचारीने जीवन जगतात आज मुळे विदेशातून लाखो भारतीय तरुण पुन्हा बेकार होवून मायदेशी परतले आहेत. त्यामुळे अशा तरुणांनी आपल्या गावी राहून नवीन नवीन कुटीर उदयोग, लघु उद्योग, मत्स्य व्यावसाय, पशु पालक व्यवसाय, खेळणी व्यव साय सोलार व्यवसाय, पारंपरिक वाद्यनिर्मिती व्यावसाला, साहित्य, संगीत, कला वस्त्रोउद्योग, डिझायनिंग, कला, कुसर अशा व्यावसायाला तरुणांनी चालना यावी. मेड इन इंडिया नावाने वस्तूचे उत्पादन करुन (Local to Global) असे उद्दिष्टे साधले पाहिजे.

यासाठी 'आत्मनिर्भर' भारत योजना अशा रोजगार करणाऱ्या तरुणांना अर्थसहाय्य केले, ज्यामुळे भारताचे नवीन चेहरा जगासमोर येईल.

भारत देशाची आर्थिक नाडी म्हणजे शहरे नसून ग्रामीण किंवा आदिवासी, क्षेत्र आहेत. म्हणून ग्रामीण, आदिवासी, खेड्यातील तरुणांनी आता लघु – उद्योग, कुटीरउद्योगात पुढाकार घ्यावा, स्वंयप्रकाशीत व्हावे, आणि राष्ट्राला महासत्ताक बनवण्यासाठी स्वत: 'आत्मनिर्भर' बनावे. व्यक्ती, कुटुंब, समाज, सक्षम बनल्याशिवाय खऱ्या अर्थाने राष्ट्रविकास किंवा राष्ट्रसक्षम होऊ शकत नाही. 'Covid-19' ने आपले डोळे उघडलेले आहेत. संकटाना घाबरून न जाता त्यावर आपण आता मात केली पाहिजे. आणि राष्ट्राची आर्थव्यवस्था नव्याने उभारण्यासाठी ग्रामीण भागातून तरुणांनी पुढाकार घेतला पाहिजे.

मे महिन्याच्या १२ तारखेला पंतप्रधान नरेंद्र मोदीनी आत्मनिर्भर भारतांची हाक दिली तेव्हापासून विविध प्रसार माध्यमातून त्या बाबत चर्चा आणि कार्यप्रणाली सुरु आहे. 'अत:दीपभव' हा महात्मा बुद्धांचा संदेश या गोष्टी लक्षात घेतल्या तर 'आत्मनिर्भर' भारताची संकल्पना नवीन नाही 'जोडुनियां धन उत्तम व्यव्हारे : उदास विचारे वेच करी' ही समर्थ रामदासाची शिकवण आहे. तोच आशय पंतप्रधानाच्या भाषणातील आहे. मधल्या काळात मोदी सकारने 'स्टॉर्टअप इंडिया', 'स्टँडअप इंडिया', 'मेकईन इंडिया' यासारख्या कार्यक्रमाना प्राधान्य दिले व भारताचा विकास घडवून आणला. तसेच मुद्रा कर्ज योजना हे याच भूमिकेचे फलित होत. आणि आता 'आत्मनिर्भर' भारत योजना घेवून भारतातल्या सर्वात शेवटचा, तळागळातल्या, उपेक्षित वंचित घटकातील पण हुशार कुशाग्र तरुणांना त्यांनी नव्याने ही हाक दिली आहे.

*'चला, आत्मनिर्भर' बनू या,*
*नव भारत निर्माण करु या... !'*

◆◆◆




# `keÀejevee' jepekeÀe³e vel³ee®³ee keÀþeCe hejer#ee®ee keÀeU

**कु. पल्लवी पाटील,** बी.ए. तृतीय वर्ष

चीनच्या वुहान शहरामध्ये नोव्हेंबर २०१९ च्या मध्यास 'कोरोना' महामारीची साथ उद्भवली व फोफावली यामुळे चीनमध्ये अनेक लोकमृत्यू पावले.त्यानंतर चीनमधून कोरोना आजार जगभर पसरला. फेब्रुवारी मार्चपासून इटली, अमेरिका व इतर ही साथ वाढू लागल्यावर जगात लोकांना थोडी कल्पना येवू लागली व कोरोना विषाणूच्या संहारक शक्तीचा प्रत्यय आला. साथीचा प्रादुर्भाव झाल्यावर चीनने लगेच ते जाहीर करुन जागतिक आरोग्य संस्थेला (W.H.O.) खरी माहिती दिली असती. तर या साथीचा जगभरातील प्रसार ९५ टक्क्यांनी कमी होऊन एवढी मनुष्यहानी झाली नसती.

'कोरोना' माहामारीमुळे व नंतर जगभरात झालेल्या लॉकडाऊनमुळे सर्वत्र अत्यंत विषय व विरादक चित्र निर्माण झालेले आहे. भारतात गृहकलह, घटस्फोट एकाकीपणा, चिंता, भीती आणि नैराश्य या सगळ्यांचे प्रमाण पंचेवीस टक्क्यांनी वाढलेले आहे. नैराश्याची कारणे व त्यावर उपाय निघतील पण, समाजातली अस्थीरता, विषमता प्रचंड स्पर्धा, व्यक्तीवाद, स्वार्थीपणा, आत्मकेंद्रीपणा व पैशाला व प्रतिष्ठेला आलेले प्रचंड महत्व ही मन:स्थितीला कारणीभूत असलेली कारणे दूर केल्याशिवाय मानसाची भीती व नैराश्य दूर होणार नाही. कोरोना माहामारीमुळे जगातील १८० देश होरपळून निघालेल आहेत. या कोरोना माहामारीचे राजकीय आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिणाम काय होणार आहेत ? याचा विचार गांभीर्याने करणे आवश्यक आहे.

भारतातील व जगातील कोरोना महामारीचा झालेला प्रसार पाहिल्यानंतर राजकीय नेत्यांच्या कठीण परीक्षेचा काळ आपणास पहावयास मिळतो.

'कोरोना' महामारीमुळे भारतातील सर्वच राजकीय पक्षांच्या सत्ताधारी व विरोधी नेत्यांच्या सत्वपरीक्षेची घडी आलेली आहे.

सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांना 'कोरोना' महामारीमुळे जनतेत प्रत्यक्ष सहभाग घेऊन काम करता येत नाही. कारण सोशल डिस्टनसिंग पाळणे राजकारण्यांना खुपच कठीण जाते व पाळला तर कार्यकर्ते नाराज होतात. कार्यकर्त्यात सामील झाल्यावर कोरोना होण्याची शक्यता जास्त असते. राष्ट्रवादी पार्टीचे नेते व महाराष्ट्राचे गृह निर्माण मंत्री श्री . जितेंद्र आव्हाड हे कार्यक्षम मंत्री परंतु त्यांना

कोरोना झाला. त्याचबरोबर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे सध्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोकराव चव्हाण यांनाही कोरोनाची लागण झाली. या दोन मंत्र्यांकडे पाहून बाकीचे मंत्री, आमदार, खासदार उंदराप्रमाणे आप आपल्या घरात गुपचूप बसून आहेत. राजकारणी लोकांना जनतेपासून सोशल डिस्टन्सींग ठेवून राहणे जमत नाही. कार्यकर्ता व नेता यामध्ये स्वार ठेवण्यासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. बहुतेक आमदार, खासदार, मंत्री हे जनते पासून दूर गेलेले आहेत. सध्या नेत्यांना कोरोनाची लागण होऊ नये म्हणून 'एकांत' पसंद आहे.

सत्ताधारी नेत्यांप्रमाणेच विरोधी पक्ष नेत्यांची व कार्यकर्त्यांची गोची झालेली आहे. कोरोना निवारण, नियमानुसार सध्या सभा, संमेलन, आंदोलने, निदर्शने, राजकीय, सभा घेता येत नाहीत. राजकीय रॅल्या काढता येत नाहीत, एवढेच काय चौकाचौकातील मिटींग घेता येत नाहीत.

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी अत्यंत कार्यक्षम नेतृत्त्व करीत असताना विरोधी पक्षनेते श्री देवेंद्र फडणवीस यांनी व भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्र बचाव आंदोलनासाठी 'मेरा आंगण, मेरा रणांगण', निदर्शने केली. या आंदोलनाच्या आध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत काळे मास्क, काळे शर्ट, काळी रिबीन, काळे बोर्ड घेऊन मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडी सरकारचा विरोधी केला.

भारतीय जनता पक्षाचे हे आंदोलन यशस्वी झाले नाही. महाराष्ट्र बचाव या आंदोलनापासून भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते  दूरच राहिले कारण त्यांचा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रामाणिक कार्यावर विश्वास आहे.

जगभरातील प्रमुख नेत्यांना कोरोना महामारीची लागण झाली. परंतु भारतातील राष्ट्रीय स्तरावर नेतृत्त्व करणारे नेते कोरोना पासून चार हात दूर आहेत. याचे कारण, म्हणजे जनतेला वाऱ्यावर सोडून देण्याचे कार्य केंद्र सरकार करीत आहे. इंग्लंडचे प्रिन्स चार्ल्स जर्मनीची चान्सलर, दक्षिण सुदानचे उपराष्ट्रपती व त्याचा संरक्षणमंत्री अफगाणीस्तानचे आरोग्यमंत्री रशियाचे सांस्कृतिक मंत्री, स्पेनचे उप पंतप्रधान, मोनकोचे राजपुत्र, युरोपीयन युनीयनेचे प्रमुख मामकेल बर्निअर, ब्राझिलचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार या प्रमुख नेत्याना कोरोनाची लागण झालेली आहे. कारण हे नेते जनतेत जनजागृती करीत फिरत होते.

कोरोना महारमारीमुळे भारतातील अनेक राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर, जगभरात अनेक देशातील पार्लमेंटच्या निवडणुका सहा महिने पढे ढकलल्या आहेत.

'कोरोना' महामारीचे सावट आणखी वर्षभर तरी राहणार आहे. असे काही तज्ज्ञांचे मत आहे. कोरोनामुळे भारताचा जी.डी.पी. ८ वरुन ६ टक्के आलेला आहे. देशाची प्रचंड आर्थिक हानी झालेली आहे. अशा वाईट आर्थिक महामंदीच्या काळात केंद्र सरकारने विजय माल्ल्या, मेहुल चॉकक्सी अशा देशद्रोही, करबुडव्या लोकांची ६८ हजार कोटी रुपयांची धकबाकी माफ केली आहे.  सामान्य जनता उपाशी झोपतआहे.

सिंगापूर विद्यापीठाच्या एका अहवाला नुसार भारतात मे महिन्याच्या शेवटी व जगभरातून जून महिन्याच्या पाहिल्या आठवडयात कोरोनाचे संकट कमी होईल आणि डिसेंबर महिन्यापर्यंत हे 'कोरोना' संकट पूर्णपणे नष्ट होईल कारण ऑक्टोबर पर्यंत कोरोनाची व्हॅकसिन उपलब्ध असेल असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

◆◆◆



# `keÀejevee-19' Deej Deepe keÀe Yeejle

**कु. अंजली बनसोडे,** बी.ए. तृतीय वर्ष

'कोरोना' एक वायरस जनित रोग है। जिसने महामारी का रुप ले लिया है। और समस्त संसार में तबाही मचा रहा है। इस रोग की शुरुआत जुकाम एवं खासी मात्रा से होती है। जो धीरे – धीरे आगे चलकर एक विकराल रुप ले लेती है। और रोगी के स्वसन तंत्र को बुरी तरह प्रभावित करती है। इतनी बुरी तरह की कई बार रोगी की मृत्यू हो जाती है।

विश्व स्वास्थ संघटन (W.H.O.) ने कोरोना वायरस को महामारी घोषित कर दिया हैं. कोरोना वायरस बहुत सुक्ष्म लेकिन प्रभावि वारस है। कोरोना वायरस मानव के बाल की तुलना में ९०० गुना छोटा हैं, लेकिन कोरोना का सक्रमण दुनिया भर तेजी से फैल रहा है।

कोरोना वायरस (सीओएवी) का संबंध वायरस के ऐसे परिवार से है। जिसके संक्रमण से जुकाम से लेकर सांस लेने में तकलीफ जैसी समस्या हो सकती है। इस वायरस को पहले कभी नही देखा है। इस वायरस का संक्रमण दिसंबर में चिन के वुहान में शुरु हुआ था। के मुताबिक बुखार, खांसी, सांस लेने में तकलीफ इसके लक्षण हैं। अब तक इस वायरस को फैलने से रोकने वाला कोई टिका नही बना है।

इस के संस्करमण के कल स्वरुप बुखार जुकाम सांस लेने में तकलीफ नाक बहना और गले में खराश जैसी समस्याएँ उत्पन्न होती है। यह वायरस एक व्यक्ति से दुसरे व्यक्ति में फैलता है। इसलिए इसे लकर बहुत सावधानी बरती जा रही हैं।

कोरोना से मिलते – जुलते वायरस खांसी और छिंक से गिरने वाले बुंदो के जरिए फैलता है। कोरोना वायरस अब चिन में उतनी तीव्र गति से नहीं फैल रहा हैं। जितना दुनिया के अन्य देशों में फैल रहा है। 'कोविड–१९' नाम का यह वनायरस अब तक ७० से ज्यादा देशों में फैल चुका हैं। कोरोना के संक्रमण के बढ़ते खतरे को देखते हुए सावधानी बरतने की जरुरत है, ताकि इसे फैलने से रोका जा सके।

'कोरोना–१९' वायरस में पहले बुखार, खासी होती है। इसके बद सूखी खासी हैं। और फिर एक हफ्ते बाद सांस लेने में परेशानी होने लगती है। इन लक्षणों का हमेशा मतलब यह नहीं है कि, आपको कोरोना वायरस का संक्रमण है। कोरोना वायरस के

गंभीर मामलों में निमोनिया सांस लेने में बहुत ज्यादा परेशानी किडनी फेल होना और यहाँ तक की मौत भी हो सकता है। बुजुर्ग या जिने लोगों को पहले से अस्थमा, मधुमेह या हार्ट की बीमारी है, उनके मामले में खतरा गंभीर हो सकता है। जुकाम और फ्लू में के वायरसों में भी इसी तरह लके लक्षण पाए जाते हैं।

कोरोना वायरस की पूरी तरह जानकारी निकाल लि तो, कोरोना की उत्याति सबसे पहले १९३० में एक मूर्गी में हुई थी। और इसने मूर्गी के श्वसन प्रणाली को प्रभावित किया था। और आगे चलकर १९४० में कई अन्य जानवरों में भी पाया गया है। जैसे मूर्गी, कुत्ता, चंमगादर में पाया गाया है। इसके बाद सन १९६० में एक व्यक्ति में पाया गया है। जिसे सर्दी की शिकायत थी। इन सब के बाद वर्ष २०१९ में इसे दुबारा इसका विकसल रुप चिन मं देखा गया जो अब धीरे – धीरे पूरे विश्व में फैलता जा रहा है।

कोरोना वायरस से बचने के लिए मास्क पहना चाहिए। मास्क पर सांसलेने से हाथ नहीं लगाना चाहिए। आगर हाथ लग जो तो तुरूंत हाथ धोना चाहिए। मास्क को ऐसे पहनना चाहिए की आपकी नाक, मुँह और दाढ़ी का हिस्सा उससे ढंका रहे। कोरोना का संक्रमण फैलने से कैसे रोके ? सार्वजनिक वाहन जैसे बस, ट्रेन, आटो या टैक्सी से यात्रा ना करें। घर का सामान किसी और से मंगाएं। घर में मेहमान न बुलाए। ऑफिस, स्कूल या सार्वजनिक जगहों पर न जाए। अगर आप और भी लोगों के साथ रह है, तो ज्यादा सतर्कता बरखे. अलग कमरे में रहे और सभी रसोई वन बाथरूम को लगातार साफ करे। १४ दिनों तक ऐसा करते रहे ताकि संक्रमण का खतरा कम हो सके।

*'उम्मीद मत छोड़ना, कमजोर हमारा*
*वक्त हो सकता है, हम नही...!*
*हमारा कल, आज से बेहतर होगा...।'*

भारत में कोरोंना वायरस से संक्रमित मरीजो की संख्या में लगातार बढ़ती जा रही है। देश में पिछले २४ घंटे में कोरोना के ३९६७ नए मामले सामने आए है जबकि १०० लोगों की मौत हुई है।

कोरोना वायरस के बढ़ते प्रकोप को देखते हुए कई राज्यो के साथ – साथ भारत में भी लोकडॉऊन कर दिया गया है। अब लोगों को जरुरत के सामान ही उपलब्ध हो पाएँग। जैसे, गेहू, ज्वारी, तांदुळ, इत्यादी सरकार द्वारा भारत और दुसरे राज्यों के लिए जाने वाली बसो पर भी ब्रेक लगा दिया गए है। बचत पर इसका पूरा परिणाम हो गया है। गरीब लोगों को खाने – पीने की परिशानी हो गई है। उनका रोजगार कामधंदे बंद होने के कारण लोग परेशान हैं। सब कामगारों को घर बैठने का आदेश दिया है। सबसे ज्यादा भारत की अर्थव्यवस्था खतरे में आ गई है।

*'हमें रोगी व्यक्ति से नहीं,*
*तो बल्कि, रोग से लढना है...।*
*स्वच्छ रहें और सुरक्षित रहें...।। '*

◆◆◆

# `keÀeeJe[ - 19' J³eekeÀeleele mJe®íleе

**कु. प्रगती पांचाळ ,** बी.ए. तृतीय वर्ष

'कोविड –१९' का अर्थ हैं, कि 'कोरोना' एक महामारी रोग जग में तेजीसे फैलता जा रहा है। कोरोना की निर्मिती चिन से हुई है। यह रोग पोलिस, डॉक्टर, नर्स और कर्मचारीयों को भी हो रहा है। यह लोक अपने जान की परवा न करते हुए अपने परिवार से अलग रहकर देश की सेवा कर रहे है। इस रोग पर अब तक कोई इलाज नहीं मिला । यह रोग सबसे पहले दिल्ली में आया । इसके बाद यह रोग सब जगह पर पहुँचा। मुंबई, पुणे, दिल्ली, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, बीड, नाशिक, मालेगाव, यवतमाळ वर्धा इसमें से जिन – जिन जगह पर रोगों के व्यक्ती मिले उस जगह पर सब सिल कर दिया हैं। अपने जिल्हे से दुसरे जिल्हे में जाने के लिए पाबंदी है।

पोलिस बंदोबस्त ही ज्यादा मात्रा में बढाया हुआ है। पोलिस के साथ काम करने के लिए, शिक्षक, प्राध्यापक, ग्रामसेवक, तलाठी, आशा कार्यकर्ता आदि हर गाव – गाव में १४–१५ दिन क्वारंटाईन में रखा जा रहा है।

**कोरोना के लक्षण**

कोरोना के लक्षण आम तौर पर दिखाई देनेवाले कुछ निचे दिए हुए है।

१) सर्दी ।

२) खाँसी ।

३) बुखार ।

ऐसे लक्षण दिखाई देने को बाद तुरंत डॉक्टर की सल्ला ले और उस व्यक्ती से ३ फीट दुरी रखनी चाहिए।

**'कोरोना' से सावध रहणे के उपाय :**

१) बार – बार सॅनिटाईझर से हाथ धोना ।

२) हाथ दोने के बाद मुंहको, नाक को और आँखो को स्पर्श न करना ।

३) छिंकते या खासते मुंह को रुमाल लगाना ।

४) बाहर जाते समय मुंह को मास्क लगाना। या रुमाल बांधना ।

५) दुसरों के हाथ को स्पर्श ना करना ।

१) स्वास्थ ।

२) सिर की सफाई ।

३) आँख कान और की सफाई ।

४) मुँह की सफाई ।

५) त्वचा की देखभाल ।

६) हाथ धोना ।

७) शौच के बाद सफाई ।

८) खाद्य और रसोई की स्वच्छता ।

९) चिकित्सकीय स्वच्छता ।

**१) स्वास्थ :**

जो भोजन हम खता है। हम जिस तरह अपने शरीर को साफ रखते हैं, शारिरिक व्यायाम करतें है और सुरक्षित रहने चाहिए। ये सभी हमारे शरीर को स्वस्थ बनाये रखने में बडी भूमिका निभाते हैं। कई बीमारियाँ सफाई के अभाव में पैदा होती है। केवल

साफ रहकर ही इन बीमारियों को रोका जा सकता है।

**२) सिर की सफाई :**

सप्ताह में एक या दो बार सिर की सफाई शैंपू या किसी अन्य चीज (शिकाकाई) से करनी चाहिए।

**३) आँख, कान की सफाई :**

१) अपनी आँखो को हर रोज साफ पानी से धोए।

२) कान मैं गंदगी जमने से हवा का रास्ता रुक जाता है। इससे दर्द भी होता है। इसलिए दिन में एक बार रुई से कानो को साफ करे।

**४) हाथ धोना :**

१) अपने नाखून नियमित रुप से काटे । नाखून को चबाने से और नाक खुजाने से बचे।

२) बच्चे कीचड में खेतले है। उन्हे भोजन से पहले हाथ धोने की आदत सिखाये ।

**५) खाद्य और रसोई की स्वच्छता :**

१) रसोई बनाने की जगह और बरतन को साफ रखे।

२) बासी या प्रदुषित भोजन न करे।

३) खाना पकाने और परोसने से पहले हाथ धोएं।

४) खाद्य सामग्री को अच्छी तरह रखे ।

५) रसोई की बेकार चीजों को अच्छी तरहा से फेकें।

**६) चिकित्सकीय स्वच्छता :**

१) दवा खरीदते समय एक्सपायरी की तारीख जरुर देखे ।

२) अनावश्यक दवाओं को सुरक्षित ढंग से फेंकें ।


३) डॉक्टर की परची के बिना दवा न ले ।

स्वच्छता किसी भी व्यक्ति के लिए बहुत जरुरी होता है। चाहे वह कोही भी हो क्यों न हो, हमे सदैव इसका पालन करना चाहिये। स्वच्छता कई प्रकार की हो सकती है जैसे कि सामाजिक, व्यक्तिगत, वैचारिक आदि । हमें हर अंग में इसे अपनाना चाहिये क्यों कि सबके मायने अलग होते हैं। विचारों की स्वच्छता हमें एक अच्छा इंसान बनाती है। तो वही व्यक्तिगत स्वच्छता हमें हानिकारक बिमारियों से बचाती है। इस लिये स्वच्छता के सार्वजनिक विकास हेल्थ हमें सदैव प्रयासरत रहना चाहिये।

**स्वच्छता से होने वाले फायदे**

स्वच्छता के कई फायदे है जैसे कि स्वच्छता संबंधी अच्छी आदते हमें कई बिमारियों से बचाती है। कोई भी बीमारी न केवल शरीर के लिए हानिकारक होती है, अपितु खर्च भी बढ़ा देता है। गंदे पानी व भोजन के सेवन से पीलिया, टाईफाइड, कॉलेरा जैसी खतरनाक बीमारियां फैलती है। गंदे परिवेश में मच्छर पनपते है जो मलेरिया, डैंगू, चिकन गुनिया जैसी जानलेवा बीमारिया फैलाते है। व्यर्थ के बीमारियों को बहाने से अच्छा है कि हम स्वच्छता संबंधी नियमो का पान करें ऐसा, कर के हम देश के लाखों रुपये, जो बीमारियों पर खर्च होते है बचा सकते है। व्यक्तीगत स्वच्छता के साथ – साथ वैचारिक स्वच्छता हमें एक अच्छा इंसान बनाता है। जो सदैव अपने विकास से साथ दूसरो को भी भला सौचता है और जब वदेशके सभी लोग ऐसी भावना के साथ जीने लगेंगे, तो वो दिन दूर नही जब देश स्वच्छता के साथ – साथ प्रगति के पथ पर भी तेजी से आगे बढ़ेने लेगेगा।

◆◆◆



# The Covid-19 Catastrophe has Another Face

**Akshata Devkatte,** B.A. Third Year

There is no doubt that India's higher education system tripped from slowdown to shutdown, from despair to distress in the wake of Covid-19 pandemic. Since the corona virus pandemic has caused a global lockdown. Teachers, students are forced to stay in their homes. They are anxious, scared and full of questions like, 'How to utilize the time during the self-isolation period and use it for educational growth and students' development. However one does not just be caught up in the propaganda and in pandemic nervousness, try to look to look beauty as the air quality index has miraculously improved all over the world . The air is far cleaners; the songs of the bird are now livelier and louder. In this sense, a catastrophe has another face as well and that face is not ugly. So there are lesson to be learnt and time has made available to think over educational issues and to enhance use of ELT aids. The water in the lake can be extremely pure, but it may be covered at times by a layer of green moss. When the one who seeks good drinking water just pushes the moss a bit, he can easily lift handful of water to quench his thirst. In the same way, when Covid-19 pandemic pushes into the merely physical isolation but not into solitude. It is time to intimate with the digital sources which enable to connect all.

There is no disputing that the digital India campaign launched by the government has led to a digital revolution. Today, India has 504 million active internet users. Also the ministry of human resource development (MHRD) has launched a comprehensive initiative called PM e-*vidya* which unifies all efforts related to digital/online/on-air education for further expansion of e-learning in higher education. MHRD also launched 'Bharat padhe online" campaign. There is doubt that the pandemic has presented new challenges and also opportunities for present education system. Indian educational scholars, teachers and students should be ready and equipped to reimaging the future of digital education through PM e-*vidya*, DTH source, digital apps etc. as follow:

Since Covid-19 catastrophe discovered many concepts such as lockdown, sanitizer stations, quarantine days, work-from-home, video-conference with digital technology are cherished.

**Digital Apps:** Whats App, Zoom Cloud, Google Meet, YouTube,Video share are used to teach, interact and solve the problems of students by teachers. Even students can share his knowledge with his other peers in peer discussion.

**Digital Tools:** Sound recording, Lecture/ speech/conference-webinar, poster presentation, published or unpublished interview, online journal/magazine references/ CD-ROM, DVD etc. such simple digital teaching tools are developed by software engineers to explore teaching content with data design context.

◆◆◆



# `keÀejevee'®e mekeÀì : jepeieeje®³ee veJ³ee meOee®³ee aheele

**कु. महादेवी हुल्लाळे,** बी.ए. द्वितीय वर्ष

सध्या कोरोनाने जगभरात थैमान घातले आहे. संपूर्ण जग हे कोरोनाच्या विळख्यात सापडले आहे. अर्थातच आपला भारत देश याला अपवाद नाही. कोरोनामुळे आपल्यावर अभूतपूर्व असे संकट ओढवले आहे. साहजिकच हे फार मोठे संकट आहे. परंतु मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर सतत संकटातून मार्ग काढला आहे. कोरोनातूनही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यावर उपचार नसला तरी उपाय चालू आहेत. कोणतीही लस उपलब्ध नसली तरी लॉकडाऊन, सामाजिक अंतर, वारंवार साबणाने हात धुणे, तोंडाला–नाकाला सारखा स्पर्श न करणे, शक्यतो काम असेल तरच घराबाहेर पडणे, बाहेर जाताना मास्कचा वापर करणे, सार्वजनिक ठिकाणी न थुंकणे यासारख्या उपाय योजना करून यामधून मार्ग काढला जात आहे.

संकटातून मार्ग कसा कसा काढावा हे या महामारीमुळे आपल्याला शिकायला मिळाले. संकटातून संधी कशी शोधता येईल हे कोरोनामुळे कळाले. 'कोरोना' हे जरी संकट वाटत असले तरी ही संधी सुद्धा आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. याचा आपण सकारात्मक बाजूने विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, लोक नियमांचे कडक पालन करीत आहेत. याचा अर्थ असा नाही की, लोक पूर्वी ते करायचे नाहीत. परंतु गेल्या दोन महिन्यापासून लोक ज्या पद्धतीने नियमांचे पालन करीत आहेत व जीवन जगत आहेत असे पूर्वी कधी पहावयास मिळाले नाही. मर्यादित साधन–सामग्रीचा वापर करून जीवन कसे जगावे हे कोरोना मुळे शिकता आले. निश्चितपणाने काही गोष्टींची कमतरता भासत आहे व भासणार ही आहे पण त्याला इलाज नाही.

रोजगाराच्या संदर्भात सांगायचे झाले तर कोरोना मुळे कामगार लोकांच्या रोजगारावर संकट निर्माण झाले आहे. जे लोक इतर राज्यातून येऊन कामा निमित्त महाराष्ट्रामध्ये स्थायिक झाले होते त्यांना आता काम नसल्यामुळे नाईलाजास्तव आपल्या राज्यामध्ये मूळ गावी परत जावे लागत आहे. त्यामुळे मजुरांची कमतरता भासणार आहे. परंतु सहाजिकच मजुरांच्या कमतरतेचे संकट निर्माण झाले असले तरी दुसऱ्या बाजूने विचार केला तर ही संधी सुद्धा निर्माण झाली आहे. कारण आता येथील स्थानिक भूमिपुत्रांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार

आहेत. सध्या संपूर्ण जग फार मोठ्या संकटाला तोंड देत आहे. कोरोनाच्या महाभयंकर महामारीमुळे पुढे काय होणार, कसे होणार असा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे. कारण गेली दोन–अडीच महिने सातत्याने हे संकट अधिक गडद होत आहे. मोठ्या प्रमाणावर येथील लोक आपापल्या मूळ गावी जात आहेत. महाराष्ट्रात येऊन काम करणाऱ्या लोकांची संख्या इतर राज्याच्या तुलनेत फार मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या जाण्याने नवे संकट उभे टाकले आहे परंतु यावर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासन व उद्योग विभाग सज्ज झाला आहे. ***'संकटासोबत संधी मिळते'*** हे लक्षात घेऊन आता विविध योजना व धोरणे आखली जात आहेत याचा मराठी माणसाला निश्चित फायदा होणार आहे. आता येथील स्थानिक लोकांना बोलावून घेऊन त्यांना महाराष्ट्राच्या विकासामध्ये हातभार लावण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

कोरोना मुळे अनेक कंपन्या चीनमधून बाहेर पडत आहेत. एवढेच नव्हे तर ज्या वस्तूचे उत्पादन चीनमध्ये होत होते किंवा होत आहे त्याचा वापर न करण्याचे आवाहन सर्वस्तरातून केले जात आहे. त्यामुळे देखील भारताला ***'आत्मनिर्भर'*** बनविण्यासाठी भारतातील वस्तूचा वापर करण्यावर भर दिला जात असून येथील असंख्य लोकांना व्यवसायाच्या नवीन वाटा मिळतील. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या २० लाख कोटी च्या पॅकेजमध्ये उद्योगासाठी बऱ्याच सवलती जाहीर केलेल्या आहेत. यामध्ये सेवा व उत्पादन क्षेत्राला मोठा दिलासा दिला गेला आहे. सोबतच पर्यटन, वाहतूक, आदी उद्योग क्षेत्रासाठी मोठी संधी आहे. याचा बारकाईने अभ्यास केला तर त्याचे लाभ समजू शकतात. शेती व्यवसायासाठी आता शेतमजुरांच्या फार मोठा उपयोग होणार आहे. कारण जे मजूर कामगार कामाच्या निमित्ताने शहराकडे गेलेले होते ते आता गावी परतले आहेत. त्यामुळे ते आता शहराकडे पुन्हा वळतील याची सध्या तरी सुतराम शक्यता नाही. म्हणून त्यांच्या मदतीने शेती व्यवसायाच्या समस्या नक्कीच दूर होतील.

तसेच, आपल्याकडील गो–पालन, सुतारकाम, गवंडीकाम, शेळीपालन, बांबूच्या वस्तू, काचेच्या शोभिवंत वस्तू, सामूहिक शेती, पाणी संचयनाचे विविध प्रयोग, साखर उद्योग, फळ–बागा असे कितीतरी नवीन उद्योग उभारता येतील. विज्ञान–तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करून ओसाड पडलेल्या गावांचा विकास यातून साधता येईल. आजवर गरज नसताना ऑनलाइन परदेशी वस्तूंची खरेदी करणाऱ्या राज्यातील ग्राहकांनी अधिकाधिक स्थानिक उत्पादकाकडून विविध वस्तूंची खरेदी केली तर स्थानिक अर्थव्यवस्थेला पर्यायाने देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. स्थानिक गरजूंना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन त्यांचा विकास होईल.

जसे फार मोठ्या पुरामध्ये मोठ–मोठी झाडी उन्मळून पडतात परंतु छोटी–छोटी लव्हाळी आपले मूळ घट्ट पकडून ठेवतात. ***'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती ।।'*** हे आपल्याला चांगलेच माहित आहे. त्यामुळे याचा विचार करून कोरोनाने एक प्रकारे आपल्यासमोर रोजगाराच्या नवनवीन संधी आणून ठेवल्या आहेत हे आपण ओळखले पाहिजे.

◆◆◆

# `keÀejevee' ceneceeje veJn lej SkeÀ meOee...!

**कु. प्रतिभा सुरनर,** बी.ए. द्वितीय वर्ष

इ.स. २०२० हे वर्ष संपूर्ण मानव जातीच्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असे सिद्ध होत आहे. चीनच्या वुहान या शहरातून 'कोरोना' नावाचा विषाणू हा देशभर पसरला आहे. बघता बघता त्यांनी सगळ्या देशांना गिळंकृत केले अगदी कमी कालावधीत लाखो लोकांना याचा संसर्ग झाला आणि सर्व देशांचे अर्थचक्र जाग्यांवर थांबले. करोडो लोकांचे रोजगार गेले आणि मानवी जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. या बदललेल्या परस्थितीचा वापर आपण जर संधी म्हणून केला तर येणारा काळ हा आपल्यासाठी फायदेशीर असेल चला तर मग अशाच काही कोरोना पासून मिळालेल्या संधी आणि फायद्याचा विचार करु.

**कोरोना भारतासाठी जागतिक संधी**

चीनच्या वुहान शहरापासून सुरु झालेल्या कोरोना वायरस मुळे सर्व देश त्यांचा परिणाम भोगत आहेत आणि त्यातच चीनने कोरोना वायरसची माहिती सर्वात आधी जगापासून लपवून ठेवली असा आरोप होतोय म्हणून सर्वच देश चीनवर नाराज आहेत. त्यामुळे चीनमध्ये असलेल्या परदेशी कंपन्या चीनच्या बाहेर हलवण्यास उत्सूक आहे. इथेच भारताला मोठी संधी आहे. त्या कंपण्या कशा भारतात येतील यांचे प्रयत्न करायला हवेत. उत्तरप्रदेश महाराष्ट्र सरकारने चीनमधल्या कंपन्या आपल्या भारतात याव्या अशी धडपड सुरु केली आहे. हजारो हेक्टर जमीन कंपन्यासाठी उपलब्ध रुन दिली आहे. आता भारत सरकारने देखील परदेशी कंपन्या भारतात कशा येतील या पद्धतीने लवकरात लवकर स्थाईक होतील आणि तिथल्या भूमिपुत्रांना रोजगार मिळेल यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

कोरोना उपचारासाठी भारताकडे असलेली हायड्रोक्लोरीन हे औषध कोरोनावर प्रभावी आहे. असे दिसून आले आहे. म्हणून सर्व देशांनी भारताकडे मागणी केली आहे आणि भारताने त्याची विनंती मान्य करुन औषधांचा पुरवठा केला आहे. नुकत्याच झालेल्या (W.H.O.) जागतिक आरोग्य संघटना यांच्या बैठकीमध्ये भारताच्या कामगिरीची स्तुती केली आहे. आणि भारताला (W.H.O.) मध्ये स्थान दिले आहे. डॉ. हर्षवर्धन हे (W.H.O.) च्या कार्यकारी बोर्डचे चेअरमन बनले आहेत. चीनवर असलेला सर्व देशांचा राग भारतासाठी कसा फायदेशीर होईल याकडे लक्ष दिले पाहिजे हिच भारतासाठी संधी आहे.

**'कोरोना' आणि महाराष्ट्रातील भूमीपुत्रासाठी रोजगारांची संधी**

कोरोना संकटामुळे महाराष्ट्रातले लाखो मजुर आपापल्या राज्यात परतले आहेत. त्यामुळे त्यांच्या जागा मराठी मुलांनी भरल्यास महाराष्ट्रातील भूमीपुत्रांसाठी नोकरी व धंद्यासाठी अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. आज आपण पाहतो उत्तरप्रदेश आणि बिहार येथील मजुर आपल्या गावी जाण्यासाठी धडपडत आहेत. आता हे परतलेले लवकर महाराष्ट्रात येण्याचे चिन्ह नाही त्यामुळे मराठी मुलांनी रोजगारांची प्रचंड संधी मिळाली आहे महाराष्ट्रातल्या मोठ्या शहरामध्ये पुढील काही महिन्यांमध्ये कामगारांची कमतरता जाणवणार आहे. हे उद्योगासमोरील

असलेली अडचण येथील भूमिपुत्र दूर करू शकतात. भूमीपुत्रांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी राज्यातील उद्योग, कामगार व कौशल्य विकास तर्फे कामगार ब्युरोची स्थापना केली जाणार आहे. त्यामुळे भुमिपुत्रांनी यांचा लाभ घेणे गरजेचे आहे. यासाठी स्थलांतरीत झालेले कामगार यांच्याकडे कुठल्या प्रकारचे कौशल्य आहे. याचा अभ्यास करून मराठी मुलांनी ते कौशल्य आत्मसात करायला हवे. उदा. इलेक्ट्रीशन, प्लबींग, बांधकाम व्यवसाय, हॉटेल व्यवसाय अशा प्रकारची इतरही कौशल्ये मराठी मुलांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.

तसेच मराठी मुले उद्‌योगधंद्यामध्ये जास्त रस घेत नाहीत ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे. म्हणून 'कोरोना' पासून मिळालेली रोजगार आणि उद्योगधंद्याची संधी गमावली नाही पाहिजे.

**'कोरोना' व 'आत्मनिर्भर' सक्षम भारत**

सध्याच्या परिस्थितीत कोरोनाने जगात धुमाकूळ घातला आहे. लाखो लोकांना कोरोनाची बाधा झाली आहे आणि हजारोंचे बळी घेतले आहेत. संपूर्ण जग एक खेडेगाव आहे हा समज कोरोनाने दूर केला आहे. आणि आपल्याला आत्मनिर्भर बनने किती गरजेचे आहे हे दाखवून दिले. देशात एकूण ४ वेळा लॉकडाऊन वाढवण्यात आला. यामुळे अर्थव्यवस्थेला जबर धक्का बसला. या लॉकडाऊनमुळे अंदाजे १ लाख करोड रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. लाखोच्या नोकऱ्या गेल्या अशा अवस्थेत भारताला 'आत्मनिर्भर' बनणे फार आवश्यक आहे.

फक्त एकट्या चीनबरोबर भारत दरवर्षी ९५ बिलियन डॉलर व्यापार (ट्रेडे) तो. त्यात भारताने १ बिलियन डॉलरचा एक्सपोर्ट केला यावरून असे लक्षात येते, की चीनला आपल्या व्यापारातून ५९ बिलियन डॉलर फायदा होत आहे.

आपण भारतीय चीनी वस्तू स्वस्त असतात म्हणून त्या घेण्यात धन्यता मानत आहोत. चीन आपल्याला मोबाईल, खेळणी, इलेक्ट्रानिक वस्तू असे सर्व माल कमी किमतीत विकतो आणि भारतीय कंपन्यांना यांचा तोटा होतो.

आपले पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी ही व्यापारातली तूट भरुन काढण्यासाठी भारतातला पैसा भारतातच राहावा यासाठी 'आत्मनिर्भर' भारत ही घोषणा दिली तसे लॉकडाऊनमुळे अर्थव्यवस्थेला झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी २० लाख करोड पॅकेजची घोषणा केली आहे तरीही याचा लाभ अर्थव्यवस्थेला 'मध्यम' ते 'दीर्घकालावधीत' मिळण्याची शक्यता आहे. नुकत्याच झालेल्या आर.बी. आय. चे गव्हर्नर शशिकांत दास यांच्या पत्रकार परिषदेमध्ये आपल्या देशाचा आर्थिक विकासाचा दर (G.D.P.) हा शून्य पेक्षा खाली जाण्यांचा धोका दर्शवला आहे. अशा अवस्थेत आपल्या अर्थव्यवस्थेला वाचवायचे असेल तर सर्व भारतीयांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रत्येक मालावरती आपण वस्तू घेताना एक्सपायरी डेट बघत होतो पण यापुढे एक्सपायरी डेट बरोबर 'मेड इन इंडिया' हे लिहिले आहे की नाही हे बघूनच खरेदी करु तरच आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल.

**'कोरोना' आणि पर्यावरण संवर्धन**

कोरोना व्हायरस या विषाणूंमुळे लॉकडाऊन करण्यात आले त्यामुळे पर्यावरणांचे रक्षण झाले. कोरोना वायरसच्या भितीमुळे जगातील सर्वच देशाने लॉकडाऊन जाहीर केला त्यामुळे रस्त्यावर वाहतूक बंद पडली त्यातून निघणारा विषारी वायू उदा. कार्बन डॉयऑक्साईड, कार्बन मोनाक्साईड, सल्फर डॉयऑक्साईड यांचे हवेतील प्रमाण अत्यंत कमी झाले आणि हवा शुद्‌ध झाली त्यामुळे आपल्याला

शुद्ध हवा मिळाली त्यामुळे प्रदुषणामुळे होणारे आजारामध्ये देखील कमी आली. तसेच लॉकडाऊन मुळे कारखाने बंद करण्यात आले. कारखान्यामुळे हवेत सोडणारे विषारी वायूचे प्रमाण कमी झाले. वायुप्रदूषण वाढ दूर असलेल्या ओझोन थराला जे छिद्र पडले होते ते भरण्यास मदत झाली यामुळे सूर्याची अतीनील किरणं येणार नाहीत. म्हणून वाढणाऱ्या पृथ्वीचे तापमान काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. कारखान्यामधून वाहनारे सांडपाणी अनेक नद्यांना दूषित करत होते. परंतु लॉकडाऊनमुळे सर्व नद्यांचे प्रदूषण कमी होण्यास मदत झाली.

**'कोरोना' आणि ऑनलाईन शिक्षणाचे फायदे**

ऑनलाईन शिक्षणामुळे अनेक फायदे झाले आहेत. उदा. घरबसल्या आपण शिक्षण घेऊ शकतो. त्यामुळे आपला वेळ वाचत ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होणारे प्रमाण कमी होते. ऑनलाईन शिक्षणामध्ये आपण व्हिडीओ बनवून पुन्हा पुन्हा पाहू शकतो. त्यामुळे आपला वेळ वाचतो व स्मरणशक्ती वाढते.

ऑनलाईन शिक्षणांचा फायदा ज्या मुलांना परदेशात शिक्षण घेण्याची इच्छा असते त्यांना खूप चांगला फायदा होतो. यामुळे अनावश्यक गोष्टीचा खर्च वाचतो उदा. परदेशात जाण्यासाठी प्रचंड लागणारा पैसा, प्रवासाचा खर्च, व्हिजाचा खर्च, शिक्षणांचा खर्च वाढतो म्हणून कोरोनामुळे ऑनलाईन शिक्षणाकडे वळण्याची संधी मिळाली आहे.

**'कोरोना' आणि कुटुंबसंस्था सामाजिक एकता, एकात्मता आणि सामाजिक भान**

कोरोना मुळे जगाचे खूप नुकसान झाले असले तरी कुटुंबसंस्थेवर यांचा सकारात्मक परिणाम होताना दिसत आहे. कोरोना अगोदर लोक सतत बाहेर कामामध्ये गुंतले असल्यामुळे, घरच्यांना, मुलांना योग्य तो वेळ देता येत नव्हता. परंतु, लॉकडाऊन मुळे सर्व कुटुंब एकत्र वेळ घालू शकत आहेत. आणि कुटुंबामध्ये एकता, आपुलकी आणि एकात्मता वाढलेली आहे. तसेच कोरोना मुळे मानवाला शिस्त लागली. आहे. हाताला सॅनिटायझर लावणे, मास्क वापरणे अंतर ठेवून बोलणे व गर्दी टाळणे शिस्ती मुळे 'कोरोना' आणि अन्य संसर्गजन्य रोगांना आळा बसला आहे. लोकांच्या आरोग्यात सुधारणा दिसत आहे. आणि लोक आजारी पडण्यांचे प्रमाण कमी झाले आहे.

**'कोरोना' आणि कोरोना योद्ध्यांचे कार्य**

या सर्व परिस्थितीमध्ये एक गोष्ट आपल्याला विसरता येणार नाही ते म्हणजे आपले कोरोना योद्धे, डॉक्टर, नर्सेस, पोलीस, सफाईकामगार हे आपल्यासाठी संकटाच्या वेळी देवाप्रमाणे धावून आले आहेत. या कोरोना योद्ध्याचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. हे योद्धे सतत कोरोना रुग्णांच्या संपर्कात येऊन त्यांना देखील न घाबरता डॉक्टर, नर्सेस, पोलीस सफाईकामगार आपले काम चोख पद्धतीने पार पाडत आहेत.

यात अनेक योद्धे शहीद झाले आहेत. होत आहेत. त्यांचे हे बलिदान व्यर्थ जाणार नाही. 'भारत' कोरोना बाबत 'आत्मनिर्भर' बनेल आणि यावर लवकरच प्रभावी लस शोधेल यात कसलीच शंका नाही.

◆◆◆



# ceeveJe peelee®³ee Felenemeeleuee heenuee®e `ueekeÀ[eTve' ...!

**कु. राणी मकापल्ले,** बी.ए. द्वितीय वर्ष

सध्या जगातले जवळजवळ २०० देश कोरोनाच्या गडद छायेत आहेत... जगातल्या सर्वच देशात कोरोनाने तमाम मानवजातीला 'लॉकडाऊन'मध्ये बंदिस्त केले आहे...! हा मानवजातीच्या इतिहासातला पहिलाच 'लॉकडाऊन' आहे ...! आणि तो आपण अनुभवतोय...!

'कोरोना' विषाणूंचा आजार संसर्गजन्य आहे... हा आजार बाकीच्या इन्फ्लुएंझा किंवा अन्य दुखण्या इतका प्राणघातक नाही ...आधी पासूनच आजारी असलेल्या माणसांसाठी तो घातक आहे ...कोरोनावर सध्या कोणतेही औषध नाही ...पण त्याचा संसर्ग मात्र वेगाने होतो आहे... सहजपणे होतो आहे ...त्यामुळे एकमेकांपासून लांब राहणे... आणि सतत साबणाने हात धुवत राहणे... घरात राहून व्यवस्थित झोप घेऊन ...आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे ...हेच आपल्या हातातले उपाय आहेत...! हे अगदी सोपे आणि साधे गणित आहे... पण ,आपला समाज विचित्र आहे ...!

आपल्याला रस्त्यात थुंकू नका...! नाक शिंकरू नका ...! तोंडावर हात धरूनच खोका...किंवा शिंका...! यासारख्या सवयी अगदी शाळकरी वयातच लागायला हव्या होत्या... ! पण, त्या लागल्या नाहीत... ? आज त्या सवयी शिकविण्यासाठी सुद्धा आपल्याला 'देशभक्ती' मध्ये आणावी लागत आहे ...! हे आजच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवरून आपल्या लक्षात आलेले असेलच...! आणि हे सर्व सुद्धा ...हातात दंडुके घेऊन ... ? कारवाई करून... ? पुन्हा पुन्हा बजावून सांगण्याची वेळ येतेय... ? हे आणखी एक दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल ...!

आपल्याला कोरोना हा आजार होऊ नये... हे जेवढे आणि जसे महत्वाचे आहे ...! तसेच आपल्यामुळे इतरांनाही त्याचा 'प्रसाद' मिळू नये ...! आपण त्याच्या मृत्यूला कारणीभूत होऊ नये ...! याचीही आपण खबरदारी घेतली पाहिजे ...हे सांगताना ...'हा देश माझा'...'मी देशाचा'... हे सांगण्याची वेळ येत असेल तर...! फारच , कठीण परिस्थिती आहे ...! म्हणजेच, घरातल्या झाडूने गोळा केलेला कचरा उचलण्यासाठी ...घरातलंच कच-याचं ,प्लास्टिकचं सूप वापरण्या ऐवजी... एखादा 'बुलडोझर' मागवण्यासारखं आहे ...!

या कोरोनाच्या साथीपासून आपल्या सारख्या खंडप्राय देशाला... वाचवण्याचा एकच उपाय आहे ...आणि तो उपाय म्हणजे १०० टक्के 'लॉकडाऊन' ...जो माणूस जिथं आहे ... तो तिथंच थांबला पाहिजे ...! कारण, त्याच्या थांबण्यामुळे कसल्याही पद्धतीचा.... संसर्ग होणार नाही ... म्हणून आज जगातली सगळी मनुष्यजात घरात बसली आहे... !आज कोणत्याही स्तरातील व्यक्ती कोरोनाचा बळी होण्यासाठी धजावत नाही... तरीही काही बेसावध राहणाऱ्या व्यक्ती ...मोकाट व्यक्ती... जेथे आहेत

तेथे न थांबता ये न् के न् प्रकारे ...एकमेकांच्या संपर्कात येत आहेत ... त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतोच आहे... !

अमेरिकेत आतापर्यंत कोरोनामुळे १० हजारांच्या वर व्यक्तींचा मृत्यू झालाय...स्पेन मध्ये १३७४१ तर इटली मध्ये १५ हजारांच्या वर बेल्जियम मध्ये २००० च्या वर ...बांगलादेशात १७ च्यावर तर भारतात ४४२१ च्या वर व्यक्तींचा तर पॅरिसमध्ये ९००० व्यक्तींचा ... फ्रान्स मध्ये ५००० च्यावर कोरोना ग्रस्त व्यक्तींच्या मृत्यूची नोंद झाली आहे ...या शिवाय मुंबईत आत्तापर्यंत ५९० च्या वर व्यक्ती कोरोनाग्रस्त आहेत... तर ४० च्यावर व्यक्तींचा बळी गेला आहे ... पुण्यात१५७ च्यावर व्यक्ती कोरोना बाधित रुग्ण आहेत ... येथील काही भागात संचारबंदीही लागू करण्यात आली आहे ...विनाकारण फिरणाऱ्यांसाठी ...रस्ते बंद करून त्यांच्यावर आळा घालण्यात आला आहे ... ! राज्यात आतापर्यंत ५५ च्या वर बळी गेले आहेत.... !

आज भारतातली मुंबई ...पुणे ... कोलकत्ता ...मद्रास ...बंगलोर हैद्राबाद... या सह इतर शहरे... तसेच जगातली मोठी मोठी शहरे ...शांत शांत... स्तब्ध झालेली आहेत... रस्ते निर्मनुष्य झाली आहेत ...रस्त्यावर एकही माणूस नाही ...कुठेही कसलेही कामं होत नाहीत ...कारखाने बंद आहेत ...छोटे छोटे उद्योग बंद आहेत ..ट्रेन...बसेस बंद आहेत ...एवढेच नव्हे तर उपजीविकेची सर्व माध्यमंही 'लॉकडाऊन' आहेत... ! शासनाकडून मजुरदारांना ...रेशनकार्ड धारकांना... सवलतीत धान्य पुरवठा केला जातोय ... जे जे अडकून पडले आहेत ...त्यांची स्थानिक प्रशासनाच्या वतीने सोय केली जात आहे... यामुळे दिवसरात्र कष्टाची कामे करणाऱ्यांनाही आता या सक्तीच्या 'लॉकडाऊन' मुळे सक्तीची 'विश्रांती' मिळतेय... !

अनेक दिवसांसाठी लॉकडाऊनमुळे घरी बसण्याची वेळ आली आहे... त्यामुळे घरातल्या बारीकसारीक गोष्टी आता माहिती होऊ लागल्या आहेत... एकमेकांना घर कामात मदत होत आहे...कधी नव्हे ते एवढा वेळ आणि एवढे दिवस घरातल्या सगळयाच व्यक्ती एकमेकांना देत आहेत... पण या लॉकडाऊन मध्ये एखाद्या व्यक्तीचा 'कोरोना' मुळे ...नव्हे इतर सामान्य कारणांमुळे ...वयोमानामुळे... किंवा आजारपणामुळे मृत्यू ओढवलाच ...तर त्याला शेवटच्या दहा पावलांची सोबत करायला ...माणसं ही मिळणं मुश्किल झाली आहेत... आई वडिलांसारख्या ...जवळच्या नात्यातल्या ... व्यक्तीचे निधन झाले तर ...त्यांच्या मुलांना अंत्ययात्रेला हजर राहायला मिळेल का ... ? अशी शंकाही उपस्थित होतेय ... ?

'लॉकडाऊन' मुळे अनेकांनी आपली लग्न पुढे ढकललेली आहेत ...'लग्न' हे आयुष्यातली महत्वाची घटना असते ...लग्नाच्या दिवशी ...नवरा मुलगा... नवरदेव हा हिरो असतो ... त्याला काय हवंय ... काय नकोय... ते विचारले जाते... त्यांने सांगितलेल्या गोष्टींचे लग्नाच्या दिवशी तंतोतंत पालन केले जाते... तो रुबाबदार कपडे घालतो... सगळीकडे आनंदी आनंद असतो ...पण अशा या आनंदाच्या क्षणाला... पुढे ढकलण्याची वेळ अनेक भावी दाम्पत्यांवर आलीय.. कदाचित नियतीनं त्यांनाही एक संधी दिली असावी ...'बाबांनो,... की नीट विचार करा... ? आणि आयुष्यातल्या लग्न नावाच्या कायमस्वरूपी 'लॉकडाऊन' मध्ये अडकायचं... की नाही ... ? ते ठरवा... !

◆◆◆



## `keÀejvee"le ceeCeme®e ceeCemeeuee Dee[Jee ³elee³e... !

**कु. भाग्यश्री वाघमारे,** बी.ए. द्वितीय वर्ष

जगात 'कोरोना' व्हायरसच्या संसर्गाने मृत्यूचे थैमान घातले असून... हा 'कोरोना' व्हायरस कोणत्याही पशू पक्षांमुळे वा ... प्राण्यांमुळे होत नसून तो माणसांच्या संपर्कातून होत असल्याने... महाकवी सुधाकर गायधनींच्या शब्दांत सांगायचे झाले तर... 'माणूसच माणसाला आड येतो... आणि सुखदुःखाचा खेळ होतो ...!' अशी विदारक स्थिती आज समाजात निर्माण झालेली आहे.

आजचं सामाजिक जीवन... वातावरण... सामाजिक संपर्क... देवाण... घेवाण... हस्तांतरण... यामध्ये कमालीची दरी निर्माण झाली आहे... काही दिवसांपूर्वी म्हणजे... एखाद्या महिन्यापूर्वी आपण एकमेकांना भेटलो तेव्हा अगदी आपलेपणाने... आत्मीयतेने...एकमेकांना एकमेकांचा हातात हात घेऊन... ख्याली-खुशाली विचारत असू ... काही गोपनीय माहिती सांगावयाची असेल तर... त्या व्यक्तीला बाजूला घेऊन ...त्याच्या कानाजवळ... कानात तोंड नेऊन ...नव्हे चक्क घालूनच... आपण माहिती दिली आहे... पण आता... ? छे ... छे ... त्याच व्यक्ती आज एकमेकांच्या जवळ येत नाहीत...कानात तर बोलणं शक्यच नाही... कानात काही बाही सांगू शकत नाहीत... !मग हस्तांदोलन तर कोसो मैल दूरच गेलं ... !

... होय, 'सोशल डिस्टंसिंग... !' हा आजचा नगदी धर्म झालाय... ! कोणी कितीही जवळचा असू दे... की रक्ताच्या नात्यातला असू दे... ! मित्र असू दे... ! त्याला 'सोशल डिस्टंसिंग'चं पालन करणे बंधनकारक आहे... ! जर कोणाशी संपर्क झाला... अन् दुर्दैवाने ज्याच्याशी संपर्क झालाय तो 'कोरोना विषाणूने' पीडित असेल तर... ? या भीतीने आपली गाळण उडतीय... म्हणून आज प्रत्येकांकडून ...कमीत कमी एक मीटर अंतरावर उभं राहून व्यवहार पार पाडले जात आहेत... ! ही काळाची गरज झाली आहे... हे सर्वांनाच मान्य झाल्याने... आज प्रत्येक व्यक्ती शारीरिक अंतर ठेवून वागत आहे... ! जो असे करेल तोच आज या 'कोरोना'च्या महामारीतून

सुटणार आहे... हे मात्र नक्कीय...!

म्हणजे काय...? तर... इथं आज माणूसच माणसांच्या आड येतो आहे...! कारण या माणसांच्या संपर्कातूनच 'कोरोना' विषाणूंची लागण होतेय ...पण ही झालेली लागण चट्कनही लक्षात येत नाही... ती लक्षात येण्यासाठी किमान चौदा... पंधरा दिवस थांबावे लागते... मग त्याच्यावर नंतर उपचार सुरू होतात...काही 'कोरोना' संशयीत असतील तर ...त्यांना क्वारंटाईन मध्ये... तिथंही १४ दिवस अलिप्तपणे... एकांतवासात...!अलिप्ततावाद्यांसारखं ठेवलं जातंय ... !

आजच्या जागतिक पातळीवर उसळी मारून... माणसांना हाताशी धरुन... सैरावैरा...धावत... अन् माणसांना गिळंकृत करत सुटलेल्या... 'कोरोना' च्या या पार्श्वभूमीवर माणूसच माणसाचा शत्रू झालाय... त्याच्याच संपर्कातून 'कोरोना'च्या विषाणूची लागण होतेय... म्हणून आज एखादा घराच्या बाहेर पडला रे पडला... की तो सुरक्षितरित्या घरी परत येईल याची खात्री देता येत नाहीय ... त्याचा कोणाशी ना कोणाशी तरी... कोणत्या ना कोणत्या प्रकारचा व्यवहार होतोच होतो... ! अशा वेळी मग ती व्यक्ती कोणीही असू देत... ती आपल्या पथ्यावरच आलेली असते...!

म्हणूनच अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून... देशात सध्या 'लॉकडाऊन' घोषित करण्यात आला आहे... घराबाहेर पडू नका... घरातच राहा ...! सुरक्षित राहा...! रस्त्यावर गर्दी तर कोरोनाची होईल आपल्यावर मर्जी...! असे अनेक संदेश शासकीय पातळी वरून देण्यात येत आहेत... कोणीही घराच्या बाहेर पडू नये म्हणून... पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असला तरीही ... आपल्याला काय होणारंय ... ? आत्तापर्यंत काहीही झालेलं नाही... अन् आताच काय होणार आहे... ? अशा फाजिल आत्मविश्वासाने... आणि बेदरकारपणे बाहेर पडणारे...!

... त्यातूनच वेगवेगळ्या धार्मिक... सामाजिक कार्यक्रमात... एकत्र येणाऱ्यांमुळे 'कोरोना' चा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतोच आहे.. म्हणून 'सावध ऐका... पुढच्या हाका...!' आता काळाच्या हाका... अत्यंत सावधानपणे आपण ऐकल्या पाहिजेत...! कारण आपला शत्रू आता दुसरा तिसरा कोणी नसून ... आपणच आपले शत्रू... आपणच एकमेकांचे कोरोना विषाणू 'वाहक' आहोत... महाकवी सुधाकर गायधनींच्या शब्दांत सांगायचं झालं तर –

*'माणूसच माणसाला आडवा येतो...!*
*आणि सुख दुःखाचा खेळ होतो...!!'*

... तूर्तास यापेक्षा दुसरं खरं काहीही नाही...!

◆◆◆

'कोव्हिड-१९' च्या साथीमुळे घरी बसावे लागल्यामुळे भारतीयांच्या अनेक सवयीमध्ये बदल झाल्याचे दिसून आले. काही सवयी सुटल्या आहेत. तर, अर्थव्यवस्था सावरुन पुन्हा प्रगती सुरु होण्याचा बहुसंख्यांना विश्वास आहे.

**– कु. मोहिनी मेकाले (बी.ए.प्रथम वर्ष)**

# keÀejeveejceeFyeneue HeÀkele ieej - iejeye®e !

**राहूल राठोड ,** बी.ए. द्वितीय वर्ष

तत्त्ववेत्ता क्रांतीवीर सेवाभाया केलागोतो, 'नाळी–नाळी दक आय अन् ओ दकेर इलाज कोनी लाभ' तो वसोच रोग आवगो. सारी जगेन हैरान करनाळो उ रोग कतो कोरोणा. सारी जगेर नाळेम जीव आवगो. पळं इलाज कतीकोनी सापडरो. जगेमुंडेआग सेती मोटो संकट आवगो.

ये संकटेती लढे साऊ भारत सरकार मोठे – मोठे, हजारो कोटीर पॅकेज काढरो. पॅकेजेरो लाभ मात्र पुढीभरे लोकुनच मळरो. गोर – गरीब समाज लारच रेरो, कारण गोर गरीब समाज पॅकेजेर नियमेमच कोनी बेसरो. सरकार ओंदून फक्त 'आत्मनिर्भर बंळो' केरो.

कोरोनाती बचेर हिंळू त सामाजिक अंतर रकाडळों घंळो गरजेरो छ. कारन शासन सारी देश 'Lockdown' करनाको. पण ये 'Lockdown' रे माई गोर गरीबेर हातच 'Lock' हेगे. सावकार शेटे री दकाने मात्र दाडेम चार घंटा काहेईनी चालू रकाडरे. सारी दनेरी कमाई ओमच करलेरे.

पहिलेच खेडा माग, तांडो, वाडी वस्ती र लोकुर हातेन काम कोनी मळरोतो, पेटेर भूक भगायसारु शहरेर वाड पगडली देते. पंळ वतभी आवगो कोरोना अन् जीवेर हेयलाग दशा–दशा. शहरेमाईर तिजोरी, बँके म पिसाभरमेले जको कुंई करन आरामेती खारे पळं सारी दाडो कामकिदो तोच सांजेरी बाटी मळच ऊ समाज मात्र भुकेती रोरो. घर वापस जायांकरन केरे पळ 'Lockdown' माई जातू आरो कोनी. 'Lockdown' माई जातू आरोतो फक्त मोठे लोकून. विमानेती भारेर देशती स्वत:र देशेम लोकून लियास अन् जागेरजत आडकरोनो फक्त गोरगरीब समाजेर फक्त कामगार.

'Lockdown' खुलजायर वाट देकरे पंळ 'Lockdown' वाढीर घोषणाप घोषणा हेरी करतांळीन पगेतीच घरेर वाट पकडेलाग चार – चार दन भुके रेताळीन रस्ता काटरे वाटेपरीया कोई भुकेती मररे तो कोई रेले हेट आन मररे वोणूर कोई गिनती कोनी रे आकडामात्र कोरोनारो कतरा हेगोच हाऊच टि.व्ही. परीया सारीदाडो दकाळरे.

क्रांतीवीर तत्वयेता सेवाभायार बोल खरो हेरो ''याडीन बेटा भारी हेजाय'' भाया केलागोतो. मुंबई पुणेती लोक आरे जेन गामेमार्ड कोनी आयदेरे स्वत:र याडी सुद्‌धा स्वत:र छोरा न कोणी छिपरी कोरोना तो घळमच रेगो आपंळ आपळेनच छिपेनी करण आदे झुरनच मरेलाग.

गामे, तांडेर निवडणूक र जना गाडी बांधतांळी मुंबई पुणार लोकून लावतेते पण आब चालताळी तांडेम गामेम आरेजेन कोणी आयदेरे निवडणूकीर वेळाम काम लोकून लोकप्रतिनिधी तम हामार जातेर छो, हामार धर्मेर छो करतांनाी मदतान मांगेते पळं आज घडीन स्वत:र जाते धर्मेर विचार कोनी करेर ओंदून फक्त कामगारेर दृष्टीकोनेतीच देलाग अन् ओंदूर विचार सुद्‌धा कररे के.

शिके शिकायन कोरोनार कारणेती छुटी मळेलागी नोकरीबाळ खेडागामेरेमाई आयलगे. शिकेशिवयरो सुशिक्षिकत मातो अन खेडागामेमाईरेरे मातेरो मेळ कोनी जमरो कोरोनारे संकटेमाई लडाईरोय झांगडगुत्ता सुरु वेगो घंळेसालेती एकेजाग नांदेरेत घरेमाई ओमाईभी फुट पडेलाग अन् से जोई मागेला संयुक्त कटमाळो कती. कती वेगो ओरेमाईभी विभाजन

हेयलाग. लार पडेलाग लोकुर छिजाबरुर देळन मारो छोराभी सिकीयकरन बाप आसे संकटेम मोबाईल लान देरो तोईभी तांडे गामेरेमाई मोबाईलेन रेंज कोनी आरी ओरे छिजाबरुन सारीदाडो भार बेंसकू लागरो.

देशेरो कणा करतांळी शेतकरीन केलागे. पंळ ओर भाजीपालेन वेचन जागा कोनी रकाडे. कोरोनावाळो हिंळू करतांळी भाजीपालेन हातोणी लगाडरे भाजीपालो वेचेसारु गामेमाई कोणी आयदेरे. देशेर आर्थिक स्थिती बिघडरीच करन दारुरी दकाने सुरु करनाळे दारु पियेवाळेन देशेर आर्थिक कणा बंळानाके दारु पियेसारु दकानेमुंडेआग किलोमिटरेरी लाईने लगाउनाके. गामे तांडेमाईरी याडी भेने आचो हेगो कोरोना आवगो मारेमाटीन  दारु छडा नाको करन खुश वेरीती ओंदुरी खुशीप पांळी फेरनाके.

समाज भेरु ल स्वत:र फायदो करन लेयसाऊ कोरनारो डर दकाळेलाग गोरगंरीबे अंधश्रद्धार बळी पाडरे भोग लगाडो, पूजा करो, यज्ञ कर करन फसारे अन् स्वत:रो फायदो करन लेरे.

कोरोनाती लढेर छ करंताळीन निधी मांगेलाग शासकीय कर्मचारीर पगार कपात करेला: पंळ आमदार, खासदार मंजीर पगारेन, पेन्शनेन रण्यार धको कोणी लागेदेरे. निवडणूकीरे बक्तेन हर घडी म तमारे सोबत रियू केयपाळो नेता स्वत:च क्वारंटाईन करन घरेम रेरो. पोलीस, शिक्षक, मात्र रातंन दाड लोकूसाऊ रोडेप हुबरन रेरो.

सरकारेरो आदेश आरो जिवनावश्यक वस्तु चोवीस घंटा चालू रिय पंळ ओ वस्तुमाईभी गोर गरीबेर लुटच वेरी जिवनावश्यक वस्तु कतो अन्न, वस्त्र, निवारा दवाखानो अन् शिक्षण पळं सद्याघडीन येणूरपैळी एकही जिवनावश्यक वस्तु मळरी कोणी.

१) अन्न – श्रीमंत लोक Lockdown सुरु हेरोच कतोच गर्दीकरण तीन – चार मिनारो राशन भरलीदे पळ सारीदाडो कामकिदेतोच पिसामळच ओ हानूच रेरे. पाचकिलो चावळेर गोर – गरीबेन सरकारेर पुरेती भेट कारण ओंदुर हातळीपरिया र ओंदुरो पेट.

२) वस्त्र – कोरोनार संकटेम वस्त्र जिवनावश्य वस्तु छ करन कपडा कती वाटप कररे. पळ वाटपे लारभी ओणूरो स्वार्थ ओर प्रसिद्धि मळजाळू करण हजारो फोटो काडरे.

३) निवारा – पहिलेच काही लोकून घरदार कोणीर भंटकंती करन पेट भररे कोरोनारे माई ओ लोकून कोई कती कोणी आयदेरे कोरोनाग्रस्त हिंळू करण मंदिर, समाजमंदिर, शाळा, अशी जागेप सुद्धा कोणी बेसेदेरे.

४) दवाखानो : साधा ताव आवगोतोभी ५ फुटेती डॉक्टेर तपासरे थोडाभी तापमान जास्त दकायतो ओन १४ दाड कॉंरटाईन करेलाग. वेळेप गोरगरीबेन डॉक्टर कोनी मळरो. डॉक्टेरेलगू जायन गाडी कोणी मळरी.

५) शिक्षण – गोरगरीब समाजेर लोक कुंईकरन चारपिसा जोडताळींन छिजाबरुन शाळामाई घालमेते ओभी घर आणबेसगे. शासन केरो ‘Online Class’ हेरेच ‘Online’ शिको. पिसावाळेर छिजाबर लॅपटॉप काडन बेसेलाग गोर – गरीबेर छिजाबर आजभी उंदाळेरे गर्मीमाईभी मुंडेपरेरो मास्ोई कोनी छोडरे. दादी दादान मास्क आरो कोनी ओ मुक्सा केयलाल बेटा मुक्साबांधदरे हामेन केयलाग किचडेमाई हात वलागे हिंळूतोभी ओच हातेती बारी खातेते. पळ आब २०० रपीयार सानीटाइजरेती हात धोंकू लागरो.

धन्य धन्य रे कोरोना तु सारी जग हैरान करनाको. पळ पहिले से गोरगरीबेनच बकरार बळी बंळातेते जसोच तु कररो. तारे ये खेळेरेमाई फक्त गोरगरीबच आडकरो.

◆◆◆



# COVID 2019: Turning Adversity Into Opportunity

**Ganesh Narvate,** B.A.S.Y.

*In every adversity lies an opportunity is an age-old saying and has never been truer than the current COVID-19 pandemic. As an extension, it could also be said that greater the adversity, greater will be the opportunity, particularly for a diverse country like India.*


The COVID-19 crisis has brought the Indian society to a painful halt. To be fair, the more prosperous societies across the west are also facing a similar crisis. Social distancing has become an imperative in this fight against a mighty, invisible enemy. In a country with cultural norms and economic systems like ours, this is indeed a massive inconvenience not only socially but also economically. At the same time, the success of such a step depends not only on an individual but also all those around him. A tiny act of error or adventurism by a single individual can prove to be severe for scores of people.

The question then is whether the Indian society is prepared for such discipline and empathy. More importantly, this will not be the last such crisis where one's welfare will depend on the person next door. Tough questions need to be asked of our current institutions and systems. Amongst the most crucial of these is India's education system. Needless to say, the pandemic has transformed the centuries-old, chalk–talk teaching model to one driven by technology. This disruption in the delivery of education is pushing policymakers to figure out how to drive engagement at scale while ensuring inclusive e-learning solutions and tackling the digital divide.

First we need to understand what E Learning is. Simply put, while sporadic E Learning by way of Smart Classes, Connected/Virtual Learning was already in practice across private schools in metropolitan cities, E Learning in the times of COVID-19, means, all learning through E Learning. Schools are shut. Students are home. This is the perfect time to adopt E Learning. There are so many advantages of E Learning.

Technology has now become a part of education. The COVID-19 opened the doors of educational technologies. There are so many tools like Google forms, Google sheets, Google Classroom, Edmodo-learning management system, testmoz.com. E-Content videos, Online assignment, Online Quizes.

◆◆◆



## keÀejevee ë mekeÀìeleve meOeekeÀ[... !

**कु. मनाली अंभोरे,** बी.ए. प्रथम वर्ष

'कोरोना' हा व्हायरस संपूर्ण जगाला भयभीत करणारा ठरला आहे. हा व्हायरस संसर्गजन्य असल्यामुळे त्याची लागण संपर्कात आलेल्यांना झपाट्याने होत आहे. जगात पहिल्यांदा हा व्हायरस चीनमध्ये आढळून आला. चीनच्या वुहान शहरात सर्वप्रथम या व्हायरसने थैमान घातले. त्यानंतर हळूहळू जवळपास साऱ्या जगाला या विषाणूने ग्रासले आहे. अमेरिकेसारखा बलाढ्य देश या कोरोनापुढे हतबल झाला आहे. भारतात देखील या विषाणूचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे.

भारतात सर्वप्रथम कोरोनाचा पहिला रुग्ण केरळमध्ये ०२ फेब्रुवारी २०२० रोजी आढळून आला; तर १४ मार्च २०२० रोजी कर्नाटक राज्यातील कलबुर्गीत या कोरोनाचा पहिला बळी गेला. त्यानंतर हा विषाणू देशाच्या अन्य भागात पसरावयाची सुरुवात झाली त्यातच पंतप्रधान मा.नरेंद्र मोदींनी संपूर्ण देशात जनता कर्फ्यू व नंतर लॉकडाऊनची घोषणा केली. एका रात्रीतून सारा देश, देशातील रहदारी शांत झाली. अव्याहतपणे धावणाऱ्या रेल्वेगाड्या, बस, विमाने, इतर सर्व वाहने थांबली, सर्वांना 'घरी रहा, सुरक्षित रहा' हा संदेश दिला. लोकांनीही आपापल्या सुरक्षेसाठी व या कोरोना आजारापासून दूर राहण्यासाठी घरात राहाणे पसंत केले. मार्च २०२० मध्ये सुरु झालेली 'कोरोना' व्हायरसची भिती उत्तरोत्तर गडद हतो चालली आहे.

भारतामध्ये सर्वात जास्त 'कोरोना' रुग्णांची संख्या महाराष्ट्रात वाढताना दिसत आहे. अवघ्या दोन रुग्णावरुन सुरुवात झालेली ही संख्या आज लाखोंच्या घरात जाऊन पोहचली आहे. याला आळा बसावा म्हणून सरकारने लॉकडाऊन घोषित करुन सर्वांना जिथे आहे तिथेच थांबायला सांगितले. सर्वजन घरी थांबायला लागले. उभ्या आयुष्यात कधी नव्हे इतका वेळ घरी देता आला, याचा एकापरीने फायदाही झाला आहे. अर्थात कोरोना काळातील या लॉकडाऊनचा सर्वात जास्त त्रास कामगार वर्गाला झाला. उद्‌योगधंदे बंद झाले असल्याने नवनिर्मिती थांबली. आरोग्य यंत्रणा, सुरक्षा यंत्रणा यांच्यावरती खूप ताण आला, येत आहे. हे सारे वास्तव नाकारता येत नाही हे खरे पण; कोरोना मुळे अनेक फायद्‌याच्या गोष्टी घडलेल्या आहेत.

अर्थात कोरोना संकट म्हणून पाहिले तर ती एक फार मोठी महामारी आहे. परंतु साऱ्या गोष्टींचा विवेकाने विचार केला तर हा लॉकडाऊन एक संधी म्हणूनही महत्त्वपूर्ण ठरला आहे. या संधींचा विचार पुढील पद्धतीनेही करता येईल. अनेक बाबतीत हा लॉकडाऊन संधीच्या रुपात आला आहे.

**लॉकडाऊन एक संधी**

१) नैसर्गिकदृष्टया विचार केला तर साऱ्या जगाबरोबरच आपल्या भारत देशामध्ये अन् महाराष्ट्रामध्ये हा लॉकडाऊन सुरु झाल्यापासून प्रदूषणात प्रचंड घट झाली आहे. कारखाने, उद्योगधंदे बंद असल्यामुळे हवेत जाणारा प्रचंड धूर थांबला, कारखान्यातील घाण पाणी नद्यांमध्ये सोडले जात होते, ते थांबले. यंत्रांचे, वाहनांचे आवाज थांबल्याने ध्वनी प्रदूषण थांबले, सॉ मिलसाठी दररोज हजारो वृक्षांची होणारी कत्तल थांबली. त्यामुळे वातावरणात हलकेपणा व स्वच्छपणा निर्माण झाला.

२) सजीव सृष्टीसाठी आणि मानवासाठी आवश्यक असणाऱ्या 'ओझोन'ची झीज थांबली. ओझोन वायू प्रदूषणाच्या विळख्यात प्रदुषित झालेला होता. वातावरणात अनेक विषाणूंना पोषक हवामान निर्माण झाले होते. ते थांबण्यास या काळात खूप मदत झाली आहे. 'ओझोन' मानवी आरोग्यासाठी व पृथ्वीवरील पर्यावरणासाठी अतिशय महत्त्वाचा वायू आहे. त्याची झीज अशा लॉकडाऊन शिवाय थांबली नसती हे मात्र खरे.

३) निसर्ग आणि पर्यावरणाला शोभिवंत घटक म्हणजे राना – वनातील वन्य जीवसृष्टी अनेकाकडून दररोज शेकडो वन्य जीवांची हत्या होत होती. ती थांबली. या वन्य प्राण्यांना अगदी मुक्तपणे संचार करता आला.

४) 'कोरोना' संकटाच्या महामारीमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन लावल्यामुळे होणारे अपघात थांबले. नेहमी प्रचंड गर्दीने वाहणारे रस्ते, माणसांची धावपळ, वाहनांचे भरधाव जाणे यामुळे देशात दररोज कुठेना कुठे प्रचंड असे अपघात होत होते. अनेकांना आपले जीव गमवावे लागत होते. अनेकांना कायम अपंगत्व घेऊन जगावे लागत होते. परंतु कोरोनाच्या भितीने घातलेल्या लॉकडाऊनमुळे रस्त्यावरची वाहने थांबली. आपोआपच अपघाताचे प्रमाण कमी झाले.

५) सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे माणूस या ना त्या कारणाने प्रचंड धावपळीत होता. त्याच्याकडे कुटुंबासाठी काय पण स्वत:साठी वेळ नव्हता. नोकरी, व्यवसाय, कामाच्या निमित्ताने घराबाहेर असणारा माणूस या लाकडाऊनमुळे घरात राहिला. कुटुंबात कधी नव्हे तो निवांत मिसळला. परिवाराला त्याला वेळ देता आला. कुटुंबातल्या माणसांच्या भावना समजावून घेता आल्या. मुला बाळांना पूर्णवेळ आई–बाबा मिळाले. याबरोबरच रोजच्या धावपळीत स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. तो देता आला.

६) माणूस हा सतत कार्यमग्न राहणारा आहे. तो लॉकडाऊनच्या काळात जरी घरी बसला असला तरी त्याने अनेक नवनवीन गोष्टी या काळात आत्मसात केल्या. गृहिणीने अनेक नव्या वस्तू बनविणे, खाद्य पदार्थ बनविणे, आपल्या आवडीने सर्वांना खाऊ घालणे, अशा अनेक नवनवीन गोष्टी या कोरोनामुळे घरी राहून 'वर्क फ्रॉम होम' याप्रमाणे करता आल्या.

७) माणसाचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी या कोरोनामुळे खूप मदत झाली. अस्वच्छतेमुळे रोगांना आमंत्रण मिळते. स्वत:च्या स्वच्छते पासून घराची, कुटुंबाची स्वच्छता राखली तर आपोआप समाजाची, सार्वजनिक स्वच्छता होते. माणूस स्वच्छतेकडे दुर्लक्ष करत असल्याने तो अनेक आजारांचा बळी बनला

होता. परंतु कोरोनामुळे माणसांना आपोआपच स्वच्छतेची सवय जडली. विषाणूला रोखायचे तर ते स्वच्छतेने हे त्याच्या लक्षात आले.

८) महागाईच्या दुनियेत माणसाला आपल्या गरजा भागवताना दमछाक येत होती. उत्पन्न मर्यादित आणि खर्च अधिक यामुळे तो कर्जबाजारी बनत चालला होता. कारण अनंत गरजा भागवताना खर्च मोठ्या प्रमाणावर होत होता. परंतु कोरोनाच्या या संकटामुळे लॉकडाऊन असल्याने खरेदीसाठी जाणे शक्य नसल्याने आपोआपच खर्च कमी झाला. पैशाची बचत झाली. वाहनावरचा प्रवास थांबल्यामुळे इंधन बचत झाली. अत्यावश्यक बाबी शिवाय इतर वस्तू खरेदीची गरज माणसाला आपसूकच झाली नाही. त्यामुळे खर्च कमी झाला.

९) मानवाचे जीवन किती अनमोल आहे, केवळ जीव वाचविण्यारिता किती मोठमोठे निर्णय घ्यावे लागले. त्यामुळे जीवन फार महत्त्वाचे आहे, याची जाणीव लोकांच्या मनात निर्माण झाली.


१०) आपल्या भारत देशामध्ये लग्न कार्यात प्रतिष्ठेच्या खानदान, श्रीमंती इत्यादी माध्यमातून मोठमोठ्या समारंभ आयोजित केले जात होते. अक्षरश: करोडो रुपये प्रतिष्ठेच्या नावाखाली वाया घातले जात होते. गरीबांना परवडत नसूनही समाजाच्या भीतीपोटी मोठे लग्न समारंभ करावे लागायचे. परंतु कोरोना संकटामुळे केलेला लॉकडाऊन व बंधने यामुळे अगदी कमी खर्चात लग्न व इतर समारंभ उरकण्यात आले. त्यामुळे वेळ व पैशाची बचत झाली.

थोडक्यात, कोरोनाची महामारी महाभयंकर असली तरी, सकारात्मक दृष्टीने त्याकडे पाहिल्यास कोरोना संकटाची संधी कशी आपोआप निर्माण झाली. हे बारकाईने विचार केल्यास आपल्या लक्षात येते. अर्थात कोरोनामुळे काही संधी निर्माण झाल्या असल्या तरी ते केवळ माणसाच्या पातळीवरचे आहे. याच संधी कायमस्वरुपी लॉकडॉऊन मुळे संधी राहणार नाहीत. एक जागतिक, राष्ट्रीय संकट म्हणून पाहिल्यास ते महाभयंकर आहे. पण या काळाने समाजाच्या, मानवी जीवनाच्या पातळीवर अनेक स्थित्यंतरे निर्माण केली.

◆◆◆

'कोव्हिड-१९'च्या साथीने जागतिक पातळीवर सगळ्यात मोठा दणका दिला तो आर्थिक क्षेत्राला. सर्व व्यवहार थंडावल्यामुळे उत्पादनही थांबले. त्याचा परिणाम अनेकांचे रोजगार गेले. मोठ्या पदावर काम करणारे बेरोजगार झाले. पण संकटे आली तरी मिळेल ती संधी साधुन उपलब्ध असलेला रोजगार स्वीकारायचा असतो, हे काहींनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिले आहे. काहीच न मिळवण्या पेक्षा थोडे तरी मिळविणे शहाणपणाचे असते हेच या लोकांनी स्पष्ट केले.

**- कु. संजीवनी येडले (बी.ए. प्रथम वर्ष)**




# `keÀeeJn[ 19'®e keÀeìeyekeÀ peeJeveele Peeueue HeejJeleve

**कु. मेघा ससाणे,** बी.ए. प्रथम वर्ष

'कोव्हीड १९'ने आज संबंध जगभरात कहर माजवलाय. कोरोना या विषाणूने अखिल मानव जातीचा थरकाप उडवलाय. आजचे युग म्हणजे २१व्या शतकाचे युग आहे. कर्तृत्त्व आणि नेतृत्त्वाचे आहे. पूर्वी व्यक्तीला जन्मावरुन महत्त्व होते आता त्याच्या कर्तृत्वावरुन महत्त्व आले आहे. म्हणून व्यक्ती हा ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञानाच्या मदतीने आज चंद्रावर, मंगळावर जाऊन पोहचला आणि मानवी विकासाची भरारी 'न भूतोन भविष्यती' केली या साऱ्या गोष्टी आजच्या काळाला योग्यच आहेत.

मानवाने मागे वळून न पाहता पुढेच पुढे वाटचाल करताना मानव समाजशील प्राणी असताना यंत्रमानव बनून जीवन जगू लागला. 'पळा रे पळा', 'धावा रे धावा', 'Time is money' च्या नवीन संस्कृतीत रमला. त्याच्या जीवनाचे गणित म्हणजे त्याला 'बाल्याची बाळी अन् १० X १० ची खोली.' खेड्याची मुले तालुक्याला तालुक्याची मुले जिल्ह्याला, जिल्ह्याची मुले शहराला, शहरांची मुले विदेशाला जाण्याची जणू संस्कृती बनली. त्यामुळे माणूस हा आई–बाबा, भाऊ–बहीण नाते संबंधास विसरुन गेला. परंतु आकाशात उडणाऱ्या विमानाला शेवटी जमिनीवर यावेच लागते.

महात्मा गांधीजीने म्हटल्या प्रमाणे, 'खेड्याकडे चला, खरा भारत भारतीय संस्कृती, कुटुंबसंस्था, नातेसंस्था, आपले पणा, जिव्हाळा आत्मीयता या गोष्टी आपणास विनामूल्य कुटुंबातूनच प्राप्त होतात. एकट्या अमेरिकेत आपले भारतीय जवळपास चाळीस लाख आहेत. तसेच इतर देशात ही भारतीयांची संख्या लाखांच्या घरात आहे. आपले घर सोडून काम नोकरी रोजगाराच्या शोधात परदेशात जाऊन वसले आहेत. पण अचानक चीन देशातल्या वुहान प्रांतात कोव्हीडचा जन्म झाला आणि हा हा म्हणता जगभरात हा विषाणू पसरला आणि जगातल्या सर्वच गोष्टी लॉकडाऊन मुळे थांबल्या.

'घरात रहा सुरक्षित रहा, घरात थांबा कोरोना थांबवा, लॉकडाऊन हटने तक कोई बाहर आने का नही कोरोना बाहर बुलाता है। मगर जाने का नही, मी माझा रक्षक, हम घरके अंदर तो कोरोना बाहर' असे अनेक स्लोगन तयार झाले आहेत. कोरोना या विषाणू रोगावर अद्याप लस निघाली नाही म्हणून घर हेच सर्वासाठी सुरक्षिततेचे ठिकाण आहे. घर हेच सध्यातरी प्रभावी औषध आहे. म्हणून गेल्या दोन महिन्यापासून १५ दिवसाचे, २१ दिवसाचे टप्पे पाडून लॉकडाऊन केले जात आहे. सर्वांना

घरात बसून राहण्याचे शासकीय आदेश आहेत. त्यामुळे भल्या – भल्यांना घराची संकल्पना कुटुंबाचे महत्व आता कळू लागले आहे.

२१व्या धावपळीच्या शतकाच्या विश्वात, व्यक्ती कुटुंबासाठीच धावपळ करत असतांना, पैसा कमावण्यासाठी दिवस– रात्र कष्ट करत असतांना, यंत्र बनून काम करत असतांना, पण कुटुंबासाठी त्याच्याकडे अजिबात वेळ नव्हता. मात्र करोनाने संबंध जगाला जणू सक्तीची रजा, सुट्टी दिली आहे. त्यामुळे माणूस आता खऱ्या अर्थाने कुटुंबात जीवन जगू लागला आहे. 'कोरोना' या आजारामुळे लोक हतबल झाले आहेत. आपण आज आहोत; परंतु उद्याचा भरोसा नाही. त्यामुळे अंहकार, द्वेष, मत्सर, वाईट भावना, विचार गळून पडून कौटुंबिक जिव्हाळा सलोखा, प्रेम, वात्सल्य, आपुलकी, स्नेहभाव, माणुसकी, आदरभाव, एकोपा, गप्पागोष्टी, चर्चा, आजोबा–नातवंडाच्या गप्पा, सासू–सुनेतील सुधारलेले नाते, या गोष्टींची मोठ्या प्रमाणात वृद्धी झालेली आहे.

नोकरीत, कामात, स्वत:ला वेळा देणारा पती, पिता, आता मात्र मुलाबाळात रमून कुटुंबाची नाळ घट्ट झाल्याचे दिसून येत आहे. पती –पत्नी आता स्वत:ला अधिक वेळ देत असल्यामुळे ऐकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेत आहेत. मुलाबाळांवर चांगले संस्कार होत आहेत. आई–वडीलांची मुलांकडून सेवा होत आहे. नातवंडांना आजोबाच्या ज्ञानाचे, अनुभवाचे धडे मिळू लागले आहोत.

अलिकडच्या काळात कुटुंब संस्था जणू धोक्यातच आलेली होती. परंतु 'कोरोना' या विषाणूने संपूर्ण मानवजातीला नव्याने माणूस बनून जीवन जगण्याचाच धडा दिला आहे.

आज लॉकडाऊनमुळे आर्थिकदृष्ट्या मोठी संकटे निर्माण झाली आहेत; पण कुटुंबसंस्थेमुळे सर्वांना भरभक्कम मानसिक आधार मिळत आहे. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे....' 'फक्त पाठीवर हात ठेवून लढ म्हणा,' 'आ जा, उम्र बहुत है छोटी, अपने घरमे भी है रोटी,...' 'गड्या आपला गाव बरा,' 'चलो घर की और' 'मुझे घर ले चलो', अशा मानसिकतेतून अडकलेले कामगार, मजूर कष्टकरी, श्रमिक आपआपल्या घराकडे निघत आहेत. आपआपले घर गाठत आहेत. आज कुणालाच पैसा कमावण्याची चिंता नाही. परंतु घर गाठण्याची तीव्र इच्छा निर्मण झाली आहे. 'तांडा चालला...' अशा बातम्यांवरुन देशा–विदेशात अडकलेल्या लोकांची ओढ फक्त घराकडेच आहे. आजच्या यांत्रिकी युगात यंत्र बनून काम करणाऱ्या व्यक्तीला माणूस बनवून घराची, कुटुंबाची नव्याने ओळख 'कोव्हिडने' केली आहे. प्रत्येक मानव समाजशील प्राणी आहे. त्याला कुटुंब संस्था आहे. तो कुटुंब संस्थेचा अविभाज्य घटक आहे.

सारांश, असे म्हणता येइल की, सबंध जगात कहर माजवलेल्या 'कोरोना'ला केवळ कुटुंब संस्था हरवू शकते. आपण घरात आहोत, सुरक्षित आहोत. 'कोव्हिड–१९'चे नव्याने कुटुंब संस्थेवर झालेले सकारात्मक किंबहुना चांगले परिणाम म्हणून आपणास उल्लेख करता येतो.

*'सुरक्षित कार्य यह कर्तव्य हमारा...।*
*सुरक्षित जीवन से जुडा है परिवार हमारा...।।'*

◆◆◆




# `keÀejevee' ë ceneceeje...? í, ne lej meOee®e... !

**कु. समीक्षा कांबळे,** बी.ए. प्रथम वर्ष

'कोरोना' आधीचं जग आणि नंतरचं जग आता एकसारखं नसणार आहे, खूप काही बदललेले असेल. प्रत्येक क्षेत्रात म्हणजेच सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आंतरराष्ट्रीय अशा सर्व क्षेत्रात अनपेक्षित बदल झालेले आपल्याला दिसतील. पण, जर आपण या बदलांचा सकारात्मक विचार केला, तर 'कोरोना' एक महामारी नसेल तर, एक संधी असेल.

आपल्या सर्वांसाठी 'कोरोना' ने आपल्याला नव्याने सर्व काही सुरू करण्याची सुवर्ण संधी दिली आहे.आपण मागील काही वर्षांचा विचार केला तर साधारण शंभर वर्षांपूर्वी स्पॅनिश फ्लू नावाची महामारी पाश्चात्य देशात आलेली होती. त्यावेळी देखील खूप मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झालेली होती, त्यामुळे अशा गोष्टी घडत असतात. पण, आपण जर त्याला कवटाळून बसलो तर त्या रोगामुळे होणाऱ्या अडचणी कमी असतील. आणि इतर क्षेत्रातील अडचणींना जास्त वाव मिळेल तर असं न करता आपण या 'कोरोना' ला महामारी नाही तर एक संधी समजू या.

आज आपण बघतोय आर्थिक क्षेत्रात खूप अडचणी येत आहेत. आणि त्याचबरोबर वेगवेगळ्या संधी पण या क्षेत्रात उपलब्ध आहेत. याची देखील जाणीव होत आहे. आपण रोज टीव्हीवर बघतोय, वर्तमानपत्रात वाचतोय. काही हजारो लोक किंवा मजूर यांनी रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतर केले होते. ते आता आपल्या प्रांतात परत जात आहेत. आपण जर स्थलांतरितांचा आकडा पाहिला, तर जवळजवळ चौदा टक्के देशांतर्गत स्थलांतर होते. प्रत्येक मजूर आपल्या कौशल्यानुसार जेथे रोजगार उपलब्ध होत आहे, तेथे स्थलांतर करतो. याचा अर्थ आपल्या संपूर्ण देशात प्रत्येक राज्यात मोठ्या प्रमाणावर 'रोजगार उपलब्ध' आहे. याची जाणीव आपल्याला आजपर्यंत नव्हती, तर या कोरोनाने आपल्याला याची जाणीव करून दिली आहे.

आपण बघतोय मागील काही काळात व काही महिन्यांमध्ये 'प्रांतवाद' खूप मोठ्या प्रमाणावर उफाळून येत आहेत. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे रोजगाराच्या शोधार्थ केलेले स्थलांतर होय. हा प्रांतवाद मिटवण्यासाठी आपण जर त्या त्या राज्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून दिला, तर अशा गोष्टींना आळा बसेल.

त्याच बरोबर आता आपला कल खेड्यांना स्वयंपूर्ण करण्याकडे असावा; कारण खेडी जर स्वयंपूर्ण झाली , तर अशा स्थलांतराचा प्रश्न उद्भवणार

नाही. आणि मोठमोठ्या शहरांवर पडणारा ताण देखील कमी होण्यास मदत होईल. उदाहरणार्थ 'हिवरे बाजार' हे गाव संपूर्ण गोष्टीत स्वयंपूर्ण गाव आहे. कारण या गावचे सरपंच पोपटराव पवार यांनी गावाची नियोजनबद्ध आखणी केलेली आहे. आज या गावातील एकही व्यक्ती रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतर करीत नाहीत. आणि ज्या लोकांनी अगोदर स्थलांतर केले होते, तर त्या लोकांना परत बोलावून त्यांना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या.

अशा प्रकारे आपण हिवरे बाजार या गावाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून इतर खेड्यांना देखील स्वयंपूर्ण करण्यावर भर दिला पाहिजे.

**रोजगाराला वाव**

आज महाराष्ट्रात हजारो तरुण बेरोजगार असल्याचे दिसून येते आहे.पण कोरोनामुळे या सर्व बेरोजगार तरुणांना आता खूप मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतील.कारण आपण बघतो सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते; त्या सगळ्या गोष्टी विकणारे यु.पी. वाले, बिहारी लोक आपल्याला दिसतात. पण आता कोरोनाच्या लॉकडाऊन मुळे हे लोक आपापल्या राज्यात परत गेली आहेत. त्यामुळे आता महाराष्ट्रातील बेरोजगारांनी या व्यवसायाकडे लक्ष दिले पाहिजे. कारण या लॉकडाऊन मुळे नवीन संधी त्यांच्याकडे चालून आलेली आहे; त्यामुळे या संधीचा पुरेपूर फायदा घेतला पाहिजे, जेणे करून महाराष्ट्रातील बेरोजगारीचा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी मदत होईल; कारण कोणतीच गोष्ट अशक्य नसते ,फक्त आपल्या जवळ ती गोष्ट साध्य करण्यासाठी आत्मविश्वास हवा असतो आणि हा आत्मविश्वास कुठे आपल्याला विकत मिळत नाही, तर तो जन्मताच आपल्यामध्ये असतो, पण त्याचा वापर कसा करायचा, हे आपल्यावर अवलंबून असते. त्यामुळे आता आपला आत्मविश्वास बळकट करून त्यानुसार मार्गक्रमण केले पाहिजे.

**रुढी परंपरेला छेद**

आज आपण बघतोय सामाजिक क्षेत्रात रुढी परंपरांमध्येही खूप मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. उदाहरण पाहायचे असेल तर आपण बघतोय लग्न समारंभ करण्यासाठी कोरोना मुळे खूप अडचणी येत आहेत. लग्नसमारंभ केले तर कारवाया देखील होत आहेत. म्हणून आज लोक घरातल्या घरात आठ ते दहा लोक गोळा करून अगदी तासाभरात लग्नसमारंभ उरकून घेत आहेत. या अशाच लग्न समारंभाची परंपरा आपण कोरोना नंतरच्या काळात देखील सुरू ठेवली पाहिजे; कारण या पद्धतीमुळे आपण कर्जबाजारीपणा, स्त्रीभ्रूणहत्या, शेतकरी आत्महत्या, अशा प्रकारच्या समस्यांवर मात करू शकतो किंवा त्यावर तोडगा काढू शकतो.

आजच्या काळात मुलीचं लग्न करायचं म्हटलं की मुलींच्या वडिलांची अडचण होताना आपण पाहत आहोत. हुंडा पद्धत थांबवण्यासाठी हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ काढला पण या कायद्यानुसार हुंडा पद्धत बंद होण्याऐवजी ती आज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मनमानी हुंड्याच्या रकमेची मागणी वधूपित्याकडे केली जात आहे. एवढेच नव्हे तर संसार उपयोगी साधने, दागदागिने यांची मागणी देखील वधू पित्याकडून केली जात आहे. त्यामुळे वधुपिता मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी होत आहे. त्याचबरोबर कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या देखील खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. तसेच स्त्री भ्रुणहत्या. आज आपण मुलींचा जन्मदर पाहिला, तर दर हजार पुरुषांमागे ८२३ मुली इतका आहे. या एका अनिष्ट रूढी परंपरेमुळे आपण समस्यांना तोंड देत आहोत.

**पैसा व वेळेची बचत**

आपण जर या रुढी परंपरेला इथेच स्थगिती दिली, तर कोरोनानंतरच्या काळात या समस्या आपल्याला भेडसावणार नाहीत. आपण बघतोच ह्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी; शासन वेळोवेळी वेगवेगळ्या धोरणांची, योजनांची आखणी करते. या धोरणांची, योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन वेगवेगळ्या समित्या स्थापन करते.

'बेटी बचाव, बेटी पढाव' योजना अशा भरपूर साऱ्या योजनांना, समित्यांना लागणारा शासनाचा मोठ्या प्रमाणावर पैसा, वेळ, आपण वाया घालवत आहोत. आपण जर या अनिष्ट रूढी परंपरां ज्या की पूर्वीपासून चालत आलेल्या आहेत. त्यांना झुगारून नवीन पद्धतीचा अवलंब केला, तर यासाठी शासनाचा खर्च होणारा वेळ, पैसा आपण वाचवू शकतो. हा वाचलेला पैसा वेळ शासनाला इतर क्षेत्रासाठी म्हणजेच शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रावर खर्च करण्यासाठी वाव मिळेल. म्हणून या कोरोनाने आपल्याला अनेक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत, असे म्हणता येईल.

**नव्याने काही करण्याची संधी**

या कोरोनामुळे आपल्या पर्यावरणात देखील खूप मोठ्या प्रमाणात चांगले बदल घडून आले आहेत. दिल्ली, मुंबई ,बेंगलोर, यासारखी मोठी शहरे प्रदूषणाच्या समस्येला बळी पडली होती. पण लॉकडाऊनमुळे या शहरांचे प्रदूषण आटोक्यात आले. नद्यांमध्ये जे कारखान्यातले विषारी पाणी सोडले जात होते, ते आता बंद झाले. सर्वात जास्त गंगा नदी ही विषारी झाली होती; पण लॉकडाऊन मुळे ती आता विष मुक्त झालेली आपल्याला दिसून येत आहे. त्यामुळे कोरोना ही एक महामारी नव्हे; तर एक चांगली संधी आहे .

कारण कोरोनाने आपल्याला नव्याने सर्व काही सुरू करण्याची सुवर्ण संधी दिली आहे, तर आपण या संधीचा सकारात्मक विचार केला पाहिजे. कोरोना नंतरच्या जगाची मांडणी सामाजिक आणि पर्यावरणीय विवेकावर आधारित होणे आवश्यक आहे; कारण सध्याची व्यवस्था सुरळीत करण्याच्या नावावर पुन्हा तीच वाट चोखाळणे आपल्याला परवडणार नाही. आता पुनर्स्थापना नको, तर फेरमांडणी करायला हवी. कारण कोरोना एक महामारी नाही तर वेगवेगळ्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठीची एक सुवर्णसंधी आहे.

◆◆◆

एड्स, डेंग्यू, इन्फ्लुएंझा या रोगांच्या व्हायरसाप्रमाणे कोरोनाचा व्हायरस काही काळ अस्तित्वात राहील. पुढे, झाले तर काही साथीत त्याचे रुपांतर होईल. लस वा औषध सापडल्यावर व्हायरस हळूहळू संपुष्टात येईल. पण, कोरोनाला भ्यायचे कारण नाही. नियमांचे पालन करायचे आणि आत्मनिर्भरपणे जीवन व्यवहार पार पाडायचे.

**– महेश पांचाळ, (बी.ए. प्रथम वर्ष)**



## `keÀejevee' keÀeUeIe yeme, JeenkeÀ Je ®eeuekeÀevee `De®í eove'

**महेश पांचाळ,** बी.ए. प्रथम वर्ष

‘प्रवाशांच्या सेवेसाठी’असलेली महाराष्ट्र राज्य परिवहनची बससेवा असो की खासगी वाहनचालकांची सेवा असो त्या चालक व वाहकांना सततच सेवेत गुंतवून ठेवण्यामुळे ... त्यांना अनेकदा इच्छा असूनही सुट्टी मिळत नसल्याने ते नाराज होत असतात...! पण आता कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जगासह .. देश व राज्यात घराबाहेर पडणाऱ्यांचे सामाजिक व जैविक आरोग्यच धोक्यात आले असल्यामुळे... यात चालक व वाहकांना सक्तीची विश्रांती मिळाल्यामुळे... आणि... ते कुटुंबियांना पूर्ण वेळ देत असल्याने ... त्यांना ‘अच्छे दिन आले’ आहेत ... असे मार्मिकपणे चर्चिले जात आहे...!

बसचे वाहक असोत की चालक... ट्रक असो की... टेंपो... असो नी कंटेनर... असो... वा कोणतेही मालवाहतूक करणारे वाहन असो... किंवा रस्त्यावर असणारे छोटे मोठे वाहन असो... वा खासगी वाहनावर चालक म्हणून नियुक्ती करण्यात आलेले ड्रायव्हर असोत... यांना विश्रांती नावाचा प्रकार माहिती नसतो... काळ्या-पिवळ्या गाडीचे... ट्रॅव्हल्सचे ड्रायव्हर... अन् पैसै गोळा करणारे किन्नर... यांना सुट्टी कसली असते ते माहिती नसतेच... मालकांने सुट्टी दिली तर ठीक... नाही तर कामावर हजर राहावेच लागते...!

अनेकदा अत्यंत महत्त्वाचे काम असते... एकाद दोन वेळा मालक समजून घेतो... पण जर जास्तच रजेचं ... अबसेंटीचे... प्रमाण वाढले तर मग संबंधित ड्रायव्हरची... किन्नरची... वाहकाची... पगार कपात करणारेही अनेक वाहन मालक ...शासनही आहेच की...! त्यामुळे अनेक वाहक व किन्नर ... संबधिताविरूद्ध नाराजीचा सूर नेहमीच आळवित असतात... ! अन् आपल्या लेकरा बाळांना ... कुटुंबियांना... इच्छा असूनही ... त्यांना पूर्ण वेळ देता येत नाही म्हणून ... याचे कायम शल्य ते उरी बाळगून कामावर जात होते...! अशीच परिस्थिती मग तो शासकीय सेवेतला असू देत की ... खासगी वाहन सेवेतला कर्मचारी असू देत... त्यांचीही हीच स्थिती होती ... सर्वांना या एकाच स्थितीला कमी-अधिक प्रमाणात सामोरे जावे लागत असते ..!

देशात कोट्यवधी विविध प्रकारचे वाहनं आहेत... बसेस आहेत ... राज्यात १८हजार५००च्या वर बसेस आहेत ... रस्त्यावरील या पैकी काही वाहनांना चालक अन् किन्नर आहेत... तर परिवहन विभागाच्या वाहनांना वाहक आहेत... खासगी वाहनांना मात्र नुसतेच चालक आहेत... अशी विविधता असली तरी... यांच्या नशिबी सुट्टी... आराम... निवांतपणा...

ही बाब फार विरळ असते... ! खाण्या-पिणाची काही कमी नसते... पण मुलांकडे... त्यांच्या अभ्यासाकडे फार काही लक्ष देता येत नसते ...सोयरे धायरे... मनोरंजन... फॅमिली टूर...इ. ना यांना वेळ देता येत नसतो ... ! हे वास्तव आहे.. !

आता 'कोरोना'च्या ...अन् त्याच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेला 'लॉकडाऊन' ... घरी न बसता बाहेर पडल्याने कोणाला शाप ठरत असला तर त्याला कोण काय करणार ... ? पण,इतरांचे काहीही असो... या वाहकांना व चालकांना सध्या सुट्ट्याच असल्याने ते घरी बच्चे कंपनीला भरपूर वेळ देत आहेत... ! घरीच सुरक्षित राहून कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून सक्रिय सहभाग नोंदवत आहेत ... !

बरोबरच घरातल्या अडीअडचणी अन् कुटुंब शास्त्र समजून घेत आहेत घरातलं वातावरण आनंदी अन् समाधानाचे ठेवत आहेत असे असले तरी शासकीय कर्मचारी वर्ग सोडला तर खासगी वाहन चालकांना आपल्याला आपला मालक घरी बसून पूर्ण पगार देईल काय... ? याचा सुप्त धसका लागलेला आहे. पण पुढे काहीही होवो आज तरी आपल्याला 'अच्छे दिन' आल्याच्या परिस्थिती वरून मनमुराद आस्वाद ते घेत आहेत... !

◆◆◆

आपले उद्दिष्ट आहे कोरोनाची साथ संपविण्याचे ! भारतीय कुटुंबियांनी कशी वाटचाल सुरु केली आहे. कोरोना सहज रोखता येईल. महापूर असो वा भूकंप, अनेक आपत्तींना भारतीय धीराने सामोरे गेले आहेत. भारतीय कौटुंबिक सामंजस्याच्या बळावर लॉकडॉऊनच्या माध्यमातून कोरोनावर नक्कीच मात करतील. या लढाईत काही पथ्ये पाळावी लागतील, की जी शासनाने सांगितले आहेत.

**-कु. मेघा ससाणे (बी.ए. प्रथम वर्ष)**

नोकरी सुरु केल्यावर एक ना एक दिवस प्रत्येकाला निवृत्त व्हावेच लागते. त्या दिवसाची तयारी प्रत्येकजण करत असतोच. ही तयारी आर्थिक तरतुदीची असते. पण, सध्या घटते व्याजदर आणि मंदावलेल्या अर्थव्यवस्थेमुळे निवृत्तीची वेळ जवळ आलेल्यांना आर्थिक बाबींचे फेर नियोजन करावे लागणार आहे. सध्याच्या 'कोव्हिड-१९'च्या साथीमुळे सगळे संदर्भ बदलेले आहेत. म्हणून निवृत्तीचे नियोजन करावे लागणार आहे.

**- रोहित पवार (बी.ए. प्रथम वर्ष)**

# pee `leje' l³ee®³eeJej®e `keÀejevee' `keÀhee keÀje '...!

**कु. गीता दोडे**, बी.ए. प्रथम वर्ष



महाराष्ट्रात सध्या 'कोरोना' विषाणू संसर्ग होऊन बाधित होणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या साथीत माणूसच माणसांच्या मृत्युला कारणीभूत ठरतोय . त्यामुळे मृत्यूला सुध्दा आपण सहज सोपा करून टाकलाय...! या 'कोव्हिड १९'ला पराभूत करून मृत्यूवर विजय मिळवायचा असेल तर आपण या काळात घरीच राहणे योग्य आहे. जो घरी राहिल तोच जिवंत राहिल..त्याच्यावरच कोरोना कृपा करील ... अन्यथा या कोरोना विषाणूंचा संसर्ग तुमच्या मानगुटीवर बसेल...!

जो कोरोना जाणून घेऊन जगतो आहे. त्याला कोरोनाचे विषाणू कधीच जवळ करणार नाहीत... त्याला जो जाणूनही अजाणतेपणानं जगत आहे... तो नक्कीच कोरोनाला जवळ करणाऱ्यांपैकी आहे... जो जागरूकपणे... सावधपणे घराच्या बाहेर न पडता घरीच राहतोय ... तो कधीच कोरोनाची शिकार होणार नाही अशी सध्याची परिस्थिती आहे...!

आयुष्य संपत असतं थेंबाथेंबानं ... आयुष्य रोज संपत असतं ... पण ते आपल्याला कळतच नाहीये... आता आपलं आयुष्य कोरोनावर अवलंबून आहे हातातून वाळू जशी सरसरून गळून जाते, तशीच कोरोनामुळे आपल्या पायाखालची जमीन सरकत जातेय ... हे आपल्याला दररोज जगात... अमेरिकेत... इटलीत... किती माणसं मृत्युमुखी पडत आहेत यारून दिसत नाही का... ? हे पाहण्यासाठी... दिसण्यासाठी फार सावध राहावं लागतं आज कोरोनामुळे आयुष्य इतक्या सावकाश पण ... प्रचंड गतीनं संपत चाललंय की त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही... या विषाणूंचा संसर्ग एकदा का झाला रे झाला ...की क्षणाक्षणांनं मृत्यू आपल्या जवळ येतो आहे... तो कसा आलाय हे आपल्याला जाणवतच नाही... आज कोणीही मेलं की मनात येतं... त्याला कोरोनाच झाला असणार... मृत्यू नेहमी दुसऱ्या कुणाचा तरीच होतो... ही आपली नेहमीचीच धारणा असते... मी कधीच मरणार नाही... मी दणकट आहे... मी असा आहे... मी तसा आहे...

म्हणत असताना नेहमी दुसरंच कोणीतरी मरत असतं... कधी शेजारी मरत असतो... तर कधी कोणी... तर कधी कोणी... पण झालेला प्रत्येक मृत्यू हा आपल्याला 'सांगावा' आणत असतो... की जे शेजाऱ्याचं झालं ... इतराचं झालं... तेच तुझंही होणार आहे... !

कोरोना लढाईच्या शेवटच्या टप्प्यातही आपल्याला अजूनही शुद्धी येत नाही... अनेकजण बेपर्वाईनं... निष्काळजीपणानं... आपल्या हातानंच बाहेर पडून... आपला शेवट करून घेत आहेत ... आपण हे जे काही करत आहोत... त्याची अखेर किंमत किती आहे... ? हे त्यांना कळतच नाहीये... आपण कितीही पैसा मिळवू ... कितीही उच्चपद... प्रतिष्ठा मिळवू... ते सगळं सगळं कोरानातून आलेला मृत्यू धुवून टाकणारंय... आपण बांधलेली घरं पत्याच्या घरांसारखी ठरणार आहेत ... आपल्या सगळ्या काही भौतिक बाबी कागदाच्या 'नावा' ठरणार आहेत... आपल्या मागं त्याचं काय होईल हे सांगता येणार नाही... ते पाहावयाचं असेल तर आज घरीच राहणं गरजेचं आहे... !

कोरोनामुळे मृत्यू अटळ आहे ... याची जाणीव ज्याला झाली त्याच्या आयुष्यात धर्माचा ... मदतीचा... किरण जाणवतो... मृत्युची आठवण होणं ही धर्माची पहिली पायरी आहे... मृत्यू नसता तर जगात मदतीचा धर्मही नसता... ! मग मृत्यू कोणताही असू देत...

आजच्या या भीषणकाय कोरोनातून येणाऱ्या मृत्यूला नीटपणे समजून घेणं गरजेचं आहे... आपल्याला जर समजलं की आपण आज संध्याकाळी मरणार आहोत... तर काय आपण दिवसभर नेहमी सारखे वागू शकतो... ? आपल्या वागण्यात नक्कीच प्रचंड प्रमाणात बदल होईल... आपलं सारं प्रयोजनच बदलून जाईल... शैली बदलून जाईल... (जशी की आज सर्वांची जीवनशैली बदललेली आहे)... मृत्यूचं एवढंसं स्मरणही आपल्याला... आपण जसे आहोत तसे राहू देत नाही... एवढी भीती असते मृत्यूची ... तरीही आपण आज पोलिसांना न जुमानता घराबाहेर का पडत आहोत... ? जगायचं असेल तर घरीच राहा... !

◆◆◆

लॉकडाऊन नंतर शिक्षण आणि हॉटेल क्षेत्रामध्ये काही बदल ठळकपणे जाणवतील ते या प्रमाणे असतील–

१) शिक्षण ऑनलाईन करण्यावर सरकारी आणि खाजगी संस्थाचा भर असेल.
२) ई–लर्निंग प्लॅटफॉर्मस् मोठ्या प्रमाणात वाढतील.
३) हॉटेल आणि रेस्टॉरंटस् पुन्हा गजबजतील.
४) हॉटेलची निवड करतांना कुटुंबाकडून स्वच्छतेची कसोटी लावली जाईल.
५) हॉटेल व्यावसायिकांना स्वच्छतेसाठी विशेष उपाय योजावे लागतील.

**– वीरेंद्र द्याडे (बी.ए. प्रथम वर्ष)**



# keÀejevee keÀeUele I³ee³e®ee keÀeUpee ...!

**शंकर कदम**, बी. ए. प्रथम वर्ष

सध्या महाराष्ट्रात, आपल्या देशात, नव्हे तर संपूर्ण जगात 'कोरोना' या संसर्गाने थैमान घातले आहे. या आजाराने बाधित झालेल्या लोकांची संख्या गेल्या तीन-चार महिन्यांपासून दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. त्यामुळे जगात सर्वत्रच मानवी जीविताची खूप काळजी वाटत आहे.

या आजाराने जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेलाही सोडले नाही आणि गरिबीने हैराण असलेल्या सोमालियाला ही सोडले नाही. या आजाराने गरीब पाहिला नाही, श्रीमंत पाहिला नाही. वयोवृद्ध पाहिले नाही, की लहान मूल पाहिले नाही. अगदी सर्व वयोगटातल्या, सर्व प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक स्तरातल्या माणसाला या आजाराने हैराण करून सोडले आहे. त्यामुळे जिकडे तिकडे चिंतेचे वातावरण पसरले आहे. अशा वातावरणात आपण प्रत्येकाने काय काळजी घ्यावी, हा खरेतर कळीचा प्रश्न आहे. कोरोना ची वाढती आकडेवारी पाहून मात्र केवळ घाबरून चालणार नाही. तर या आजाराची माहिती प्रत्येकाला करून घेणे महत्त्वाचे आहे. काय आहे कोरोना ?

मित्र हो, 'कोरोना' हा एक संसर्गजन्य आजार असून, आपल्या भाषेत त्याला साथीचा रोग म्हणता येईल. वैद्यकीय शास्त्राच्या भाषेत ज्याला 'कोव्हिड -१९' या नावाने ओळखले जात आहे. एका जीवघेण्या घातक विषाणूपासून त्याचा संसर्ग होतो. हा विषाणू हवेत फार काळ राहू शकत नाही. मात्र तो जमिनीवर, कोणत्याही वस्तूंवर विशेषतः प्राण्याच्या, मानवाच्या हातावर किंवा शरीराच्या कोणत्याही भागावर काही काळ कार्यरत राहू शकतो. या विषाणूचे वैशिष्ट्य म्हणजे हा आपल्या डोळ्यांनी दिसू शकत नाही. त्याचा आकार सूक्ष्मातिसूक्ष्म असून तो राजमुकुटासारखा सूक्ष्मदर्शक यंत्रातून दिसतो. त्याच्या राज मुकुटा सारख्या दृश्य स्वरूपावरूनच त्याला 'कोरोना' हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. राज मुकुटाला इंग्रजीमध्ये 'क्राऊन' असे म्हणतात.

त्या वरूनच क्राऊनचे 'कोरोना' असे रूप झाले आहे. हा जीवघेणा विषाणू आपले स्थान बदलण्यात पटाईत असतो म्हणून तर त्याच्यापासून संसर्ग होण्याची भीती अधिक असते. त्याचा प्रजननाचा कालखंड सात ते चौदा दिवसांपर्यंत असतो. म्हणून याच कालखंडाला या आजारामध्ये महत्त्वाचे स्थान असते.

### कोरोना 'चीनची' देण

जगात सर्वत्र हाहाकार माजवलेला हा 'कोरोना' नेमका आला तरी कुठून ? तर हा आला चीनमधून. चीनमधल्या वुहान प्रांतांमध्ये डिसेंबर २०१९ मध्ये प्रथमतः हा विषाणू आढळला असे सांगितले जाते. वुहान प्रांतातून लवकरच तो संपूर्ण चीन मध्ये पसरला. चीन मध्ये त्याने पहिल्याच टप्प्यात हजारो बळी घेतले. आणि त्यानंतर कोरोना हा इटली, अमेरिका,

स्पेन मार्गे संपूर्ण जगभर पसरला. आज असा एकही देश नाही की, ज्या देशात कोरोनाचा शिरकाव झाला नाही. आणि म्हणून या संकटाला कोरोना महामारी असे म्हटले जाते.

**'कोरोना' काळात घ्यायची काळजी**

मित्रहो, आपल्या माय मराठीत एक म्हण आहे. 'एखाद्याला वाघ म्हटलं तरी खातो आणि वाघ्या म्हटलं तरी खातो,' मग त्याला भ्यायचे कशाला... ? कोरोना चीही अवस्था आज तशीच झाली आहे. आपण कितीही म्हटलं तरी कोरोना हे आजचं वास्तव आहे. त्यामुळे लॉकडाऊन तरी किती करणार किंवा सरकार तरी काय काय करणार ? म्हणून आता खरी गरज आहे ती लोकांनी लोकांची काळजी घेण्याची.

या काळात आपण काय केले पाहिजे, तर सर्वप्रथम आपण कोरोनासह जगायला शिकले पाहिजे. तशी मानसिकता आपण तयार केली पाहिजे. आज ना उद्या हे संकट जाणारच आहे. ते काही कायम राहणार नाही. आपण म्हणतो ना, की 'प्रत्येक रात्रीनंतर दिवस उगवतोच.' या कोरोनाच्या संकटानंतर आपल्याला जगण्याच्या, जीवनाच्या विविध संधी उपलब्ध होणारच आहेत. त्यामुळे अजिबात घाबरून न जाता, आपण कोरोनासह जगायला शिकले पाहिजे. म्हणजे काय, तर जोपर्यंत कोरोना आहे, तोपर्यंत आपण शारीरिक अंतर पाळून स्वत:ला स्वत:चेच कुंपण घातले पाहिजे. या काळात प्रामुख्याने काळजी घ्यायची आहे ती घराबाहेर पडताना.

घराबाहेर पडताना सर्वप्रथम आपल्या तोंडाला आणि नाकाला पूर्णपणे झाकणारा कापडी मास्क आपण लावलाच पाहिजे. शक्यतो या काळात डोक्याला पूर्णपणे बांधून घेतले तर अतिउत्तम.

त्याचबरोबर चष्माही वापरला जावा. म्हणजे चेहऱ्याचा कोणताही भाग उघडा राहता कामा नये. या काळात अंग झाकणारे पूर्ण वस्त्र घातले पाहिजेत. पायातही चप्पल ऐवजी बूट घातला पाहिजे. मोजे घातले पाहिजेत. आणि हाताला हात मोजे देखील वापरले पाहिजेत. त्याशिवाय आपण बाहेर पडल्यानंतर शक्यतो लोकांच्यामध्ये मिसळणे टाळले पाहिजे. आणि तशी गरज असेल तर किमान तीन ते चार फुटांचे अंतर ठेवूनच आपण लोकांशी व्यवहार केला पाहिजे. भेटणारी कोणतीही व्यक्ती मग ती जवळची असो का लांबची, या काळात आपण हस्तांदोलन करणे कटाक्षाने टाळले पाहिजे. गळाभेट तर दूरचीच गोष्ट.

त्याशिवाय सोयर संबंधही टाळले पाहिजेत. आणि फारच आवश्यकता असेल तरच आपण. एखाद्याच्या घरी गेल्यानंतर बाहेरच हात-पाय संपूर्णपणे स्वच्छपणे साबणाने धूवून , टॉवेलने हात-पाय, तोंड स्वच्छ करूनच आपण एखाद्याच्या घरामध्ये प्रवेश केला पाहिजे. या झाल्या बाहेरच्या गोष्टी. आपण घरामध्ये राहताना काय काळजी घ्यावी ?

तर मित्रहो, आपण घरातल्या लहान मुलांची आणि ज्येष्ठांची या काळात विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण करोना हा ज्यांची प्रतिकार क्षमता कमी आहे, आशांनाच लवकर आपलं भक्ष्य बनवताना दिसतो. अशांची काळजी घेणे जास्त गरजेचे आहे. वृद्धांना या काळात प्रवास करू देऊ नये. त्याच बरोबर घरात सर्वांनाच पोषक आहार मिळेल याची खबरदारी कुटुंब प्रमुखाने घेतली पाहिजे. व्हिटॅमिन सी घेण्यावर भर दिला पाहिजे. प्रत्येकाने आपली वैयक्तिक स्वच्छता नीट केली पाहिजे. तर मित्रहो, अशा प्रकारे आपण जर काळजी घेतली तर निश्चितच आपण या संकटावर मात करू.

*'बचेंगे, तो और भी लढेंगे.'*

◆◆◆



# COVID-19: Not Peril but an Opportunity

**Samiksha Kamble,** B. A. F. Y.

Recently we see unexpected changes in every field, social, economic, educational, international, but if we think about these changes positively, Corona is not an epidemic, will be an opportunity. For all of us, Corona has given us a golden opportunity to start all over again. If you look at the last few years, there was an epidemic called the Spanish flu in the West about ten hundred years ago. There was a lot of loss of life and money at that time, so these things happen, but if we embrace it, the problems caused by the disease will be less and the problems in other areas will get more scope.

We observe today a lot of difficulties in the financial sector and at the same time different opportunities are available in this sector. It is also becoming aware. We see on TV every day, we read in the newspapers that a few thousand people or labourers had migrated in search of employment. They are now returning to their province. If you look at the number of migrants, about fourteen percent are domestic migrants.

Every labourer migrates to the place where employment is available according to his skills .This means that there is a large number of jobs available in every state in our entire country. We were not aware of this till today, but this corona has made us aware of it. We have seen that in the last few years and a few months, provincialism has been booming on a very large scale. The biggest reason for this is migration in search of employment. If we provide employment in those states to eradicate this provincialism, such things will be curtailed. At the same time, we should try to make villages self-sufficient, because if the village becomes self-sufficient, then the problem of such migration will not arise. And it will also help to reduce the stress on big cities. For example, 'Hiware Bazaar' is self-sufficient in everything. Sarpanch of this village, Popatrao Pawar, has made a planned plan of the village. Today, not a single person in this village migrates in search of employment; and those who had migrated earlier, were called back and given employment opportunities in the village itself.

Today, there are thousands of unemployed youth in Maharashtra. But because of Corona, all these unemployed youth will now have a lot of jobs. We see UP, Bihari people selling all those things. But now due to the lock down of Corona, these people have returned to their respective states. So now the unemployed in Maharashtra should pay attention to this business. COVID-19 opened the doors of new opportunities. Therefore, this opportunity should be taken full advantage of, to sort out the problem of unemployment in Maharashtra. Nothing is impossible, just you need confidence to achieve something.

Today we see a lot of changes in the norms and traditions in the social sphere. For example; If a wedding is held, actions are also being taken. So today people are gathering eight to ten people in the house and ompleting the wedding ceremony in just an hour. We should continue the tradition of this same wedding ceremony even after Corona. We have to adopt best practices to overcome or solve problems like debt bondage, female feticide, farmer suicide, etc. If we eradicate these traditions now, we will not face these problems in later times. In order to solve these problems our government plans various schemes from time to time. The government sets up various committees to implement these policies and schemes. This means that we are wasting a lot of government money and time required by the committees for various schemes like 'BetiBachao, BetiPadhav'. The money saved by the government will be spent on other areas, namely education and health .Therefore, this corona has provided us with many opportunities.

It has also brought about a lot of positive changes in our environment. Large cities like Delhi, Mumbai, Bangalore, etc. have been affected by the pollution problem. But due to this lockdown, the pollution of these cities has been curbed. Also, the toxic water from the factories that used to be released into the rivers is now closed. The river Ganga was the most polluted but due to this corona lock down becoming normal.

The post-Corona world structure must be based on social and environmental conscience. Restoration is needed, in each and every sector and field.

◆◆◆

लस सापडल्यावर काय होईल ?

लस सापडेपर्यंतच कोरोनाचे भय टिकून राहिल. एकदा लस विकसित झाली, की सारे चित्र पालटून जाईल. लोक सार्वजनिक ठिकाणी पुन्हा गर्दी करतील. हव्या त्या ठिकाणी फिरायला जातील. हॉटेलमध्ये जाऊन पदार्थांवर ताव मारतील. मनसोक्त खरेदी करतील. कोणतीही वैद्यकीय पथ्ये पाळणार नाहीत. कोरोनासारख्या आणखी एखाद्या रोगाची साथ येईपर्यंत असाच जीवनक्रम चालू राहील.

**– कु. अंजली शेकडे (बी.ए. तृतीय वर्ष)**

# DeeveueeFve eMe#eCe - oCeeN³ee®e nele npeeje `oyeUe' ceePee PeeUe..!

**विजय कांबळे,** बी.ए. प्रथम वर्ष

डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधून आलेला 'कोरोना' आता ऑगस्ट उजाडत आला तरीही जायला तयार नाही.वरचेवर या आजाराचे प्रमाण वाढतच चालले असून, ही अत्यंत चिंताजनक गोष्ट आहे. करोनाने संपूर्ण जगासमोर जगण्याचे नवे 'आव्हान' उभे केले आहे. या काळात सगळ्याच क्षेत्रांमध्ये कमालीचे बदल होत आहेत.सध्या दिवसेंदिवस 'कोरोना' रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून त्यामुळे. सर्वत्र चिंतेचे वातावरण पसरले आहे. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही.



भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये लोकांचे प्रबोधन झालेले नसल्याने कोरोनासारख्या साथीच्या आजारावर कसा विजय मिळवायचा ? हे सांगणे कठीण आहे. भारतात सर्व प्रकारच्या दु:खावर एकच इलाज आहे आणि तो इलाज म्हणजे शिक्षण हेच होय. हजारो वर्षांपासून ज्ञान बंदी असलेल्या भारतात इ.स. १८४८ पासून शिक्षणाला प्रारंभ झाला. शिक्षणामुळे भारताची मान जगात उंचावलेली असतानाच आज कोरोनाने भारतीय शिक्षणावरच घाला घातला आहे.

कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षण दिले जावे, अशी मागणी काही शिक्षण तज्ज्ञ आणि अभ्यासक करीत आहेत. सरकारचाही असाच विचार आहे.पण आमचा, आमच्या परिस्थितीचा कोणी विचार करतो आहे का ? मजुरदाराच्या मुलांच्या आर्थिक परिस्थितचा कोणी विचार करतो आहे का ?वाडी–तांडे,भटक्यांचा विचार कोणी करीत नाहीत ? यांचा परिस्थितचा विचार करायला हवा.जिथं आम्हाला तेल मिळालं तर मीठ मिळत नाही, मीठ मिळालं तर मिरची मिळत नाही . मजुरीने गेल्याशिवाय चूल पेटली जात नाही.

अशा स्थिती असतांनाहीआणि भारतातील गरिबीची जाण असतांनाही सर्वांनाच ऑनलाईन शिक्षण घेणे शक्य आहे का ? तर किमान आमच्या सारख्यांना तरी ते शक्य नाही ? असेच दिसते.कारण माझ्यासारख्या अगदी ग्रामीण भागातील जेथं अजून नीट रस्ता नाही,तिथल्या खेड्यातील मुलांना शाळेत पाठवणं हेच दिव्य काम असते.मग अशा विद्यार्थ्याला ऑनलाईन शिक्षण कसे परवडणार ?

भलेही महाविद्यालय आणि प्राध्यापक मंडळी

आम्हाला ऑनलाईन शिक्षण द्यायला तयार होतील, असतील ,परंतु आम्ही खेड्यातील, वाडी, वस्तीतील,तांड्यावरील,पाड्यावरील,आज इथं तर उद्या तिथं असणारे ग्रामीण भागातील मुले ,मुली ते शिक्षण घेण्यास पात्र आहोत का ? किंवा पात्र होऊ का ? हा आमच्या समोरचा खरा प्रश्न आहे. जिथे लाईट आहे पण चार– चार दिवस लाईट राहत नाही, लोड शेडिंगचा नियमीत असते तिथे मोबाईलचा डाटा मिळण्याची शक्यता कशी गृहित धरणार ? मोबाईल चार्जिंग कशी करणार ? ती करणे म्हणजे एखाद्या मृगजळाच्या मागे लागल्यासारखे ठरेल ?

त्याचबरोबर आमच्या सारख्या गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल फोन कसा असणार ? तो घेणार कसा ? जिथे दररोजच्या चार घासाचे, तोंडमिळवणीचेच पोटाची खळगी भरण्यासाठचे वांदे असतात,तिथे तिथे असला महागडा फोन आमचा मजूर बाप घेऊन देणार का ? तसला फोन आम्हाला तो कुठून घेऊन देणार ? म्हणून या काळात अशी सुविधा आमच्या सारख्या असंख्य मुला मुलींनाही मिळेल असे मला तरी वाटत नाही. मूठभर श्रीमंत कुटुंबातल्या मुलांना ७ही" सुविधा पालक उपलब्ध करून देतील,त्यासह शहरी भागात इतर सर्व सुविधा उपलब्ध होतीलही पण आमचं काय ? म्हणून ऑनलाइन शिक्षण ही काळाची गरज असली तरी ती आमच्यासाठी केवळ मृगजळ ठरणार आहे.

सरकार, विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या सांगण्यावरून प्राध्यापक मंडळी आम्हाला ऑनलाईन शिक्षण द्यायला तयार होतही असतील, त्यांच्याकडे सर्व साधनेही आहेत. मात्र माझ्यासारख्या खेड्यातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी कोणती साधने आहेत ? याचा सरकारने गांभीर्याने विचार करावा, असे मला वाटते. जिथे आमचे खाण्यापिण्याचेच वांदे आहेत,तिथे मोबाईल ही चैनीची वस्तू असते. मी ज्या भागात राहतो, त्या खेडेगावात फक्त चार ते पाच अँड्रॉइड मोबाईल फोन आहेत. आमच्या गोरगरिबांच्या वस्तीमध्ये एकही अँड्रॉइड फोन अद्यापपर्यंत आलेला नाही. माझ्या परिसरातील इतर गावातही लाईटचे अनेक प्रश्न आहेत. दिवसाआड लोडशेडिंग असते. जिथे लाईटच नसते तिथे मोबाईल चार्जिंग कसे करणार ? तसेच डोंगराळ भागांमध्ये मोबाईलची रेंज कशी येणार ? असे एक ना अनेक प्रश्न आहेत.

शिवाय प्रत्यक्ष शिकण्याची मजा काही औरच असते. गुरुजींकडून जे ज्ञान मिळते ते ऑनलाईन शिक्षणाद्वारे मिळण्याची शक्यता कमीच वाटते. सध्या ऑनलाईन शिक्षण देण्याची शासन,प्रशासन, विद्यापीठ आणि महाविद्यालयाची जरी तयारी असली तरी ते आम्ही वरील अडचणींमुळे घेऊ शकत नाही. म्हणून या बाबतीत मी म्हणेन की–

*'देणाऱ्यांचे हात हजारो,*
*दुबळी माझी झोळी ... !*
*पण, आमच्यासाठी मात्र*
*ऑनलाईन शिक्षणाची*
*कल्पनाच खुळी... !'*

हेच खरे.

म्हणून मला वाटते ऑनलाईन शिक्षणापेक्षा प्रत्यक्ष वर्गात शिक्षण घेणेच चांगले.

◆◆◆

## ceeCemeeuee, ceeCemee®ee peeiee oeKeeJeuee `keÀejevee've ...!

**महेश पांचाळ,** बी.ए. प्रथम वर्ष

मानसाने निसर्गाला कनिष्ठ समजले असले तरी निसर्गाने वारंवार आपले श्रेष्ठत्व सिद्ध करुन दाखविले आहे. आज 'कोरोना' सारख्या महामारीच्या काळात बलाढ्य, शक्तीशाली देशांच्या प्रमुखांच्या डोळ्यात अश्रु, आले आहे. आज आपण कितीही प्रगती केला असली तरी निसर्गाच्या पुढे आपणाला गुडघे टेकवावीच लागतात.

गरीब श्रीमंत यात भेद न करता या व्हायरसने सर्वांना आपल्या बाहुपाशात जखडलेले आहे. W.H.O. सारखी आंतरराष्ट्रीय संघटना देखील हतबल झालेली दिसून येते आहे. या 'कोरोना'वर सध्यातरी इलाज नसल्याचे स्पष्ट केले आहे. आज ना उद्या त्याची लस सेईलच काही असो या सोबतच आपल्याला जगावे लागेल असे सांगितले जात आहे. याचा अर्थ आपली प्रतिकार शक्ती वाढवणे हाच या वरील उपाय W.H.O. ने सांगितला आहे.

मोठ मोठ्या हुकुमशहांना त्यांची जागा दाखवून देण्याचे कार्य या 'कोरोनाने' केले आहे. ते काय अन् आपण काय ? सर्वजण सारखेच आहोत. कोणालाही याची लागण होऊन शकते, हे या 'करोनाने' दाखवून दिले आहे.

◆◆◆

## MeeveJeej ceePee, jeJeJeej lece®ee...!

**वीरेंद्र द्याडे,** बी.ए. प्रथम वर्ष

शुद्ध हवा, शुद्ध पाणी... हे आज जर साध्य झाले असेल तर ते केवळ या महामारीच्या काळात केलेल्या लॉकडाऊन मुळे ! खरच, आज आपल्या पृथ्वीला देखील विश्रांतीची गरज आहे. आपण आपल्या दैनंदिन जीवनात रविवार हा विश्रांतीचा ठरवला आहे. व पुन्हा जोमाने सोमवार पासून कामाला जात असतो. मग या पृथ्वीच काय ? या साठी जर आज विचार करुन आपल्या पृथ्वीला देखील विश्रांती साठी दिवस निवडून दिला तर कसं होईल ?

या 'कोव्हिड-१९' च्या महामारीच्या काळात केलेल्या 'लॉकडाऊन' मधून एक बाब शिकलो, ती म्हणजे निसर्ग शुद्धिसाठी 'लॉकडाऊन' आवश्यक आहे. या साठी शुक्रवारी दिवस मावळल्या पासून ते रविवारचा दिवस उजाडे पर्यंत, प्रत्येक आठवड्याला 'लॉकडाऊन' आवश्यक आहे. यातून आपल्या कुटुंबाला देखील वेळ देता येईल व निसर्ग देखील विश्रांती घेईल. काही असो शेवटी 'जान है तो जहान है...!'

◆◆◆

# `keÀejevee"ve `Goje" meejKee eieUkeÀle keÀuee...!

**कु. प्रियंका जाधव,** बी.ए.प्रथम वर्ष

एखाद्या डोळेझाक करुन बसेलेल्या शिकारी मांजराने  उंदराना अगदी तशाच पद्धतीने कोरोना या विषाणूने माणसाला भक्ष्य बनवून एखादा माणूस त्याच्या संपर्कात आला रे आला, वा कोरोना बाधितांच्या संपर्कात आला रे आला, की त्याच्यावर झडप घालून जगातली आता पर्यंत ७० हजारांच्यावर माणसं उंदारां सारखी गिळंकृत केली आहेत. त्यामुळे आपल्याला कोरोना पासून सावध पवित्रा घेत घराबाहेर न पडणे हेच यावर एकमेव रामबाण औषध आहे.

आज जगातल्या सर्वच माणसांना कोरोना व्हायरसचा घसका बसला आहे. जगातल्या झाडून बहुतेक देशात या विषाणूने हाहाकार माजवला असून यात आतापर्यंत महात्मा म्हणून ओळखल्या जाणार अमेरिकेसारखे देशही आपला आता हात टेकवायला लागलेली आहेत दस्तूरखुद्द ब्रिटनचे पंतप्रधान बॅरीस जॉनसन यांनाही कोरोनाने आपल्या संसंर्गातून सोडले नाही. कोरोना पुढे कोण राजा ? कोण सामान्य अन कोण तो टिकोजीराव ? की बाजीराव  ? सगळेच आज कोरोनाचे भक्ष्य बनत आहेत. कोरोना शिकारीसाठी बाहेर पडला असून त्याचे शिकार बनलेले त्याला सापडलेले हे पंतप्रधान अतिदक्षता विभागातून आज उपचार घेत आहेत  !

तुम्ही कितीही श्रीमंत असा वा  कफल्लक राहा, शहाणे असा की दीड शहाणे, की कोणत्याही पदावर रहा अथवा तुम्ही जगातल्या कोणत्याही देशात तुम्ही राहा, तुम्ही खूप विद्वान आहात वा तुम्ही किती बुद्धीहीन आहात, यांच्याशी या कोरोना संसर्गाला कसलेच देणे घेणे नाहीय ! त्याचे युद्‌ध सुरु झाले आहे फक्त माणसांशी... ! तेही हे युद्ध माणसांनाच हाताशी धरून सुरु झालेय ! 'लोहा लोहे को काटता है !' बस्स ! अगदी तसंच जगात कोरोना करतोय !

माणसापासून माणसाला कोरोनाची लागण होऊ द्यायची. अन् यात झालेल्या मृत्यूला माणसाला आपले भक्ष्य बनवायचे... या कुटील डावपेचातून मानव जातीचा संहार करण्यासाठी चीन मधून बाहेर पडलेल्या या मानव संहारक अशा विषाणूला आपण घरी राहूनच सुरक्षित राहून कोणाच्याही संपर्कात न येता गर्दीत न जाता गर्दी न करता सामाजिक डिस्टंसिंग पाळून कोरोनाला पराभूत करु शकतो !

आज जगात कोरोना बांधितांची संख्या लाखांच्या वर आहे... तर यापैकी आतापर्यंत काही लाख कोरोना बधित रुग्णांवर उपचार करुन ते तंदुरुस्त होऊन घरी गेले आहेत... ही बाब दिलासादायक आहे... ! पण जगात कोरोनाने आतापर्यंत ७० हजार ८६३ च्या वर (सदर मजकूर लिहितानाचा आकडा) व्यक्तीला आपले भक्ष्य बनविलेले आहे... ! ही बाब भयंकर आहे... कोरोना विषाणूने माणसाला ... त्याच्या बेफिकीरी... वृतीमुळे  .... घरी न बसण्यामुळे... वा कोरोना बाधितांच्या संपर्कात आल्याने आपली शिकार.... आपले मरण... स्वस्त करुन टाकले आहे... !

.... पण कोरोना च्या संसर्गामुळे चे  मृत्यूमुखी पडले... त्यांचे काय.... कुटुंब प्रमुख असेल तर काय...  ? त्यांच्या पश्चात असणाऱ्यांचे काय.... ? छोट्या छोट्या  मुलांच्या वर्तमानाचे काय.... ? त्यांच्या भविष्याचे काय...  ? मुलींचे काय...  ? यांना आता कोणाचा आहे आधार ....  ? शासन सहाय्यता काय आयुष्यभर पुरेशी असणारंय काय....  ? असे एक नव्हे तर अनेक प्रश्न निर्माण होतात...  !

... म्हणून आपण जर वेळीच आपली काळजी घेतली तर अशा प्रसंगाला सामोरे जाण्याची वेळ आपल्यावर कदापी येणार नाही.... म्हणून वेळीच सावध पवित्रा घ्यावा... घेतलात तरच कोरोनाचे आपण भक्ष्य बनणार नाहीत.... एवढे मात्र नक्की... !

◆◆◆

# keÀeceieejemeeþe keÀeU lej ceeþe keÀþeCe Deeuee...!

**कु. भाग्यश्री वाघमारे,** बी.ए.प्रथम वर्ष

अहमदरपुर शहरांसह तालुक्यातील बाजारपेठ असलेल्या किनगाव... हाडोळती... आंधोरी... परचंडा... शिरुर ताजबंद... या सारख्या गावात खासगी ठिकाणी... तासांच्या ठराविक कामांच्या तत्वांवर... दरमहा अथवा दररोजच्या ठराविक पगारावर... काम करणारे किमान लाखांच्या घरातली संख्या असून असून... त्यांचे दररोजचे पोट काम केल्यावरच भरते... अशा हातावर पोट असलेल्या व्यक्तींचे पोट आज भुकेलेलेच असल्यामुळे... व त्यात शासना कडून निकृष्ट दर्जाचे... गहू आणि तांदूळ मिळत असल्यामुळे... तीव्र संताप व्यक्त केला जातोय... !

अहमदपूर व पंचक्रोशीतील... असंख्य कुटुंब हे आपल्या दररोजच्या क्षुधापूर्तीसाठी... पायपीट करतात... घाम गाळतात... हाताला मिळेल ती काम करतात.. अन् त्या मोबदल्यात जी काही मजुरी मिळेल... ती आपल्या पदरात पाडून घेऊन... त्यातूनच आपल्या चिल्या पिल्यांचे... पालन पोषण करतात... यातूनच आपली... अन् आपल्या कुटुंबियांची... चिल्यापिल्यांची हौसमौजही पूर्ण करतात. सगे सौयरे ... लग्न... समारंभ... किंवा सुख – दुःखात सहभागी होतात.... त्यात वळकटीला कधी चार पैसे शिल्लक राहतात... तर कधी राहतही नाहीत... जेव्हा राहतात तेव्हा मुलांच्या शिक्षणावर ते खर्च होतात... मुलींच्या लग्नासाठी ज्यांच्याकडे आपण काम करतो त्यांच्या कडून उचल घेणे... किंवा एखाद्या सावकाराच्या घरांच्या व्याजी पैश्यासाठी खेट्या घालाव्या लागतात... !

अशा हातावर पोट असलेल्या श्रमिक.... कष्टकरी... मजुरदार... वा छोटे छोटे व्यावसायिक... अशांच्या जवळची.... आत्तापर्यंतची त्यांनी जमवलेली... पुंजी केव्हाच संपून गेली आहे.... त्यामुळे अशा कमीत–कमी लोहा तालुक्यातील लाखांच्या घरात असलेल्या व्यक्तींचे पोट भुकेलेच आहे... ? त्यांच्यासाठी.... काळ तर मोठा कठीणच आलय... ! हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज नाही... ! विशेष म्हणजे त्यांच्या मदतीसाठी कोणी पुढाकार घेतल्याचे पाहण्यात आणि ऐकिवातही नाही... !

अहमदपूर व तालुक्यातील विविध हॉटेल... ढाब्यावरील बरील कामगार... त्यांचे आचारी... वाहन सर्व्हिसिंग सेंटर वरील कामगार... कापड दुकानातील कामगार.. आडत दुकानातील हमाल... भंगार विक्रेते... रद्दी खरेदी करणारे... छोटे – छोटे चहा टपरीवाले... पान तंबाखू विकणारे... पानपट्टीवाले... इलेक्ट्रॉनिक दुकानातील कामगार... नाव्ही दुकानदार.... व त्यांचे कारागिर... स्वीट हाऊसवाले... लाँड्रीवाले... सध्या कोरोना मुळे कामावरुन कमी केलेल्या धुणी–भांडी करणाऱ्या महिला... रसवंती गृहे व त्यांतील कर्मचारी... जनरल स्टोअर्स मधील कर्मचारी... झेरॉक्स करुन देणारे व्यासायिक... बांधकाम साहित्य पुरवठा करणारे दुकानदार... बांधकाम करणारे मिस्त्री... बांधकाम मजुरदार... रस्त्यावर बसून खेळणी विक्रेते करणारे ... कंगवा फणी... आरसा...

कुंकू... बांगड्या विकणारे... या व इतर तर असंख्य व्यक्ती... कोरोना या संसर्गजन्य रोगाच्या कचाट्यात सापडल्या आहेत... !

... वरिल क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्तींच्या... दैनंदिन जीवनाची स्थिती अत्यंत कारुण्यमय झालेली आहे...! अशा परिस्थिती इतर कोणता धंदा करण्याचे धाडसही त्यांच्याने होत नाही... ? आणि आपला रोजचा धंदा सोडला तर... एखादं दुसऱ्या धंद्याची त्यांना माहितीही नसल्यामुळे हिंमतही होत नाही... शेवटी पोट भरण्यासाठी हात – पाय हलवणे गरजेचे असल्यामुळे... कांहीजण भाजीपाला आणि कांदा विक्री करण्यासाठी सरसावलेले... अहमदपूर व तालुक्याच्या विखुरलेल्या भाजीमार्केट मध्ये आज दिसून आले...!

दि. १८ मार्च पासून ते आजतागायत ... घरात बसावे तर किती बसावे... ? अन् खावे तर काय खावे... ? वेळ घालवावा तर कसा घालवावा... ! लेकरा बाळांचे बालहट्ट पुरवाचे तर कसे पुरवावे... ? बाहेर पडावे तर कोरोना... घरात राहावे तर आपल्याच परिस्थितीचा आपल्याला दबाव येतोय ... करुणा ... येतोय ...! अशा परिस्थिती मध्ये अहमदपूर तालुक्यातील मजुरदार ... अत्यंत दयनीय परिस्थितीत जीवन कंठत आहेत ... मजुरदारांसह ... कामगारांसह ... त्यांच्या मालकांच्या ... परिस्थितीचेही नियोजन कोलमडल्यामुळे दमछाक होतीय ...! अनेकांनी आपल्याकडे काम करणाऱ्या नोकरदारांना अक्षरश:या वाऱ्यावर सोडून दिले आहे ... ? तर काही अपवनादात्मक व्यक्तींनी आपल्या नोकरदारांना अर्थसहाय्य देऊन मदत करण्याचा प्रयत्नही केलाय... !

.... ज्यांच्याकडे अंत्योदय अन्न योजनेचे ... आणि प्राधान्य कुटुंब अन्न योजनेचे कार्ड आहे ... अशांना शासनाकडून जे धान्य मिळतेय... त्याचा दर्जा निकृष्ठ असून ... त्यासाठी आकारण्यात येणारी रकमही त्या धान्याच्या दर्जा वरून जास्तीची वाटतेय ... ? बरे, हे ... धान्य घेतलेही समजा ...! तर, त्यासाठी लागणारे तेल – मीठ ... मिरची ... जिरे ... मोहरी ... कांदा ... लसून इ. आवश्यक साहित्य कशाने खरेदी करायचे ... ? का नुसतेच तांदूळ धुवून खायचे ... ? अन् गहू कसा दळायचा ... ? त्यासाठीही अनेकांकडे दमडीही नाही ... मग अशांनी काय करायचे ... ? काय खायचे ... ? असे प्रश्न त्यांच्यासमोर पडले असून ... बाजारातल्या भाजीपाल्यांचे भावही आव्वाच्या सव्वा झाल्यामुळे ते विकत घेणेही ... त्यांना परवडणारे नाही ... !

... म्हणून या कष्टकरी ... कामकरी अन् हातावर पोट असलेल्या लाखो कामगारांची पोट आज तरी भुकेलेलेच आहेत... त्यांच्या पोटाच्या खळगीचे काय ... ? म्हणून कोणता ... तहसिलदार ... नेता ... अन कोणता पुढारी ... नि कोणता सक्रिय कार्यकर्ता ... ! त्यांच्याकडे त्यांची चूल चालू आहे ... की बंद आहे ... ? या चौकशीसाठी आठ – दहा दिवसांत कोणी फिरकलेही नाही ... ? मग मदत तर कोसो दूरच राहिली ... ?

◆◆◆



# heleheOeeve vejê ceeoe®e : `keÀejevee' eJeªe×®e `elemej cene³e×' !

**कु. नवनीता रड्डेवाड,** बी.ए.प्रथम वर्ष

सध्या जगभरात कोरोना जंतूने अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. ज्या चीन देशामध्ये हा कंरोनाचा उद्भव झाला त्या देशामध्ये परिस्थिती आटोक्यात आली आहे. जगभरातील इतर देशांमध्येही कोरोना जसा उसळी मारतोय तसाच तो शांतही होतोय, हेही तेवढेच खरे आहे .जगभरातील अनेक देशांमध्ये 'लॉकडाऊन' सुरू झालाय . भारतात कोरोना संसर्ग वाढू नये म्हणून शासकीय अन् वैयक्तिक पातळीवरूनही ठोस उपाय योजिले जात आहेत .भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदींनी २२ मार्च २०२० रोजी सर्वप्रथम 'जनता कर्फ्यु ' लागू करून कोरोना व्हायरसच्या वाढत्याप्रभावाची भारताला जाणीव करून दिली.

१८ मार्च रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींजींनी रात्री ८ वाजता कोरोना या जागतिक महामारीच्या संकटाचे, जेव्हा सुतोवाच केले तेव्हा निम्म्याहून अधिक भारतीयांचे डोळे खाड्कन उघडले गेले. 'जनता कर्फ्यू' लागू केल्यानंतर जीवनावश्यक वस्तू कशा उपलब्ध होतील व यातून सामान्य माणसांची, तसेच ज्याचे हातावर पोट आहे अशांची परवड होणार नाही याची दक्षता घेण्याचे सुतोवाच करून, 'हे विश्वची माझे घर !' ही जाणीव मा. नरेंद्र मोदींच्या नसानसांत कशी ठासून भरली आहे, याची प्रचिती २२ मार्च पासून ते आजतायगत सर्व भारतवासीयांना येते आहे.

जगात थैमान घातलेल्या कोरोनाचा कायम बंदोबस्त करण्यासाठी पुन्हा दुसरे पाऊल उचलले ते २४ मार्च २०२० रोजी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदींनी रात्री ८वाजता भारतीयांना उद्देशून केलेल्या आपल्या भाषणातून रात्री १२ वाजल्या पासून ते पुढील २१ दिवस म्हणजे १४ एप्रिल पर्यंत पूर्ण देशात 'लॉकडाऊन' करण्यात येत असल्याचे जाहीर केले पहिल्यांदा जनता कर्फ्यू यशस्वी केल्याबद्दल तमाम भारतीयांचे आभार मानून आता दुसरा २१ दिवसांचा 'लॉकडाऊन' सुद्धा भारतीयांकडून यशस्वी होणार याबद्दलची शंभर टक्के खात्री बाळगूनच त्यांनी हा निर्णय घेतला आहे. २१ दिवसांचा लॉकडाऊन म्हणजे कोरोनाला हद्दपार करण्यासाठी आपल्या दरोरोजच्या जीवन जगण्यासाठी च्या सर्व आधुनिक शैली गुंडाळून ठेवून २१ दिवस घरातच सुरक्षित राहायचं अन कोरोनाचा बंदोबस्त करायचा आहे .त्यासाठीच सवंग भारतीयांना हा कार्यक्रम आत्मीयतेने आणि अत्यंत तळमळीने दिला आहे.

जगभरात आत्तापर्यंत पाहिले व दुसरे महायुद्ध झाले, प्लेगची साथ आली आणि अलिकडेच एड्स सारखे महाभयंकर संकटही आले, एड्स वर आपण मात केली मात्र अजूनही कायम स्वरूपी इलाज उपलब्ध करू नाही ? असे असले तरी एड्स रोखण्यामध्ये आपण भारतीय यशस्वी झालो आहोत. या वरील तीन संकटापेक्षाही चीन येथे नोव्हेंबर मध्ये उद्भवलेले कोरोनाचे संकट मात्र भयंकर आहे,

भीषण आहे. याची जाणीव भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या तीव्र, चाणाक्ष, चिकित्सक तसेच मूलगामी, तौलनिक बुद्धीचातुर्य लाभलेल्या नरेंद्र मोदी यांना झालेली आहे. म्हणूनच कोरोनाच्या या तिसऱ्या टप्प्यात २१ दिवसांच्या संचारबंदीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. तो यशस्वी ही होतोय. म्हणजेच कोरोनाशी चालणारे भारताचे हे 'महायुद्ध' विजयाकडे वाटचाल करत आहे , असे विधान करण्याचे धाडस केल्यास चुकीचे ठरू नये.

जगात आतापर्यंत कोरोनाने ३ लाख ३६ हजार ३५९ रुग्ण बाधित आहेत. पैकी २१ हजार ३०४ रुग्ण मृत्यू पावल्याची नोंद झाली आहे .ही संख्या कमीअधिक होऊ शकते . कोरोना बाधित रुग्णांपैकी १ लाख१४ हजार ७१८ एवढे रुग्ण दुरुस्त झाले आहेत.हे झाले जगाचे.आता या पैकी भारतात कोरोना बाधित रुग्णांची संख्या ६२२ असून पैकी १३ जणांचा मृत्यू झाला आहे तर ४३ रूग्ण दुरुस्त झाले आहेत. तर महाराष्ट्र कोरोना बाधित रुग्णांची संख्या १२५ ते १२८ च्या जवळ गेली आहे. ०३ मृत्यू पावले असून ०६ जण दुरूस्त झाले आहेत. (ही आकडेवारी सदर लेख लिहितेवेळीची आहे.)

जगाच्या तुलनेत भारत हा कोरोनाचा प्रतिकार करण्यामध्ये अग्रेसर असलेला देश आहे . वरील आकडे हे कोणत्याही प्रकारचे सत्य न दडवता जाहीर करण्यात आलेले आहेत. तसेच कोरोनाचे गांभीर्य कमी न करता आज पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जनतेला आश्वस्त करीत आहेत, हे नाकारता येत नाही .अमेरिका, इटली, स्पेन या विकसित राष्ट्रापेक्षा आपल्याकडे कोरोनाचा फैलाव अत्यंत कमी प्रमाणात आहे. ही बाब अत्यंत आनंदाची आहे. ही अशीच कायम राहणार. त्याचे कारण म्हणजे आपण लवकरच बाळगलेली सावधगिरी ! देशाचे पंतप्रधान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. उद्धव ठाकरे तसेच भारतातील प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री आणि नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन केलेले सहकार्य यशस्वीतेकडे घेऊन जाणारे आहे, असेच म्हणावे लागेल .

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदींनी देशातील , प्रत्येक राज्यातील , प्रत्येक जिल्ह्याच्या नव्हे तर प्रत्येक गल्लीतील तसेच प्रत्येक व्यक्तीच्या घराबाहेर लक्ष्मणरेखा आखून दिल्या आहेत. भारतातला प्रत्येक व्यक्ती कोरोना पासून बचावला गेला पाहिजे , नव्हे तर तो जगलाही पाहिजे या वैश्विक जाणिवेतून ही घराच्या बाहेर न पडण्याची 'लक्ष्मणरेखा' आखून दिली आहे ती वाखाणण्यासारखी आहे .

२४मार्च रोजी पंतप्रधानांनी भारतवासियांशी संवाद साधतांना कोरोनाला प्रतिबंध करण्यासाठी १५ हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले. ही बाब स्वागतार्ह आहे . या पॅकेज मधून प्रामुख्याने आरोग्य विषय उत्पादन , तपासणी यंत्रे आदिंसाठी उपयोगात आणण्यात येणार आहेत. तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतेच देशातल्या ८० कोटी जनतेला २७ रुपये किलोचा गहू २ रुपये या माफक दराने तर ३ रुपये किलो दराने तांदूळ देण्याचा निर्णय जाहीर करून जनतेला कोरोना विरुद्ध लढण्याचे फार मोठे नैतिक बळ दिले आहे. कोरोनाला प्रतिबंध करण्यासाठी, त्याला अटकाव करण्यासाठी ,त्याचे होणारे आक्रमण रोखण्यासाठीचे हे तिसरे महायुद्ध सुरू केले आहे असे समजून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपले शास्त्र परजत आहेत. म्हणजेच बसेस बंद, रेल्वे बंद, विमान सेवा बंद, खासगी वाहतूक बंद, इ. इ. बंद आहेत.

आरोग्य सेवा, अन्न धान्य पुरवठा ,जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, आणि सामाजिक मेडिकल, दवाखाने,

आणि विलगिकरणाची प्रक्रिया २१ दिवसांपर्यंत चालू ठेवली आहे. आपले हे आता तिसरे महायुद्ध हे कोरोना विरुद्धचे आहे. हे महायुद्ध एकट्या पंतप्रधानांचे नाही हे समजून आज भारतातले सर्वच राजकीय पक्ष आपापले राजकीय मतभेद विसरून कोरोना विरोधातल्या युद्धात उतरले आहेत . सामाजिक संस्था, सरकार आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्यात पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यशस्वी होतील आशावाद बळकट झालेला आहे . म्हणूनच–

*'....बी ब्रेव्ह मोदीजी ... ! '*

'कोरोना'वर मात करण्यासाठी ,त्याच्यावर प्रतिबंध आणण्यासाठी जिवाची बाजी लावणारी डॉक्टर मंडळी, रुग्णालयाचे कर्मचारी, परिचारिका, मेडिकलचे शिकावू विध्यार्थी, प्रत्येक राज्यातले जिल्हा पोलीस अधीक्षक , पोलीस निरीक्षक , सपोनि, पोलीस कर्मचारी, पोलीस चालक कर्मचारी, जिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ निरीक्षक तलाठी , ग्रामसेवक यांच्यासह शासन आणि प्रशासन हे रात्रंदिवस अथक परिश्रम करत आहेत.

वरील सर्व प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्यांना पुढील काही दिवस म्हणजे कोरोना हद्दपार होई पर्यंत सहकार्य करणे गरजेचे आहे . गेले अनेक दिवस सरकार आणि प्रशासना कडून लोकांना होत असलेले आवाहन काही लोक फारसे गंभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. पोलीस हातात दंडुके घेत आहेत. घराच्या बाहेर पडू नका म्हणून सांगत आहेत. जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होतील, असे सांगूनही लोक घराबाहेर पडत आहेत ? घरात शांत न बसण्याची व बाहेर पडण्याची अनेकांना खुमखुमी असते मग ते घराबाहेर पडतातच! त्यामुळे व्यत्यय निर्माण होतो आहे. पोलीसांनीही आपल्या संचारबंदीची अतिशयोक्ती न करता घराबाहेर पडलेल्यांवर दंडुका न उगारता, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून घरी बसण्याचा सल्ला द्यावा. शेवटी सर्व काही 'कोरोना' पासून बचाव करण्यासाठीचाच हा सगळा खटाटोप आहे .

◆◆◆

शहेर सुरक्षीत असल्याचा समज कोरोनाने मोडीत काढला असून, सर्वाधिक संसर्ग शहरांमध्येच दिसतो. शिवाय शहरी आयुष्यातील रोजची धावपळ आणि ताणतणावही अनेकांना सहन होईनासे झाले आहेत. त्यात तरुणाईचे प्रमाण जास्त असून, मोठ्या शहरापेक्षा लहान गावातच आपले काम करावे अशी त्यांची मानिसकता होत आहे. आता उलट शहरांकडून गावाकडे जाणे सुरु झाले आहे. केवळ शहरांतूनच नव्हे, तर प्रगत देशांमधूनही आपल्या मायदेशी परत यावे, असे तरुण पिढीला वाटते आहे.

**– शेख समरिन (बी.ए. तृतीय वर्ष)**



## महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

# अहवाल

# मराठी विभाग
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालयातील मराठी विभागाने स्थापने पासूनच अहमदपूर परिसरात साहित्य संस्कृती जोपासण्याच्या अनुषंगाने आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मराठी विभाग प्रमुख प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठी विभागाने बालाघाट परिसरातील गोर गरीब, वंचित समूहातील मुला-मुलींसाठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या दृष्टीने मराठी विभागाने आतापर्यंत अत्यंत महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. सत्राच्या प्रारंभीच महाविद्यालयाचे प्राचार्य तथा विभाग प्रमुख डॉ.वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठी विभागाची बैठक घेण्यात आली.या बैठकीत विद्यार्थ्यांचे प्रवेश त्याच बरोबर वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे आणि कार्यक्रमांचे वार्षिक नियोजन करण्यात आले. त्याच बरोबर वेळापत्रक आणि अभ्यासक्रमाचेही नियोजन करण्यात आले.

माननीय विभाग प्रमुख व प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली खालील प्रमाणे मराठी वाङ्मय मंडळ स्थापन करण्यात आले. त्याची ही कार्यकारिणी अशी -

१)अध्यक्ष: सिध्दोधन वाघमारे
२) उपाध्यक्ष:कृष्णा जाधव
३) सचिव: कु. मोहिनी मेकाले
४) सहसचिव: कु. महादेवी हुल्लाळे
५) कोषाध्यक्ष: शुभम् गुंजरगे
६) संघटक: निकिता कांबळे
७) सदस्य: १) कृष्णा राठोड
२) मीरा इप्पर

वाङ्मय मंडळाच्या अंतर्गत विभागाच्या वतीने दर वर्षी सहा भित्तीपत्रक आणि त्यांचे प्रकाशन केले जाते. याही वर्षी भित्तीपत्रकांचे नियमीत प्रकाशन करण्यात आले. त्यासाठी विद्यार्थ्यांचे संपादक मंडळ तयार करण्यात आले. ते असे -

१)संपादक : संतोष सोनकांबळे
२) कार्यकारी संपादक : परमेश्वर सूर्यवंशी
३) उपसंपादक : कु. मनाली अंभोरे
४) रेखाटक : कु. शिवानी मेकले
५) सजावट मांडणी : कु. अंजली हुलगुंडे
६) सदस्य:१) कु. सारिका पाटील
२) कु. भाग्यश्री वाघमारे

दि.१ ऑगस्ट २०१९ रोजी साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या शंभराव्या जयंती निमित्त मराठी

विभागाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या हस्ते 'आविष्कार' या भित्तीपत्रकाचा प्रथम अंक 'अण्णाभाऊ साठे जन्म शताब्दी विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला –

या वर्षीच्या मराठी वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्य चित्रपट परीक्षण मंडळाचे माजी सदस्य तथा ज्येष्ठ ग्रामीण लेखक जगदीश कदम यांच्या हस्ते दि.१३ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार यांच्या वाढदिवसा निमित्त विद्यार्थ्यांनी डॉ. वसंत बिरादार : व्यक्ती आणित कार्य या विषयावर लिहिलेल्या भित्तीपत्रक विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले.–

१ जानेवारी ते १५जानेवारी २०२० या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी अनुभव कथन स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच दि. १८ जानेवारी २०२० या दिवशी महाराष्ट्रातील ख्यात नाम गीतकार कवी प्रशांत मोरे, मुंबई यांच्या काव्य गायनाचा व अहमदपूर येथील कथाकार, अभ्यास क्रमातील लेखक मोहिब कादरी यांच्या कथा कथनाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आला.–

२७ फेब्रुवारी २०२० रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस हा मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख तथा संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. अशोक देशमाने यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन दि.१४ डिसेंबर २०१९ रोजी मराठी विभागातर्फे करण्यात आले होते. या वर्षात सर्वात यशस्वी ठरलेला आणि विद्यार्थ्यांनी भर भरून प्रतिसाद दिलेला मराठी विभागाचा उपक्रम म्हणजे 'मराठी व्याकरण कार्यशाळा होय.'

दि. ०४ व ०५ मार्च २०२० या दोन दिवसात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेत उदगीरच्या शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख आणि ज्येष्ठ भाषातज्ञ डॉ. सुरेश शिंदे यांनी या कार्यशाळेचे उद्‌घाटन केले. प्राचार्य डॉ.वसंत बिरादार, डॉ.अनिल मुंढे, डॉ. मारोती कसाब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिवाय वर्षभर विद्यार्थ्यांसाठी वर्ग चाचण्या, घटक चाचण्या आणि चर्चा सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

**मराठी विभाग विद्यार्थी संख्या :**

बी.ए. प्रथमवर्ष (ऐच्छिक)–
मुले :२५मुली: २४एकूण: ४९ –
२)बी.ए. प्रथमवर्ष (द्वितीयभाषा)–
मुल : २४ मुली : २५ एकूण : ४९
३) बी.ए. द्वितीय वर्ष (ऐच्छिक) – मुले:११ – मुली : ११ एकूण:२२
४)बी.ए. द्वितीय वर्ष( द्वितीय भाषा) –
मुले:१३मुली:११एकूण: २४
५)बी.ए. तृतीय वर्ष–
मुले:११मुली:१०एकूण:२१

**– डॉ. अनिल मुंढे**
**डॉ. मारोती कसाब**

# हिंदी विभाग अहवाल
# (२०१९-२०२०)

सन् २००० मे महाविद्यालय की स्थापना के साथ हिंदी विभाग भी स्थापित हुआ है. तब से हिंदी विभाग इस महाविद्यालय में कार्यरत है. इस महाविद्यालय में हिंदी विभाग निरंतर प्रगति के पथ पर अग्रसर है. इस महाविद्यालय में हिंदी विषय बी.ए. में द्वितीय भाषा एवं ऐच्छिक के रुप में पढ़ाया जाता है. स्नातक स्तर परहिंदी लेने के लिए छात्र-छात्राओं का १२वीं कक्षा में हिंदी विषय ही हो यह आवश्यक नहीं है. किसी भी विषय या संकाय का पूर्णकालीन विद्यार्थी हिंदी विषय ले सकता है.

हिंदी के पढ़ाने केल्लिए महाविद्यालय के हिंदी विभाग में दो पूर्णकालीन सहायक प्राध्यापक हैं. डॉ. नागराज मुळे ०३ फरवरी २००४ से हिंदी विभागाध्यक्ष एवं असोसिएट प्रोफेसर के रुप में कार्यरत है त डॉ. पांडुरंग चिलगर ३० नवंबर २००९ से सहायक प्राध्यापक के रूप में कार्यरत है. दोनों पूर्णकालीन हैं.

हर साल महाविद्यालय की शुरुआत जून में होती है. इस साल महाविद्यालय की शुरुआत १७ जून २०१९ को हुई. महाविद्यालय में प्रवेश लेते ही तासिकाएँ शुरु होती है. २०१९-२० के इस शैक्षणिक सक्ष में भी ०१ जुलाई से तासिकाएँ शुरु हो गई. हमारे महाविद्यालय में स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय, नांदेड का सत्रनिहाय पाठयक्रम पढ़ाया जाता है. हर साल की तरह २०१९-२० में भी बी.ए. प्रथम,द्वितीय एवं तृतीय वर्ष में प्रवेश लेने के बाद नियमित रूप से हिंदी की तासिकाएँ शुरु हो गईं. हिंदी विभाग की गतिविधियों को अमल में लाने के लिए सभी छात्र - छात्राओं की बैठक बुलाकर हिंदी साहित्य मंडल एवं संपादक मंडल की स्थापना सत्र के प्रारंभ में की गई सभीयों के साथ चर्चा कर बहुमत से हिंदी साहित्य मंडल की अध्यक्ष बी.ए. तृतीय वर्ष की छात्रा कु. ज्ञानेशवरी व्यंकट श्रीरामे को बनाया गया एवं प्रयास पत्रिका के संपादक मंडल की संपादक कु. पल्लवी कृष्णाजी पाटील को बनाया गया. नवनिर्वाचित सभी पदाधिकारियों का स्वागत किया गया. साथ ही उन्हें शुभकामनाएँ दी गई.

२०१९-२० के इस शैक्षिक सत्र में हिंदी साहित्य मंडल एवं संपादक मंडल का ज गठन किया वह इस प्रकार है.

**हिंदी सहित्य मंडल एवं संपादक मंडल, हिंदी साहित्य मंडल (२०१९-२०२०)**

| अ.क्र. | पद | नाम | कक्षा |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | कु. श्रीरामे ज्ञानेश्वरी व्यंकट | बी. ए. तृतीय वर्ष |
| २ | उपाध्यक्ष | कांबळे दिनेश बाबुराव | बी. ए. तृतीय वर्ष |
| ३ | सचिव | पवार सुरज अनिल | बी. ए. तृतीय वर्ष |
| ४ | कोषाध्यक्ष | कु. भुतके वैष्णवी दगडू | बी. ए. व्दितीय वर्ष |
| ५ | सदस्य | कु. कांबळे निकिता भानुदास | बी. ए. व्दितीय वर्ष |
| ६ | सदस्य | कु. चेपुरे तनुजा नरसन्ना | बी. ए. प्रथम वर्ष |
| ७ | सदस्य | शेख आमेर बाबुसाब | बी. ए. प्रथम वर्ष |

## संपादक मंडल (२०१९-२०२०)

| अ.क्र. | पद | नाम | कक्षा |
|---|---|---|---|
| १ | संपादक | कु. पाटील पल्लवी कृष्णाजी | बी. ए. तृतीय वर्ष |
| २ | सह संपादक | कु. बनसोडे समृद्धी सुदाम | बी. ए. प्रथम वर्ष |
| ३ | सदस्य | चाऊस अलिम मुन्ना | बी. ए. तृतीय वर्ष |
| ४ | सदस्य | कु. केगादे सिंधू माधव | बी. ए. प्रथम वर्ष |
| ५ | सदस्य | राठोड कृष्णा मेहरबान | बी. ए. व्दितीय वर्ष |
| ६ | सदस्य | कु. बनसडे अंजली विनायक | बी. ए. तृतीय वर्ष |
| ७ | शब्दसज्जा | कु. श्रीरामे ज्ञानेश्वरी व्यंकट | बी. ए. तृतीय वर्ष |

दिनांक ०७ अगस्त २०१९ को हिंदी विभाग की ओर से 'हिंदी साहित्य मंडल एवं संपादक मंडल' का उद्घाटन समारह संपन्न हुआ. इस समारोह के लिए प्रमुख अतिथि के रुप में जयक्रांती महाविद्यालय, लातूर के हिंदी विभागाध्यक्ष डॉ. दिलीप गुंजरगे उपस्थित थे. महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपुर के प्रधानाचार्य डॉ. वसंत बिरादार ने इस कार्यक्रम की अध्यक्षता की. यह कार्यक्रम बहुत शानदार ढंग से संपन्न हुआ. इस अवसर पर हिंदी विभाग की 'प्रयास' पत्रिका का विमोचन भी किया गया.

हिंदी दिवस के उपलक्ष्य में दिनांक २५ सितम्बर २०१९ के दिन हिंदी विभागाध्यक्ष डॉ. नागराज मुळे जी ने प्रमुख मार्गदर्शक के रूप में अपने विचार रखें. प्रधानाचार्य डॉ. वसंत बिरादार जी ने कार्यक्रम की अध्यक्षता की. इस कार्यक्रम की उन्होंने काफी सराहना की.

विद्यार्थियों के सर्वांगीण विकास के लिए हिंदी विभाग सदैव तत्पर रहता है। साल भर में हिंदी विभाग की ओर से 'प्रयास' पत्रिका के 'छह' अंक निकाले गए। राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग, युवक महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रमों में भाग लेने के लिए छात्र-छात्राओं को सदैव प्रेरित एवं प्रोत्साहित यिा जाता है। इसके परिणामस्वरुप अनेक विद्यार्थियों ने उपर्युक्त विभागों में उल्लेखनीय काम किया है। बावजूद इसके महाविद्यालय के विद्यार्थियों को शैक्षणिक संस्था की गतिविधियों के बारे में जानकारी हो इसलिए शैक्षिक यात्रा का आयोजन किया जाता है। इस बार ०७ मार्च २०२० को महाविद्यालय के हिंदी विभाग की ओर से हिंदी विषय के छात्र-छात्राओं की शैक्षिक यात्रा वझुर ता. पालम, जि. परभणी को निकाली गई थी. उस गाँव का मनोहारी दृश्य, वहाँ का वातावरण देखकर सभी छात्र छात्राएँ अत्याधिक प्रभावित हुए. इस तरह सालभर सभीयों ने मिलकर काम किया और हर कार्य में सफलता प्राप्त की.

**WINTER-2018**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | Percentage |
|---|---|---|---|---|---|---|---|
| B.A.F.Y. | Hindi (S.L.) I | **72** | **55** | **17** | **45** | **10** | **81.81%** |
| | Hindi (Opt.) I | **31** | **21** | **10** | **18** | **03** | **85.71%** |
| | Hindi (Opt.) II | **31** | **20** | **11** | **20** | **-** | **100.00%** |
| B.A.S.Y. | Hindi (S.L.) III | **32** | **29** | **-** | **29** | **-** | **100.00%** |
| | Hindi (Opt.) V | **27** | **25** | **02** | **24** | **01** | **96.00%** |
| | Hindi (Opt.)VI | **27** | **25** | **02** | **24** | **01** | **96.00%** |
| B.A.T.Y | Hindi (Opt.) IX | **23** | **20** | **03** | **16** | **04** | **80.00%** |
| | Hindi (Opt.)X | **23** | **21** | **02** | **20** | **01** | **95.23%** |

**SUMMER-2019**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | Percentage | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B.A.F.Y . | Hindi (S.L.) II | **40** | **39** | **01** | **33** | **06** | **84.61%** | |
| | Hindi (Opt.) III | **13** | **11** | **02** | **07** | **04** | **63.63%** | |
| | Hindi (Opt.) IV | **13** | **11** | **02** | **08** | **03** | **72.72%** | |
| B.A.S.Y . | Hindi (S.L.) III | **27** | **26** | **01** | **26** | **-** | **100.00%** | |
| | Hindi (Opt.) VII | **23** | **23** | **-** | **23** | **-** | **100.00%** | |
| | Hindi (Opt.)VIII | **23** | **23** | **-** | **23** | **-** | **100.00%** | |
| | SEC - I & II (हिंदी कौशल विकास) | **09** | **09** | **-** | **09** | **-** | **100.00%** | |
| B.A.T.Y | Hindi (Opt.) XI | **19** | **18** | **01** | **17** | **01** | **94.00%** | |
| | Hindi (Opt.)XII | **19** | **19** | - | **19** | **-** | **100.00%** | |
| | SEC - III& IV (हिंदी कौशल विकास) | **06** | **06** | - | **06** | **-** | **100.00%** | |

| Sr. No. | Class | Admitted Students | | | SC | | ST | | OBC | | OPEN | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | Total | M | F | M | F | M | F | M | F |
| 1 | B.A.F.Y. Hindi (S.L.) | 26 | 40 | **66** | 10 | 14 | - | - | 08 | 16 | 08 | 10 |
| | B.A.F.Y. Hindi (Opt.) | 19 | 17 | **36** | 02 | 05 | - | - | 11 | 12 | 06 | - |
| 2 | B.A.S.Y Hindi (S.L.) | 05 | 27 | **32** | 02 | 13 | - | - | 01 | 06 | 02 | 08 |
| | B.A.S.Y Hindi (Opt.) | 02 | 05 | **07** | 01 | 03 | - | - | 01 | 02 | - | - |
| | B.A.S.Y Hindi (SEC) | 01 | 03 | **04** | 01 | 02 | - | - | - | 01 | - | - |
| 3 | B.A.T.Y. Hindi (Opt.) | 11 | 10 | **21** | 05 | 02 | - | - | 04 | 05 | 02 | 03 |
| | B.A.T.Y Hindi (SEC) | 02 | 06 | **08** | 01 | 01 | - | - | - | 02 | 01 | 03 |

**डॉ. नागराज मुळे**
(हिंदी विभागाध्यक्ष एवं असोसिएट प्रोफेसर)

# Department of English

The department of English is one of the leading departments in the college. It offers UG course. At present three faculties are working in the department. One full time and two on C.H.B. The department of English tries to motivate to learn English language. The department conducts various activities for the enrichment of students such as seminars, group discussion & wallpaper publication.etc. With the beginning of Academic Year 2019-20 meeting was held on 27th July 2019 in Hall No.15 at 4pm under the chairmanship of Head, Department of English Asst. Prof. A. C. Akade. After consulting with students, it was decided to form English Literary Association in the following structure.

**ENGLISH LITERARY ASSOCIATION**
President : DevkatteAkshta (T.Y.)
Vice-President : GundreNeha (T.Y.)
Secretary : KadamRohini (T.Y.)
Joint-Secretary : GavaleNikita (S.Y.)
Treasure : MakapalleRani (S.Y.)
Member:MisalUma (S.Y.)
Member:PanchalPooja (T.Y.)
Member:Mekale Mohini (F.Y.)

English department also runs wallpaper “Daffodils” through E.L.A. So Editorial Board was formed in the same meeting. Active students were nominated for the Editorial Board of the wallpaper “Daffodils”.

**BOARD OF EDITORS**
Chief Editor:ShaikhMisba (S.Y.)
Co-Editor: NarvateGanesh(S.Y.)
Member:ChausNaved(T.Y.)
Member: Sayyed Jafar (T.Y.)
Member:DaradeManisha(T.Y.)
Member:DyadeVirendra(F.Y.)
Member:DodeGeeta (F.Y.)
Member:AmbhoreManali (F.Y.)

The aim and objectives of English Literary Association is to inculcate among students a fondness for language and enhance their literary skills, to work overall personality development of students. Department tries to develop leadership qualities in the students by allowing them to arrange certain functions, to run wall-paper, to develop literary taste and writing skills among the students and to promote students for creative and critical thinking skills.

The English Literary Association was inaugurated with all its splendor and grandeur. Dr. Ajay R. Tengse, Head, Department of English. Yeshwant Mahavidyalaya Nanded was the inaugurator and chief guest of this festive day. Hon ble Principal Dr. Vasant Biradar was the Chairperson of this inaugural function. The programme was anchored by Miss. Akshata Devkatte. Mr. A.C.Akade, (Head, Department of English, M. P. M. Ahmedpur), Miss S.S.Tigote and Mrs.B.K.Mhetre were present at that time.

The department through the English Literary Association runs wallpaper „Daffodils . It was also inaugurated by Dr. Ajay R. Tengse, The department is excelling in its research contribution through publication of research papers.

## Students Strength English Compulsory

| Category | B.A.F.Y (Comp.) | | B.A.S.Y. (Comp.) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Male | Female | Total | Male | Female | Total | |
| OPEN | 19 | 19 | 38 | 06 | 10 | 16 |
| SC | 17 | 20 | 37 | 05 | 15 | 20 |
| ST | — | — | — | 00 | 00 | 00 |
| VJNT/SBC | 19 | 21 | 40 | 05 | 09 | 14 |
| OBC | 07 | 07 | 14 | 02 | 05 | 07 |
| TOTAL | 62 | 67 | 129 | 18 | 39 | 57 |

## Students Strength Optional

| Category | B.A.F.Y. Optional | | | B.A.S.Y. Optional | | | B.A.T.Y. Optional | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Male | Female | Total | Male | Female | Total | Male | Female | Total |
| OPEN | 02 | 08 | 10 | 01 | 05 | 06 | 01 | 02 | 03 |
| SC | 01 | 05 | 06 | 01 | 03 | 04 | 01 | 00 | 01 |
| ST | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 01 |
| VJNT/SBC | 01 | 02 | 03 | 01 | 00 | 01 | 00 | 05 | 05 |
| OBC | 00 | 00 | 00 | 01 | 01 | 02 | 01 | 02 | 03 |
| TOTAL | 04 | 15 | 19 | 04 | 09 | 13 | 03 | 09 | 12 |

RESULT OF DEPARTMENT OF ENGLISH
ACADEMIC YEAR 2018-19
RESULT WINTER – 2018

| Class | Paper | Admitted | Exam.sub. | Present/Absent | Pass | Fail | % | Drop out |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **BAFY** | ENG.(COMP.) A.C.AKADE | 144 | 125 | 96/29 | 59 | 37 | **61.45** | **13.19** |
| | OPT. I A.C.AKADE | 22 | 22 | 18/04 | 18 | 00 | **100%** | **18.18** |
| | OPT. II B.K.MHETRE | 22 | 22 | 18/04 | 18 | 00 | **100%** | **18.18** |
| **BASY** | ENG.(COMP.) S.V.GAIKWAD | 80 | 79 | 72/07 | 63 | 09 | **88.00** | **1.25** |
| | OPT V S.S.TIGOTE | 13 | 11 | 10/01 | 10 | 00 | **100%** | **15.38** |
| | OPT VI B.K.MHETRE | 13 | 11 | 10/01 | 10 | 00 | **100%** | **15.38** |
| **BATY** | IX S.V.GAIKWAD S.S.TIGOTE | 15 | 15 | 15/00 | 09 | 06 | **60%** | **00.00** |
| | X A.C.AKADE | 15 | 15 | 15/00 | 13 | 02 | **86.66 %** | **00.00** |

RESULT OF DEPARTMENT OF ENGLISH ACADEMIC YEAR 2018-19
RESULT SUMMER – 2019

| Class | Paper | Admitted | Exam.sub. | Present/Absent | Pass | Fail | % | Drop out |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **BAFY** | ENG.(COMP.) A.C.AKADE | 144 | 74 | 69/05 | 54 | 15 | **78.20** | **48.61** |
| | OPT. III A.C.AKADE | 22 | 22 | 17/00 | 17 | 00 | **100%** | **00.00** |
| | OPT. IV B.K.MHETRE | 22 | 22 | 17/00 | 15 | 02 | **88.23 %** | **00.00** |
| **BASY** | ENG.(COMP.) S.V.GAIKWAD | 80 | 71 | 69/02 | 58 | 11 | **84.05** | **11.25** |
| | OPT VII S.S.TIGOTE | 13 | 12 | 12/00 | 10 | 02 | **83.33 %** | **07.69** |
| | OPT VIII B.K.MHETRE | 13 | 12 | 12/00 | 11 | 01 | **91.66 %** | **07.69** |
| **BATY** | XI S.V.GAIKWAD S.S.TIGOTE | 15 | 15 | 15/00 | 12 | 03 | **78.57 %** | **00.00** |
| | XII A.C.AKADE | 15 | 15 | 15/00 | 15 | 00 | **100%** | **00.00** |

**Mr. A.C. Akade**
Head of Department English

# संस्कृत विभाग
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

विद्यार्थी संख्या

| अ.क्र | वर्ग | प्रवेषित विद्यार्थी | | | Open | | OBC | | SC | | NT | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | एकूण | M | F | M | F | M | F | M | F |
| १ | बी.ए.प्रथम वर्श | ०७ | १० | १७ | ३ | ०१ | ०१ | ०५ | ०२ | ०० | ०१ | ०४ |
| २ | बी.ए.व्दितीय वर्श | ०१ | ०७ | ०८ | ०३ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ |
| ३ | बी.ए.तृतीय वर्श | ०१ | ०७ | ०८ | ०४ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०१ |

**महाकवि कालिदास दिन**

'संस्कृत' विभागातर्फे दरवर्शी आषाढ महिन्याचा प्रथम दिवस 'महाकवि कालिदास दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. हीच पंरपरा कायम ठेवत या वर्षीही दिनांक ०३ जुलै २०१९ रोजी 'महाकवि कालिदास दिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. डी. डी. चौधरी सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील

होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे डॉ. बी. के. मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्याचा परिचय संस्कृत विभागप्रमुख डॉ.प्रशांत बी.बिरादार यांनी केला व आभार प्रदर्शन प्रथम राष्ट्रीय सेवा योजना व हिंदी विभागप्रमुख डॉ. पी.डी. चिलगर यांनी केले.

संस्कृत विभागातील बी.ए.प्रथम व्दितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेऊन स्वागतगीत, मनोगत, संस्कृतगीत इत्यादी सादर केले.

**संस्कृत वाङ्मय मंडळ व संपादक मंडळ**

बी.ए.प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची एकत्रित बैठक बोलावून 'संस्कृत वाङ्मय मंडळ' व 'संपादक मंडळाची स्थापना' लोकशाही पद्धतीने करण्यात आली.

**संस्कृत वाङ्मय मंडळ**

| अ.क्र. | पद | नव | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | कु.शेकडे अंजली अंगद | बी.ए.तृतीय वर्ष |
| २ | उपाध्यक्ष | कु. कांबळे शिल्पा गंगाधर | बी.ए.व्दितीय वर्ष |
| ३ | सचिव | कु.गायकवाड मोहिनी चंद्रकांत | बी.ए.तृतीय वर्ष |
| ४ | स्हसचिव | कु. मलकापुरे रेणुका पुंडलिक | बी.ए.व्दितीय वर्ष |
| ५ | कोशाध्यक्ष | पंढरपुरे काशिनाथ राम | बी.ए.तृतीय वर्ष |
| ६ | सदस्य | कु केजकर गीतांजली राम | बी.ए.प्रथम वर्ष |
| ७ | सदस्य | कु. जायभाये प्रतीक्षा सुदाम | बी.ए.प्रथम वर्ष |

**संपादक मंडळाचे पदाधिकारी**

| अ.क्र. | पद | नव | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | संपादक | कु.सूर्यवंशी रिंका नंदकुमार | बी.ए.व्दितीय वर्ष |
| २ | सहसंपादक | कु. सूर्यवंशी स्वाती नंदकुमार | बी.ए.तृतीय वर्ष |
| ३ | रेखाटक | कु. शेकडे अंजली भरत | बी.ए.तृतीय वर्ष |
| ४ | मांडणी | कु. मलकापुरे रेणुका पुंडलिक | बी.ए.व्दितीय वर्ष |
| ५ | सदस्य | कु. डुकरे पूजा घनशाम | बी.ए.तृतीय वर्ष |
| ६ | सदस्य | कु.कांबळे शिल्पा गंगाधर | बी.ए.व्दितीय वर्ष |
| ७ | सदस्य | कु. पोले कोमल संभाजी | बी.ए.प्रथम वर्ष |

**'संस्कृतदिन' व वाङ्मय मंडळ उद्घाटन**

दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथे संस्कृत विभागातर्फे 'संस्कृत दिन व वाङ्मय मंडळ उद्घाटन' कार्यक्रम ही साजरा करण्यात आला. 'राखी पोर्णिमा' किंवा 'नारळी पोर्णिमेला' दरवर्षी संस्कृतदिन साजरा करण्यात येतो.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय राणीसावरगाव जि. परभणी चे संस्कृत विभागप्रमुख प्रा.शंकर घाडगे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील

होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी.डी.चौधरी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यानी संस्कृत वाङ्मय मंडळाचे उद्घाटन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृत विभागाची तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. शेकडे अंजली हिने संस्कृत भाषेमध्ये केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्याचा परिचय संस्कृत विभागप्रमुख डॉ.प्रशांत बी.बिरादार यांनी केला.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेऊन संस्कृत गीताने मान्यवरांचे स्वागत केले. प्रमुख पाहुणे व अध्यक्षांनी संस्कृतचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

**रक्षाबंधन**

संस्कृत विभागातर्फे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी रक्षाबंधनाचा कार्यक्रम दिनांक १५ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित करण्यात आला. भारतीय संस्कृतीतील महत्वाच्या सणाची माहिती विद्यार्थ्यांना मिळून त्यांच्या बंधुभाव वाढावा यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन या रक्षाबंधनादिवशी करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. डी.डी. चौधरी होते. सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींनी राख्या बांधून, ओवाळून अतिशय उत्साहात व आनंदात विधी पार पाडला .

कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संस्कृत विभागप्रमुख डॉ. प्रशांत बी. बिरादार यांनी केले. उपप्राचार्य डॉ. डी.डी. चौधरी यांनी आपले मनोगत तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी रक्षाबंधनाचे महत्व सांगून अध्यक्षीय समारोप केला.

## ICT CLASSES
### संस्कृत विषयाचा निकाल

**Result of Winter 2018**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | % | Droupout |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| BAFY | III | **17** | **11** | — | **09** | **02** | **81** | |
| | IV | **17** | **11** | — | **11** | **-** | **100** | |
| BASY | VI | **11** | **10** | — | **10** | **-** | **100** | |
| | VIII | **11** | **10** | — | **10** | **-** | **100** | |
| BATY | XII | **13** | **12** | — | **12** | **-** | **100** | |
| | XIII | **13** | **12** | — | **12** | **-** | **100** | |
| | XIV | **13** | **12** | — | **12** | **-** | **100** | |

**Result of Summer 2019**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | % | Droupout |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| BAFY | III | **17** | 09 | 01 | 08 | — | 100 | |
| | IV | **17** | 09 | 01 | 08 | — | 100 | |
| BASY | VI | **11** | 10 | 00 | 09 | 01 | 90 | |
| | VIII | **11** | 10 | 01 | 10 | — | 100 | |
| BATY | XII | **13** | 11 | — | 11 | — | 100 | |
| | XIII | **13** | 11 | — | 11 | — | 100 | |
| | XIV | **13** | 11 | — | 11 | — | 100 | |

**डॉ. प्रशांत बिरादार,**
प्रमुख, संस्कृत विभाग

# समाजशास्त्र विभाग

# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूरची सुरवात इ.स. २००० पासून झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून समाजशास्त्र विषयाची सुरवात झाली. सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय. समाजशास्त्र हा विषय सामाजिक जीवनातील सामाजिक भान, सामाजिक संवेदना, सामाजिक बांधिलकी, सामाजिक जाणिवा, विद्यार्थ्यामध्ये निर्माण करुन व्यक्तीला सामाजिक प्राणी बनवणारा विषय आहे.

इ. स. २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाची सुरवात जून महिन्यात प्रवेश प्रक्रियेने झाली. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या आदेशानुसार नियोजीत केलेल्या वेळापत्रकानुसार समाजशास्त्र विषयाच्या तासीका सुरु झाल्या या विभागात समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश ससाणे हे कार्यरत आहेत तर त्यांच्या सोबत या शैक्षणिक वर्षात प्रा. सौ. फेदराम ए. ए. कार्यरत आहेत. समाजशास्त्र विभागात बी.ए. प्रथमवर्षात ४३ विद्यार्थी बी.ए. द्वितीय वर्षात २५ तर बी.ए. तृतीय वर्षात २७ विद्यार्थी संख्या आहे.

मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन केले जाते. या शैक्षणिक वर्षात समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या निर्मितीसाठी समाजशास्त्र विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करुन मिटींग घेवून समाजशास्त्र अभ्यास मंडळच व संपादक मंडळाच्या पदाधिकाऱ्याची निवड अतिशय खेळीमेळीच्या व प्रसन्नतेच्या वातावरणात करण्यात आली. ती पुढील प्रमाणे आहे.

दिनां १९.८.२०१९ रोजी महाविद्यालयाच्या

**समाजशास्त्र अभ्यास मंडळ**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | कु. जोशी वर्षा विजयराव | बी.ए. तृतीय वर्ष |
| २) | उपाध्यक्ष | जाधव कृष्णा देवीदास | बी.ए. तृतीय वर्ष |
| ३) | सचिव | कु. बनसोडे अंजली विनायक | बी.ए. तृतीय वर्ष |
| ४) | कोषाध्यक्ष | पवार सुरज अनिल | बी.ए. तृतीय वर्ष |
| ५) | सदस्य | कु. भुतके वैष्णवी दगडू | बी.ए. तृतीय वर्ष |
| ६) | सदस्य | कु. देमगुंडे कुसुम खंडेराव | बी.ए. तृतीय वर्ष |
| ७) | सदस्य | कु. चव्हाण पूजा गोपीचंद | बी.ए. तृतीय वर्ष |

**'संस्कार' भितीपत्रक संपादक मंडळ**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादक | कु. पंचाळ प्रगती गणेशराव | बी.ए. तृतीय वर्ष |
| २) | सहसंपादक | नरवटे गणेश मोहन | बी.ए. द्वितीय वर्ष |
| ३) | कार्यकारी संपाद | सोनकांबळे संतोष वैजनाथ | बी.ए. तृतीय वर्ष |
| ४) | रेखाटक | कु. दराडे मनीषा अप्पाराव | बी.ए. तृतीय वर्ष |
| ५) | मांडणी | कु. गुट्टे राजश्री पंडीतराव | बी.ए. तृतीय वर्ष |
| ६) | सदस्य | कु. कदम प्रतीक्षा ज्ञानोबा | बी.ए. द्वितीय वर्ष |
| ७) | सदस्य | कु. हुलगुंडे अंजली बालाजी | बी.ए. प्रथम वर्ष |

महत्मा फुले सभागृहात समाजशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन सोहळा व संस्कार भितीपत्राचे प्रकाशन कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उदयगिरी महाविद्यालया उदगीर येथील समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. एस. जी. अन्सारी मॅडम या उपस्थीत होत्या. सर्व मान्यवरांच्या हस्ते अभ्यास मंडळ व संपादक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. अभ्यासमंडळाच्या व संपादक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यानी या शैक्षणिक वर्षात विविध दिनाचे व विषयाचे औचित्य साधून वर्षभर विविध संस्कार भितीपत्रकाचे प्रकाशन मा. प्राचार्य साहेबांच्या हस्ते प्रकाशन केले.

या शैक्षणि वर्षात प्रतिवर्षाप्रमाणे जागतिक ८ मार्च महिला दिनानिमित्त समाजशास्त्र विभाग आयोजीत मा. प्राचार्य साहेबांच्या अध्यक्षतेखाली महिलांचा सन्मान हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अहमदपूर पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. अयोध्याताई केंद्रे उपस्थीत होत्या. या कार्यक्रमात वर्षाताई लगडे, आशाताई केंद्रे भामाबाई कदम, पल्लवी मस्के, तेजस्वीनी गायकवाड, अयोध्या कामखेडकर, मीराबाई चिमले. अर्चना कानडे, आदि समाजातील कर्तबगार विधवा मातांचासाठी चोळी आणि सन्मानत्र देऊन महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. या बरोबरच महाविद्यालयातील महिला प्राध्यापिकांचाही साडी चोळी व सन्मानपत्र देऊन व सर्व विद्यार्थीनीचा गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

२०१९-२० या शैक्षणिक वर्षात बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी पुढील प्रमाणे आहेत.

| | | **मुले** | **मुली** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| १) | बी.ए. प्रथम वर्ष | २२ | २१ | ४३ |
| २) | बी.ए. द्वितीय वर्ष | ०७ | १८ | २५ |
| ३) | बी.ए. तृतीय वर्ष | १२ | १५ | २७ |

समाजशास्त्र विषयाचा उन्हाळी २०१९ च्या परीक्षेचा निकाल खाकोल प्रमाणे नमूद केला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बी. ए. प्रथम वर्ष पेपर - III | - | 76.92% |
| | बी. ए. प्रथम वर्ष पेपर - IV | - | 100% |
| २) | बी. ए. द्वितीय वर्ष पेपर - VII | - | 100% |
| | बी. ए. द्वितीय वर्ष पेपर - VIII | - | 100% |
| 3) | B.A. S. Y. Sec. I, II | | 100% |
| ४) | बी. ए. तृतीय वर्ष पेपर - XI | - | 94% |
| ५) | बी. ए. तृतीय वर्ष पेपर - XII | - | 100% |
| ६) | बी. ए. तृतीय वर्ष पेपर - Sec, III, IV | - | 100% |

अशा प्रकारे समाजशास्त्र विभागाच्या वतीने या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचेच ज्ञान दिले गेले नाही तर या प्राचार्य साहेबांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या कार्यक्रमाचे उपक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्ये साहित्य निर्मिती वाचन संस्कृती वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रा. डॉ. सतीश ससाणे,**
प्रमुख, समाजशास्त्र विभाग

**MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA, AHMEDPUR**
**(NAAC Accredited 'B' Grade) RESULT OF SOCIOLOGY DEPARTMENT**
**(2018-19)**
**WINTER-2018**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | pass | Fail | Perentage |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Sociology (Opt.) I | 58 | 38 | 16 | 35 | 03 | 92.10% |
| B.A. F. Y. | Sociology (Opt.) II | 54 | 36 | 18 | 36 | - | 100.00% |
| | Sociology (Opt.) III | 35 | 30 | - | 30 | - | 92.10% |
| B.A. S. Y. | Sociology (Opt.) IV | 35 | 30 | - | 30 | - | 100.00% |
| | Sociology (Opt.) IX | 25 | 25 | - | 19 | | 76.00% |
| B.A. T. Y. | Sociology (Opt.) X | 25 | 25 | - | 23 | 02 | 92.00% |

**MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA, AHMEDPUR**
**(NAAC Accredited 'B' Grade) RESULT OF SOCIOLOGY DEPARTMENT**
**(2018-19)**
**Summer-2018**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | pass | Fail | Perentage |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Sociology (Opt.) III | 28 | 26 | 02 | 20 | 06 | 76.92% |
| B.A. F. Y. | Sociology (Opt.) IV | 28 | 26 | 02 | 26 | - | 100.00% |
| | Sociology (Opt.) VIII | 29 | 29 | - | 29 | - | 100.00% |
| B.A. S. Y. | Sociology (Opt.) IV | 29 | 29 | - | 29 | - | 100.00% |
| | SEC - I, II | 09 | 09 | - | 09 | - | 100.00% |
| | Sociology (Opt.) IX | 18 | 18 | - | 17 | - | 94.44% |
| B.A. T. Y. | Sociology (Opt.) X | 18 | 18 | - | 18 | - | 100.00% |
| | SEC-III,IV | 09 | 09 | - | 09 | - | 100.00% |

# इतिहास विभाग
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

इ. स. २००० मध्ये महाविद्यालयाच्या स्थापनेपासून इतिहास विषयाची सुरुवात झालेली आहे व विद्यार्थ्यांसाठी एक ऐच्छिक विषय म्हणून इतिहास विषय बी.ए. प्रथम वर्षात निवडता येतो. इ.स. २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जून महिन्यात विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया पूर्ण होऊन झाली.

प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाल्यावर विद्यापीठाच्या आदेशानुसार व महाविद्यालयाच्या वेळापत्रकानुसार इतिहास विभागाच्या तासिका सुरु झाल्या. इतिहास विभागात विभागप्रमुख प्रा. डॉ. बब्रुवान मोरे व प्रा. डॉ. संतोष पाटील हे कार्यरत आहेत. इतिहास विभागात बी.ए. प्रथम वर्ष ७२ विद्यार्थी, बी.ए. द्वितीय वर्ष १८ विद्यार्थी व बी.ए. तृतीय वर्ष २८ विद्यार्थी संख्या आहे.

इतिहास विभाग हा महाविद्यालयात महत्त्वपूर्ण विभाग म्हणून कार्य करतो इतिहास विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांची मिटींग घेवून इतिहास विभाग अभ्यास मंडलाच्या पदाधिकाऱ्यांची व इतिहास विषयाच्या संस्कृती भित्तीपत्रकाच्या संपादक मंडळाची निवड करण्यात आली, ती पुढीलप्रमाणे आहे.

**इतिहास विभाग अभ्यास मंडळ**

१) अध्यक्ष – कु. पल्लवी पाटील,
बी. ए. तृतीय वर्ष

२) उपाध्यक्ष – शिरीषकुमार खंडाळीकर,
बी.ए. तृतीय वर्ष

३) सचिव – विष्णुदास पांचाळ,
बी.ए. तृतीय वर्ष

४) सहसचिव – विश्वजीत कदम,
बी.ए. द्वितीय वर्ष

५) कोषाध्यक्ष – निखील भालेराव,
बी.ए. द्वितीय वर्ष

६) संघटक – कु. मोहिनी मेकाले,
बी.ए. प्रथम वर्ष

७) सदस्य – कु. समृद्धी बनसोडे,
बी.ए. प्रथम वर्ष

८) सदस्य – कु. गीता दोडे,
बी. ए. प्रथम वर्ष

**'संस्कृती' भित्तीपत्रक संपादक मंडळ**

१) संपादक – रिंका सूर्यवंशी,
बी.ए. तृतीय वर्ष

२) कार्यकारी संपादक – कु. अंजली शेकडे,
बी.ए. तृतीय वर्ष

३) सहसंपादक – कृष्ण राठोड,
बी.ए. द्वितीय वर्ष

४) रेखाटक – मनाली अंभोरे,
बी.ए. प्रथम वर्ष

५) मांडणी – कु. वैष्णवी सोनवणे,
बी.ए. प्रथम वर्ष

६) सजावट – कु. मनीषा पवार,
बी.ए. प्रथम वर्ष

७) सदस्य – कु. प्राजक्ता कांबळे,
बी.ए. प्रथम वर्ष
– कु. अनिता वाघमारे,
(बी.ए. प्रथम वर्ष)
– कु. नम्रता होळे,

बी.ए. प्रथम वर्ष

इतिहास विभागाच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन इतिहास अभ्यास मंडळाच्या व 'संस्कृती' भित्तीपत्रक संपादक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी वर्षभर सातत्याने उत्साहाने व आनंदाने केले.

**इतिहास अभ्यास मंडळ व संस्कृती भित्तीपत्रक प्रकाशन कार्यक्रम** –

दिनांक ९.८.२०१९ रोजी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. डॉ. काशिनाथ चव्हाण, इतिहास विभाग प्रमुख, श्री योगानंद महाविद्यालय वसमत जि. हिंगोली यांच्या प्रमुख उपस्थिती इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन व संस्कृती भित्तीपत्रकाचे प्रकाशन मराठमोळ्या पद्धतीने प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांना फेटा बांधून व दीप प्रज्ज्वलन करुन करण्यात आले.

या कार्यक्रमात डॉ. काशिनाथ चव्हाण यांनी ऐतिहासिक संदर्भ देत मराठ्यांच्या इतिहासाची माहिती दिली. पदाधिकारी विद्यार्थ्यांनी मनोगते मांडली. इतिहास विषयाच्या प्राध्यापकांनी व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी समयोचित भाषणे केली.

**वर्षभर विविध भित्तीपत्रकांचे प्रकाशन** –

इतिहास विभागाच्या संस्कृती भित्तीपत्रक संपादक मंडळातर्फे वर्षभर विविध विषयांवर एकूण ६ भित्तीपत्रकांचे प्रकाशन मा.प्राचार्यांच्या हस्ते समारंभपूर्वक विविध कार्यक्रमांचे औचित्य साधून करण्यात आले. या माध्यमातून ऐतिहासिक लेखाद्वारे प्रबोधन करण्याचे कार्य संपादक मंडळाने, केले.

वर्गनिहाय व लिंग निहाय विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | वर्ग प्रवेशी | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | बी.ए. प्रथम वर्ष | ३५ | ३७ | ७२ |
| २) | बी.ए. द्वितीय वर्ष | ०८ | १० | १८ |
| ३) | बी.ए. तृतीय वर्ष | १२ | १६ | २८ |

इतिहास विभागाचा २०१८–१९ निकाल खालील ३ टेबल प्रमाणे आहे.

**डॉ. बब्रुवान मोरे**
प्रमुख, इतिहास विभाग

करोनाचा साथीमुळे जग हादरले आहे. अमेरिकेसारख्या विकसित देशाला या साथीचा मोठा फटका बसला आहे. लॉकडाऊनमुळे जवळपास सगळे व्यवहार बंद आहेत. पूर्ववत व्हायला काही काळ जावा लागेल. सध्या चर्चा सुरु आहे, ती कोरोना नंतरच्या जगाची. या नव्या जगातील मूल्ये फार बदललेली असतील. कामगारांचे जगणेही साफ बदलून जाईल. असंघटित कामगारांना रोजगाराचा धोका पत्करावा लागणार आहे. कर्ज घेतलेले कामगार अडचणीत येतील.

**– विश्वजीत कदम, (बी.ए. द्वितीय वर्ष)**

# राज्यशास्त्र विभाग
# वार्षिक अहवाल २०१९-२०

राज्यशास्त्र विभाग अभ्यासमंडळ व संपादक मंडळ. बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची एकत्रित बैठ बोलावून राज्यशास्त्र विभाग अभ्यासमंडळ व संपादक मंडळाची स्थापना लोकशाही पद्धतीने करण्यात आली राज्यशास्त्र विभाग अभ्यासमंडळ व संपादक मंडळाची स्थापना

**राज्यशास्त्र विभाग अभ्यासमंडळ व संपादक मंडळाची स्थापना**

| अ.क्र. | पद | नाव | वर्ग |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | अनिल पागे | बी.ए. तृतीय वर्ष |
| २. | उपाध्यक्ष | कु. सुमैया चाऊस | बी.ए.प्रथम वर्ष |
| ३. | सचिव | ज्ञानेश्वरी श्रीरामे | बी.ए.द्वितीय वर्ष |
| ४. | सहसचिव | मनीषा दराडे | बी.ए. द्वितीय वर्ष |
| ५. | कार्याध्यक्ष | कुसुम देमगुंडे | बी.ए. प्रथम वर्ष |
| ६. | सदस्य | इम्रान शेख | बी.ए. प्रथम वर्ष |

**संपादक मंडळाचे पदाधिारी**

| अ.क्र. | पद | नाव | वर्ग |
|---|---|---|---|
| १ | संपादक | कु. स्मिता मुसळे | बी.ए. तृतीय वर्ष |
| २ | सहसंपादक | कु. रेणुका मलकापुरे | बी.ए. प्रतम वर्ष |
| ३. | रेखाटक | सुरज पवार | बी.ए. द्वितीय वर्ष |
| ४. | मांडणी | वैष्णवी भुतके | बी.ए. प्रथम वर्ष |
| ५. | सजावट | कु. पूजा चव्हाण | बी.ए. प्रथम वर्ष |

'सार्वभोमत्व' या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले

२०१९-२०२० या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस अभ्यास मंडळाची स्थापना करुन, अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन प्रा. डॉ. मोरे ए. आर., श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सार्वभोमत्व या नावाच्या भितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सन्मानीय प्राचार्य डॉ. वसंत बिरादार तसेच अभ्यास मंडळाचे अध्यक्ष पवार सुरज व संपादक मंडळाचे मुख्य संपादक कु. सुरकुटे प्रतीक्षा महाविद्यालयाचे उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभागाप्रमुथ डॉ. डी. डी. चौधरी हेही उपस्थित होते. व इतर विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

**Result of Winter 2018**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| BAFY | I | **67** | **49** | 18 | **46** | **03** | **93.87** |
| | II | **67** | **49** | 19 | **44** | **04** | **91.066** |
| BASY | V | **41** | **35** | 6 | **35** | - | **100** |
| | VI | **41** | **35** | 6 | **35** | - | **100** |
| BATY | IX | **32** | **32** | — | **28** | **04** | **87.50** |
| | X | **32** | **32** | — | **27** | **05** | **84.37** |

**Result of Summer 2019**

| Class | Paper | Admitted | Present | Absent | Pass | Fail | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| BAFY | III | **35** | **32** | 3 | **29** | **03** | **90.62** |
| | IV | **35** | **32** | 3 | **28** | **04** | **87.50** |
| BASY | VI | **34** | **34** | - | **30** | **04** | **88.00** |
| | VIII | **34** | **34** | - | **34** | -- | **100** |
| BATY | XI | **24** | **34** | — | **24** | -- | **100** |
| | XII | **24** | **24** | — | **23** | **01** | **95.83** |

**डॉ. पी.पी. चौकटे**

प्रमुख, राज्यशास्त्र विभाग

# अर्थशास्त्र विभाग
# अहवाल २०१९-२०

शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून महाविद्यालयात अर्थशास्त्र विभाग कार्यरत आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबत व्यवहारिक , ज्ञानात्मक व सर्वांगीण विकास घडावा या दृष्टीने फुले पॅटर्न चा महत्वाचा भाग म्हणून यशस्वीपणे प्रयत्नरथ राहिलेला आहे.विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राच्या सैद्धांतिक ज्ञानासोबत व्यवहारीक ज्ञान घेण्यासाठी तसेच त्यांच्यातील सुप्त कौशल्य विकसित होण्याच्या उद्देशाने विविध प्रेरणात्मक कार्यक्रम यशस्वीपणे प्राचार्यांच्या मार्गदर्शनातून वागवत आलेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून शैक्षणिक वर्ष प्रारंभी प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागताचा व सोबतच अर्थशास्त्र अभ्यासमंडळ व संपादक मंडळ स्थापन करण्याचा कार्यक्रम बैठकीच्या द्वारे घेण्यात आला.यातून अभ्यासमंडळ व अर्थशास्त्र संपादक मंडळ स्थापन करून ९अर्थस्पंदन ९ भित्तीपत्रकाच्या विमोचनाचा आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा कार्यक्रम दिनांक ०३ऑगस्ट २०१९ या दिवशी निश्चित करण्यात आला त्यानूसार या दिवशी अर्थशास्त्र अभ्यासमंडळ उद्घाटन व अर्थस्पंदन भित्तीपत्रक विमोचन कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे व मार्गदर्शक म्हणून डॉ. शाहूराज मुळे यांनी भारतीय अर्थनिती या विषयावर विद्यार्थ्यांना मौलीक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार हे होते. संपादक मंडळाने या शैक्षणिक वर्षात विविध महत्वपुर्ण आर्थिक घडामोडीवर सहा भित्तीपत्रके प्रकाशित केली. या विविध भित्तीपत्रकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अर्थशास्त्र विषयक ज्ञानामध्ये भर पडावी तसेच अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याशिवाय इतरही विषयातील विद्यार्थ्यांना आर्थिक घडामोडीचे ज्ञान व्हावे.या उद्शाने भित्तीपत्रकाचा उपक्रम राबविला या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संशोधन, संशोधन लेखन या मध्ये गती मिळावी.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा विस्तारण्याच्या उद्देशाने विभागाने वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या गटचर्चा सेमीनार अंतर्गत परीक्षा हे विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबविले तसेच कोव्हिड १९ या महामारीच्या काळामध्ये विद्यार्थ्यांशी व्हॉट्सऍप ग्रुप च्या माध्यमातून झुम ऍप द्वारे महत्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा ज्ञानयज्ञ अखंडपणे तेवत ठेवला यासाठी प्राचार्यांचे प्रोत्साहन ठरले.विद्यार्थ्यांना महाविद्यालयाबाहेरील परिसरातून शिक्षण देण्याच्या उद्देशाने तसेच सेंद्रीय शेतीपध्दतीची व शेती उत्पादन प्रक्रिया उद्योगाचे माहिती मिळविण्यासाठी रावळ राजूर जि.

परभणी येथे एकदिवसीय शैक्षणिक सहल व परिसर भेट कार्यक्रम राबविण्यात आला. या शैक्षणिक भेटीमध्ये सेंद्रीय शेती तज्ञ श्री गंगाधरराव पवार यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. प्रतीवर्षाप्रमाणे याही वर्षी अर्थशास्त्र विभागाचे निकालाचे उत्कृष्ट परंपरा कायम राहिली. या शैक्षणिक वर्षात अर्थशास्त्र अभ्यासमंडळ व अर्थस्पंदन भित्तीपत्रक संपादक मंडळ रचना खालीलप्रमाणे होती.

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०**

**अर्थशास्त्र अभ्यासमंडळ**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | कु. अक्षता देवकते |
| उपाध्यक्ष | परमेश्वर सूर्यवंशी |
| सचिव | कु. मोहिनी मेकाले |
| सदस्य | कु. समृध्दी बनसोडे |
| | कु. प्रज्ञा व्यवहारे |
| | कु. दिव्या दहीकांबळे |
| | हनुमंत होळे |

..............................................................

**संपादक मंडळ**

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०**

| | |
|---|---|
| संपादक | विष्णूदास पांचाळ |
| सहसंपादक | कु. ज्ञानेश्वरी श्रीरामे |
| रेखाटक | कु. रोहिणी कदम |

| | |
|---|---|
| सदस्य | कु. सुमैया चाऊस |
| | कु. मनाली अंभोरे |
| | कु. गीता दोडे |
| | कु. प्रियंका जाधव |

**शैक्षणिक वर्ष २०१९-२०**

**विद्यार्थी संख्या**

| वर्ग | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकूण |
|---|---|---|---|
| बी.ए.प्रथम वर्ष | १७ | ३१ | ४८ |
| बी.ए.द्वितीय वर्ष | ०९ | २२ | ३१ |
| बी. ए. तृतीय वर्ष | १० | १० | २० |
| एकूण | ३६ | ६३ | ९९ |

**डॉ. डी.डी.चौधरी**

प्रमुख, अर्थशास्त्र विभाग

**Year 2018-19 (B.A.F.Y.)**

| PAPER NO. | | ADMIT. STU. M | F | T | APPE | PRES | ABS. | PASS | RESULT | DROPOUT | AVARG. RESULT | DROP OUT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| I SEM. | I | 21 | 39 | 60 | 53 | 35 | 18 | 35 | 100% | 11.66 | | |
| | II | 21 | 39 | 60 | 53 | 36 | 17 | 36 | 100% | 11.66 | 98.38% | 26 |
| II SEM | III | 21 | 39 | 60 | 36 | 31 | 5 | 29 | 93.5% | 40 | | |
| | IV | 21 | 39 | 60 | 36 | 31 | 5 | 31 | 100% | 40 | | |

**STUDENT PROFILE- RESULT**

**Year 2018-19 (B.A.S.Y.)**

| PAPER NO. | | ADMIT. STU. M | F | T | APPE | PRES | ABS. | PASS | RESULT | DROPOUT | AVARG RESULT | DROP OUT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| III SEM. | V | 17 | 11 | 28 | 27 | 24 | 3 | 24 | 100% | 3.57 | | |
| | VI | 17 | 11 | 28 | 27 | 24 | 3 | 24 | 100% | 3.57 | | |
| | SEC | 6 | 2 | 8 | 8 | 8 | -- | 8 | 100% | -- | 99% | 5.95 |
| IV SEM | VII | 17 | 11 | 28 | 24 | 22 | 2 | 22 | 100% | 14.28 | | |
| | VII | 17 | 11 | 28 | 24 | 22 | 2 | 21 | 95.45% | 14.28 | | |
| | SEC | 6 | 2 | 8 | 8 | 8 | -- | 8 | 100% | -- | | |

# भूगोल विभाग
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर येथे सन २००० पासून भूगोल या ऐच्छिक विषयाच्या अभ्यासाला सुरवात झाली अल्पावधीतच या विषयाला विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळाला व भूगोल विषय विद्यार्थ्यां प्रिय झाला. भूगोल विभागात मी प्रा.डॉ दिगंबर माने व माझे सहकारी प्रा.डॉ.सचिन गर्जे सर कार्यरत आहोत. गेल्या १९ वर्षात आमच्या विभागाने अधिकाधिक गुणवंत विद्यार्थी घडवली आहेत. तसेच उपयोजित ज्ञानाची कास धरली आहे .

महाविद्यालयाच्या उज्वल यशाच्या परंपरेत व जडघडणीत भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांचे योगदान नक्कीच मोलाचे आहे भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी सदैव विद्यापीठीय स्तरावर सर्वाधिक गुण घेऊन महाविद्यालयाच्या नावलौकिक वाढवला आहे.

विद्यापीठाच्या सन २०१६ -२०१७ च्या परिक्षेत भूगोल विषयात तानाजी संजय कांबळे यानी विद्यापीठाचे सुवर्णपदक पटकावले तर सन २०१८ - २०१९ च्या परिक्षेत भूगोल विषयात ससाने कैलास सुनिल यानी विद्यापीठाचे सुवर्णपदक पटकावले याचा महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे.

८ (२०१९ - २०२० मध्ये बी.ए.प्रथम वर्षात १८ द्वितीय वर्षात १३ व तृतीय वर्षात २३ विद्यार्थी भूगोल विषयाचे अध्ययन करत आहेत

**वर्ग निहाय विद्यार्थ्यांती संख्या**

**सन २०१९ / २०२०**

| वर्ग | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|
| बी.ए.प्रथम वर्ष | ०९ | ०९ | १८ |
| बी.ए. द्वितीय वर्ष | ०५ | ०८ | १३ |
| बी.ए. तृतीय वर्ष | १२ | ११ | २३ |
| एकुण | २६ | २८ | ५४ |

शैक्षणिक वर्षाची सुरवात झाल्यानंतर दि २४ जुलै २०१९ रोजी अभ्यास मंडळाची बैठक संपन्न झाली लोकशाही पद्धतीने निवडून घेऊन भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली भूगोल अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी पांचाळ विष्णूदास तर उपाध्यक्ष पदी वाघमारे सिध्दोधन याची निवड करण्यात आली

विभागाकडू दर महीण्याला 'वसुंधरा' या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात येते या भित्तीपत्रकाच्या कार्यकारिणीची निवड या वेळी करण्यात आली संपादक गुंडरे नेहा उपसंपादक सोनकांबळे संतोष तर प्रसिध्दी प्रमुख म्हणून शेकडे अंजली याची निवड करण्यात आली

**अभ्यास मंडळ**

| अ.क्र. | पद | पदाधिकारी नाव |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | विष्णूदास पांचाळ |
| २ | उपाध्यक्ष | सिध्दोधन वाघमारे |
| ३ | सचिव | शुभम गुंजरगे |
| ४ | सहसचिव | हनमंत होळे |
| ५ | कोषाध्यक्ष | नावेद चाऊस |
| ६ | सदस्य | दिनेश कांबळे |
| ७ | सदस्य | शिरीषकुमार खंडाळीकर |

**संपादक मंडळ**

| अ.क्र | पद | पदाधिकारी नाव |
|---|---|---|
| १ | संपादक | कु. नेहा गुंडरे |
| २ | सहसंपादक | संतोष सोनकांबळे |
| ३ | प्रसिद्धी प्रमुख | कु. अंजली शेकडे |
| ४ | मांडणी | कु. अंजू वाघमारे |
| ५ | सजावट | कु. रिंका सूर्यवंशी |
| ६ | सदस्य | कु. स्वाती सूर्यवंशी |
| ७ | सदस्य | कु. मोहिनी गायकवाड |

दिनांक २१ ऑगस्ट २०१९ रोजी भूगोल अभ्यास मंडळ उदघाटन सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दर्शना कानवटे भूगोल विभाग प्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय किनगांव उपस्थित होत्या याच्या हस्ते अभ्यास मंडळ उदघाटन झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ वसंत बिरादार पाटील हे होते या वेळी मोठ्या संख्येने प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

तर्फे क्षेत्रभेटी , भौगोलिक सहलीचे आयोजन करण्यात येते तसेच महत्वपूर्ण दिवस साजरा केले जातात १४ जानेवारी हा दिवस 'भूगोल दिन' म्हणून साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शहाजी मरशिवणे भूगोल विभाग कै.बापुसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते.

**डॉ. डी. एन. माने**
प्रमुख, भूगोल विभाग

वैद्यकीय क्षेत्रात सातत्याने बदल होत आहेत. त्या मागे विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती हे कारण असून, डॉक्टरांसमोर बसून आपल्या आजारांची त्यांना माहिती देणे आणि नंतर उपचार सुरु करणे ही सध्याची पद्धत आहे. पण, दूर किंवा दुर्गम भागात असलेल्या 'टेलि-मेडिसीन' ने फार मोठा आधार दिला आहे. याच पद्धतीचा सध्याच्या 'कोव्हिड-१९' च्या साथीत दवाखाने असल्यामुळे 'टेलिमेडिसीन' हा रुग्णांना मोठा आधार ठरला असून, डॉक्टरही हे तंत्रज्ञान आत्मसात करत आहेत.

**- कु. रिंका सूर्यवंशी (बी.ए. तृतीय वर्ष)**

# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल सन २०१९-२०२०

महात्मा फुले महाविद्यालयात रा. से.यो.चे १०० विद्यार्थ्यांचे एक युनिट आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर रा.से.यो. प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यात आली आहे. ऑगस्ट २०१९ पर्वी म्हणजेच शैक्षणिक वर्षाच्या सुरुवाती पासून रा.से.यो. विभागातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन रा.से. यो. संबंधी विद्यार्थ्यांमध्ये पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

३१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला. २६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त 'सामाजिक न्यायादिन' साजरा करण्यात आला.

दि. १ जुलै २०१९ ते ३१ जुलै २०१९ या दरम्यान नव मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले. १ जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री 'कै. वसंतराव नाईक यांची जयंती' 'कृषीदिन' म्हणून साजरी करण्यात आली. दि. १ जुलै २०१९ ते ३१ जुलै २०१९ या दरम्यान महावृक्षारोपण अभियाना अंतर्गत महाविद्यालयात तसेच महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या मौजे. ब्रह्मपुरी या गावात वृक्षारोपण करण्यात आले. ११ जुलै २०१९ रोजी महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली.

रा.से.यो. स्वंयसेवक प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यास नवप्रवेशित विद्यार्थ्यांना रा.से.यो. ची माहिती मिळावी या उद्देशाने दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत माजी कार्यक्रमाधिकारी तथा उपप्राचार्य डॉ. डी. डी. चौधरी वन कार्यमाधिकारी डॉ. पी.डी. चिलगर यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले.

तसेच महाविद्यालया मध्ये विविध महापुरुषांच्या पुण्यतिथी व जयंत्या साजऱ्या केल्या जातात. त्याचबरोबर स्वामी विवेकानंद स्मृतिदिन, ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन, २३ जुलै लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. तसेच भारताचे राष्ट्रपती डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांना रा.से.यो. तर्फे श्रद्धाजंली अर्पण करण्यात आली. त्याचबरोबर १ ऑगस्ट २०१९ मध्य टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती, क्रांतीसिंह नाना पाटील जयंती, रवींद्रनाथ टागोर स्मृतिदिन साजरा करण्यात आला. त्याचबरोबर स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच २० ऑगस्ट रोजी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. पी.डी. चिलगर यांनी उपस्थित प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना 'सद्भावनेची' शपथ दिली.

२८ ऑगस्ट रोजी स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.उद्धव भोसले व प्र. कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या हस्ते कार्यक्रमाधिकारी डॉ. पी.डी. चिलगर यांना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार देण्यात आला.

कोल्हापूर व सांगली भागातील मदतीसाठी

अहमदपूर शहरातून मतदार काढण्यात आली व १७९२१/- रुपयाचा मदत निधी प्राचार्य डॉ. वसंत बिरारदार साहेबांकडे सुपूर्द करण्यात आला.

तसेच शैक्षणि वर्ष २०१९-२० ची राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११.०९.२०१९ रोजी घेण्यात आली. या बैठकीत विविध कार्यक्रमाच्या आयोजन करण्याबाबतची रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच एन.एस.एस. विद्यार्थी प्रतिनिधी कु. पूजा केशवराव देशमुख हीची निवड करण्यात आली.

दि. ४ सप्टेंबर रोजी मोबाईलचे दुष्परिणाम हा प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आला यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अहमदपूरचे पोलीस स्टेशनचे पी.आय. मा. सुनीलकुमार पुजारी उपस्थित होते.

८ सप्टेंबर हा दिवस महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन' म्हणून साजरा केला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार व तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ केला.

१७ सप्टेंबर हा दिवस महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे संचलन, राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत कु. वैष्णवी भुतके व अक्षता देवकत्ते यांनी प्रतिनिधीक स्वरुपात गायिले.

२५ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना विभाग व हिंदी विभागाच्या वतीने 'हिंदी दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर राष्ट्रीय सेवा योजना स्वच्छता ही सेवा प्रसिद्धी सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. या सप्ताह दरम्यान स्वच्छता अभियान, फीट इंडिया, एन.एस.एस. दिन मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले.

राज्यस्तरीय 'आव्हान' शिबीरामध्ये विभुते विखील या विद्यार्थ्याने सहभाग घेतला तसेच या शिबीरासाठी नियोजन मंडळावर कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांची विद्यापीठाने निवड केली. यांनी यशस्वीरित्या आपली जबाबादारी पार पाडली.

दि. ०२ ऑक्टोंबर २०१९ रोजी महत्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री यांची जयंती जागतिक अहिंसा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

दि. ०३ ऑक्टोंबर २०१९ या दिवशी महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंती साजरी करण्यात आली.

दि. १५ ऑक्टोंबर २०१९ या दिवशी माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. अब्दुल यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.

दि. ३१ ऑक्टोंबर २०१९ सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म दिवस राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून साजरा करण्यात आला. तसेच इंदिरा गांधी यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये दि. १४ नोव्हेंबर २०१९ रोजी भारताचे पहिले प्रतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा जन्म दिन 'बालक दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

दि. १९ नोव्हेंबर २०१९ रोजी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. दि. १९ ते २५ नोव्हेंबर २०१९ या दरम्यान महाविद्यालयात 'कौमी एकता सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले होते.

दि. २५ नोव्हेंबर २०१९ रोजी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांचा स्मृती दिन साजरा करण्यात आला.

दि. २६ नोव्हेंबर २०१९ या दिवसी मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. पी.डी. चिलगर यांनी संविधान प्रास्तविकेचे निवेदनासह सामूहिक वाचन केले.

दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी महात्मा फुले यांचा 'स्मृती दिन' साजरा करण्यात आला. १ डिसेंबर २०१९ मध्ये महाविद्यायात एड्स जनजागरण कार्यक्रम घेण्यात आला. तसेच ६ डिसेंबर २०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'महापरिनिर्वाण दिन' तसेच १ ते १५ डिसेंबर २०१९ एड्स संबंधी जनजागृती पंधरवाडा साजरा करण्यात आला.

दि. २० डिसेंबर २०१९ रोजी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. प्रशांत बिरादार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. २४ डिसेंबर २०१९ रोजी साने गुरुजी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. अनिल मुंढे यांनी मार्गदर्शन केले.

दि. २५ डिसेंबर २०१९ या दिवसी भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्म दिवस सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला. यादिवशी 'तणाव मुक्ती व्यवस्थापन' या विषयावर डॉ. संतोष पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. ३ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. डी. चिलगर यांनी प्रास्ताविक केले एन.एन.एस. विद्यार्थी प्रतिनिधी कु. पूजा देशमुख हीने मनोगत व्यक्त केले.

दि. १२ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक दि. २३.०१.२०२० रोजी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतोली संपन्न झाली.

दि. २३ जानेवारी २०२० रोजी शहाजी राजे यांची पुण्यतिथी व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली.

**राष्ट्रीय मतदार दिन**

दि. २५ जानेवारी २०२० रोजी महात्मा फुले महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वसंत बिरादार हे होते. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी.डी. चिलगर यांनी केले. या प्रससंगी प्रा. डॉ. पी. पी. चौकटे यांनी मार्गदर्शन केले तसेच राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त अहमदपूर शहरातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले व 'मतदार राजा हो लोकशाहीचा धागा हो' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

**प्रजासत्ताक दिन**

दि. २६ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयाने ७१ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यानंतर एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रांगणात श्रमदान केले.

महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन

दि. ३० जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयाने महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन साजरा केला. या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. पी.डी. चिलगर यांनी मार्गदर्शन केले तर अध्यक्ष समारोप प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी केला. या प्रसंगी दोन मिनिटे स्तब्ध राहून हुतात्म्यांना श्रद्धाजंली देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूजा देशमुख केले तर आभार सुरज पवार यांनी मानले.

दि. १७ फेब्रुवारी २०१९ रोजी संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने महाविद्यालय परिसरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १६ ते २२ फेब्रुवारी २०२० दरम्यान मौजे ब्रह्मपुरी येथे विशेष युवक शिबीर घेण्यात आले.

दि. १९ फेब्रवारी २०२० रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्सहाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने अहमदपूर शहरातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी 'मराठी राजभाषा दिन' साजरा करण्यात आला.

दि. ०८ मार्च २०२० रोजी जागतिक महिला दिनानिमीत्त सामाजिक प्रश्न स्त्रीभ्रूण हत्या आदि विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करुन महिला दिन साजरा करण्यात आला. दि. १० मार्च २०२० रोजी स्त्री शिक्षणाच्या अग्रदूत सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

दि. २३ मार्च २०२० रोजी सरदार भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शहीद दिन साजरा करण्यात आला. या सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील होते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२० या महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाने राष्ट्रीय व सामाजिक उत्तरदायित्त्व लक्षात घेऊन पर्यावरण, आरोग्य आदि जनजागरण रॅलीसह परिसर व शहरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून श्रमदानाचे कार्य 'नॉट मी बट यू' या ब्रीद वाक्यानुसार कार्य केले. तसेच रा. से. यो. च्या उद्दिष्टानुसार छोट्या मोठ्या अने उपक्रमात महाविद्यालयाचे रा. से. यो. चे कार्य सुरळीतपणे सुरू आहे. हे कार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मा. विद्यापीठाचे रा.से.यो. संचालक डॉ. शिवराज बोडके, प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. संतोष पाटील, सल्लागार समितीचे सर्व पदाधिकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रा. से. यो. च्या विद्यार्थ्यांचे सहकार्य महत्त्वपूर्ण आहेच. आपल्या सहकार्या शिवाय हे कार्य पूर्णत्वास जाऊ शकत नाही.

**डॉ. पांडुरंग चिलगर**
कार्यक्रमाधिकारी

# Department of Library
# Annual Report 2019-20

Library is a 'Heart' of the College. Teaching and learning system are supported by library through reading material. College Central Library has established in 2000 for students as well as for faculty members. Library is well prepared with reference books, textbooks, journals, periodicals and newspapers etc.

In this academic year **2019-20** library has taken a various orientation programme to the library users. This year we have arrange the programme of first year students i.e. **welcomes to new admit first year students in the college. Library has celebrated birth anniversary of Dr.S.R.Ranganathan**. Also on the special vocation, we have arranged the books exhibition. Library has organized the orientation to new users for use of library and library services; give the information about the library rules and regulations. This academic year library has purchased **375** books and **146 books are donated**. Total collections of books are **8772**.In this academic year **15** periodicals are subscribed for one year and Ten newspapers are purchased for library. Also 323 users are using the library reading materials in this year. Library has launched last three years book bank scheme, scholar student card and demand on books these services are given by the library. Library is also started new "**Wachan sanskrati samrudhi yojana**". Library has giving Current awareness service, newspaper clipping service, and SMS alert service on what's up for primary using for only teachers.

**Following services are provided by the library:**

- Reference services
- Circulations.
- User orientation and information literacy.
- Reading room.
- Newspaper clipping service.
- Inter library loan.
- Wachan sanskrati samrudhi yojana

**Library staff:**

Following library staff is available for the users.

| | |
|---|---|
| Mr. P.M. Ingle | (Librarian) |
| Mr.W.K. Malkapure | (Lib. Attended) |

**Library advisory committee**

| | |
|---|---|
| Dr. Vasant Biradar | {President} |
| Mr. P.M. Ingle | {Secretary} |
| Dr. B.K. More | {Member} |
| Mr. A.C. Akade | {Member} |
| Mr. A.S. Murmure | {Member} |
| Mr. V.S. Vibhute | {Member} |

**Mr. Parmeshwar Ingle**
Librarian

# क्रीडा विभाग
## वार्षिक अहवाल २०१९-२०

१) 'ब' झोन तलवारबाजी (मुली) स्पर्धेत मुलीचा संघ 'बी' झोन मध्ये पहिला.

२) आतर महाविद्यालयीन रस्सीखेच (मुली) स्पर्धेत मुलीचा संघ द्वितीय.

३) आंतर महाविद्यालयीन रस्सीखेच (मुले) स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ तृतीय.

४) 'ब' विभाग मैदानी स्पर्धेत
कु. अंजू वाघमारे – तृतीय १०० मी. धावणे
कृष्णा राठोड – तृतीय हतोडा फेक

५) कु. शीतल लांडगे – आंतर महाविद्यालयीन १०० मी. फ्री स्टाईल व १०० मी. बॅकस्टॉक स्पर्धेत द्वितीय.

६) 'ब' झोन आंतर महाविद्यायीन स्पर्धेत
कृष्णा राठोड – सेबर प्रकारात – तृतीय
कु. कुसुम देमगुंडे – इप्पी प्रकारात – तृतीय
कु. वैष्णवी सोनवणे – सेबर प्रकारात – द्वितीय
शुभम गुजरंगे – सेबर प्रकारात – तृतीय
कु. प्रियंका सोनकांबळे–सेबर प्रकारात – तृतीय
कु. अंजू वाघमारे – सेबर प्रकारात – तृतीय
कु. वैष्णवी भुतके – सेबरे प्रकार – तृतीय

७) महाविद्यालयाची नेटबॉल मुलांचा संघ तृतीय
आंतर विद्यापीठे / क्रीडा महोत्सव खेळाडू सहभाग

१) कु. नेहा गुंडरे – हॅन्डबॉल – अहिल्या देवी होळकर विद्यापीठ, सोलापूर.

२) कु. कुसुम देमगुंडे हॅन्डबॉल – अहिल्या देवी होळकर विद्यापीठ, सोलापूर.

३) शुभम गुंजरगे – तलवारबाजी – जम्मू विद्यापीठ जम्मू.

४) कु. कुसुम देमगुंडे – तलवार बाजी – पंजाबी विद्यापीठ, चंदीगड.

५) कु. वैष्णवी भुतके – तलवार बाजी – पंजाबी विद्यापीठ, चंदीगड.

६) कु. अंजू वाघमारे – तलवार बाजी – पंजाबी विद्यापीठ, चंदीगड.

७) कु. प्रियंका सोनकांबळे – तलवार बाजी – पंजाबी विद्यापीठ, चंदीगड.

८) सुरज सोनकांबळे – नेटबॉल – कालिकत विद्यापीठ, कालिकत.

९) कृष्णा राठोड – नेटबॉल – कालिकत विद्यापीठ कालिकत.

महाविद्यालयाने आयोजित

महाविद्यालयात 'योगादिवस' साजरा केला.

महाविद्यालयात 'ब' विभाग मुले – मुलींचा तलवार बाजी स्पर्धेचा कॅम्प आयोजित.

महाविद्यालयात नेटबॉल मुलांच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजीत.

महाविद्यालयात नेटबॉल मुलाचा आंतर महाविद्यालायात नेटबॉल (मुले) याचा सराव शिबीर आयोजीत केले.

महाविद्यालायत 'ध्यानचंद' भिती पत्रकाचे विमोचन करण्यात आले.

**डॉ. अभिजीत मोरे**
प्रमुख, क्रीडा विभाग

# गांधी विचार संस्कार परीक्षा केंद्र
# २०१९-२०२०

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून दरवर्षी महात्मा फुले महाविद्यालयामध्ये गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगावच्या गांधी विचार संस्कार परिक्षेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये गांधीजींचे तत्वज्ञान व विचार रुजविण्याच्या उद्धात्त ध्येयाने प्रेरीत होऊन ही परीक्षा महावनिद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजीत केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये गांधी विचार संस्कार परीक्षेसाठी आमच्या महाविद्यालयातील बी.ए. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष, इयत्ता ६वी व इयत्ता १२वी या वर्गात शिणारे ४० विद्यार्थी बसले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या एक दिवस अगोदर दि. ०१.१०.२०१९ रोजी गांधी विचार संस्कार परीक्षा महाविद्यालयात घेण्यात आली. या परीक्षेमध्ये आविष्कार वसंतराव बिरादार हा विद्यार्थी इयत्ता १२वी मध्ये लातूर जिल्ह्यात सर्व प्रथम आला व गोल्ड मेडल प्राप्त केले. तसेच इयत्ता ६वी मध्ये कु. श्रेया नागराज मुळे या विद्यार्थीनीने लातूर जिल्ह्यात सर्वप्रथम येऊन गोल्ड मेडल मिळविले. या दोन्ही विद्यार्थ्यांचा मिळालेल्या यशाबद्दल प्रमाणपत्र व गोल्ड मेडल देऊन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्याहस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. सर्व यशस्वी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. व जीवनात महात्मा गांधींचे तत्वज्ञान अनुसरण्याचा संदेश दिला गेला.

तसेच गांधी विचार संस्कार परीक्षेचे समन्वयक प्रा. डॉ. बब्रुवान मोरे यांना गांधी विचार रिसर्च फाऊंडेशन जळगावचे प्रशस्तीपत्र देऊन व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांना गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगावचे सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

गांधी विचार संस्कार परीक्षेत आविष्कार वसंतराव बिरादार व कु. श्रेया नागराज मुळे या विद्यार्थ्यांनी लातूर जिल्ह्यात प्रथम येऊन दोन गोल्ड मेडल प्राप्त केले. यामुळे महात्मा फुले महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला.

Dept Of Polticaql Science Annual Report 2019 - 2020
Student Strength

B.A. First Year

| Sr. No. | Category | Mate | Female | Total |
|---|---|---|---|---|
| 1. | Open Students | 12 | 10 | 22 |
| 2. | O.B.C. Students | 15 | 15 | 30 |
| 3. | S.C. Studenmts | 13 | 08 | 21 |
| | **Total Students** | **40** | **33** | **73** |

B.A. Second Year

| Sr. No. | Category | Mate | Female | Total |
|---|---|---|---|---|
| 1. | Open Students | 04 | 04 | 08 |
| 2. | O.B.C. Students | 05 | 03 | 08 |
| 3. | S.C. Studenmts | 03 | 04 | 07 |
| | **Total Students** | **12** | **11** | **23** |

B.A. Third Year

| Sr. No. | Category | Mate | Female | Total |
|---|---|---|---|---|
| 1. | Open Students | 06 | 04 | 10 |
| 2. | O.B.C. Students | 07 | 09 | 16 |
| 3. | S.C. Studenmts | 04 | 02 | 06 |
| | **Total Students** | **17** | **15** | **33** |

**डॉ. बब्रुवान मोरे**
समन्वयक,
गांधी विचार संस्कार परीक्षा

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

महाराष्ट्र लोक सेवा आयोग (M.P.S.C.) व भारतीय लोकसेवा आयोज (U.P.S.C.) यांच्या परीक्षा महाविद्यालतील विद्यार्थ्यांनी द्याव्यात व देशसेवा करण्याचे महान कार्य विद्यार्थ्यांनी करावे यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र मागील दहा वर्षापासून कार्यरत आहे.

तळागाळातील मजुरांची, कामगारांची व शेतकऱ्यांची मुले राजपत्रित अधिकारी व्हावेत, म्हणून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग यशस्वी वाटचाल सातत्याने करीत आहे.

S.R.P.F. हिंगोलीचे I.P.S. अधिकारी कमांडट श्री मंजकजी इप्पर यांच्या हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३.०८.२०१९ रोजी भव्यदिव्य स्वरुपाचा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा उद्‌घाटन सोहळा पार पाडत अहमदपूर तालुक्याचे भूमीपुत्र असलेले श्री इप्पर साहेब यांनी आपली यशोगाथा सांगून विद्यार्थ्यांना M.P.S.C. व U.P.S.C. करण्यात प्रेरीत केले यावेळी स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख डॉ. बब्रुवान मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्याचा मंत्र दिला व स्पर्धा परीक्षेसाठी समृद्ध असलेल्या ग्रंथालयाचा वापर करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

दिनांक ०७.०९.२०१९ पासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे दर शुक्रवारी व शनिवारी दुपारी ३.०५ ते ३.५५ दरम्यान हॉल क्रमांक १५ मध्ये तासिका सर्व प्राध्यापकांनी घेण्यास सुरुवात केली. आमच्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त प्राध्यापक S.E.T. व N.E.T. परीक्षा उत्तीर्ण असून Ph.D. प्राप्त केलेले आहेत. कठोर मेहनत करुन सर्व प्राध्यापक स्पर्धा परीक्षा केंद्राच्या मोफत तासिका घेतात व विद्यार्थ्यांना M.P.S.C. परीक्षा देण्यासाठी प्रेरीत करतात, याचा फायदा ग्रामीण भागातील मुलांना होतो. आज आमचे विद्यार्थी केंद्र सरकार व राज्य सरकारमध्ये विविध पदावर कार्यरत असून त्यांनी महात्मा फुले महाविद्यालयाचे नाव रोशन केलेले आहे.

स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे वर्षाच्या शेवटी, फेब्रुवारी महिन्यात M.P.S.C. च्या धर्तीवर परीक्षा घेण्यात येते. कॉलेज आयडॉल परीक्षेत मराठी, हिन्दी, इंग्रजी, इतिहास, संस्कृत, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, राज्यशास्त्र, क्रीडा इत्यादी परीक्षा घेतली जाते, या परीक्षेत सर्वोच्च मार्क घेणारा विद्यार्थी 'कॉलेज आयडॉल' म्हणून घोषीत केला जातो.

या वर्षी बी.ए. तृतीय वर्षातील कु. अंजली शेकडे या बुद्धिमान विद्यार्थीनी कॉलेज आयडॉल पद पटकावले. या विद्यार्थीनीचा प्रमाणपत्र, मोमेंटो, शाल व पुष्पहार देवून प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी सत्कार केला.

या वर्षी दिनांक १३.०३.२०२० रोजी आय.ए.एस. (I.A.S.) अकॅडेमी सातव साहेब व प्रा. किशनराव घाळगीर यांचे विशेष मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले व त्यांनी विद्यार्थ्यांना M.P.S.C. व U.P.S.C. संदर्भात यथोचित मार्गदर्शन केले.

यावर्षी दिनांक ११.०३.२०२० रोजी आय. ए. एस. अकॅडमी पुणे व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र महात्मा पुले महाविद्यालय, अहमदपूर यांच्यात M.P.S.C. व U.P.S.C. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'कोलॅबरेशन' करण्यात आले व विविध प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले.

आमच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात अभ्यास केले असंरथ विद्यार्थी विविध उच्च पदावर कार्यरत आहेत.

**डॉ. बी.के. मोरे**
प्रमुख, स्पर्धा परीक्षा विभाग

# छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र, वार्षिक अहवाल २०१९-२०२०

महात्मा फुले महाविद्यालयात, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या कल्पकतेतून, किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या परवानगीने छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राची स्थापना दिनांक ०६.०२.२०१९ रोजी करण्यात आली. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या हस्ते रीतसर इतिहास विभागात या अध्यासन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले व डॉ. बब्रुवान मोरे यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे वर्षभर अनेक उपक्रम राबविले गेले ते पुढील प्रमाणे आहेत.

**१) वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन**

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वशैलीचा विकास करण्यासाठी मा. प्राचार्य साहेबांच्या मार्गदर्शनानुसार दि. १६.९.२०१९ रजी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयजन करण्यात आले. या स्पर्धेत विकील सुभाष विभुते प्रथम, कु. मनाली प्रल्हाद अंभोरे द्वितीय, तर गणेश मोहन नरवटे व सूरज अनिल पवार यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

**२) निबंध स्पर्धेचे आयोजन**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेचे धडे देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे ‘राष्ट्रीय एकात्मा’ या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत कु. मकापल्ले राणी माधव प्रथम क्रमांक, कु. गवळे निकीता गणेश आणि कु. शेख समरीन खाजामीया यांनी द्वितीय क्रमांक तर कु. अंभोरे मनाली प्रल्हाद या विद्यार्थीनीने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

**३) अहमदपूर शहरात शिवजन्मोत्सवाचे भव्य आयोजन**

छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे दिनांक १९.२.२०२० रोजी महात्मा फुले परिवारातर्फे शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. शिवजन्मोत्सव कार्यक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. वसंत बिरादार, आमदार बाबासाहेब पाटील, संस्थेचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित होते.

भव्यदिव्य देखाव्यांद्वारे अहमदपूर शहरात दिवसभर शिवजन्मोत्सवाची शोभायात्रा काढण्यात आली. महात्मा फुले महाविद्यालयाचा राष्ट्रीय एकात्मतेचा व सर्वधर्मसमभावाचा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

**४) विविध उपक्रमांचे आयोजन**

छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे गरीब व होतकरु मुलांना शैक्षणिक मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षेचे तयारी, ऐतिहासिक सहलींचे आयोजन, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना इतिहास विषयाबरोबरच महामानवांचा आदर्श समजावला जातो.

**५) अध्यासन केंद्राचे स्वतंत्र वाचनालय**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या अभिनव कल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे गरीब व होतकरु बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनालय सुरु करण्या आले

आहे. या अध्यासन केंद्राला पुस्तके भेट देण्यासंदर्भात प्राचार्यांनी व संचालकांनी आवाहन केले . यानुसार डॉ.चेरेकर मधुसूदन यांनी ४१ ग्रंथ भेट देवून सुरुवात केली. तसेच संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा येथील ग्रंथपाल प्रा. राजेश गोरे यांनी २० हजार रुपयांचे ८६ ग्रंथ महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे भेट स्वरुपात दिले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी ग्रंथ भेट दिले. सर्वांच्या ग्रंथ भेटीमुळे ग्रंथसंख्या ७५० झालेली आहे. वर्षाअखेर ही ग्रंथ संख्या १५०० पर्यंत नेण्याचा मा. प्राचार्यांचा मानस आहे.

अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे स्वतंत्र वाचनालय चालवणारे स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड मधील असलसेल्या महाविद्यालयांमधून एकमेव अध्यासन केंद्र आहे.

**डॉ. बब्रुवान मोरे**
संचालक,
छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र

# करिअर गाईडन्स सेल
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

महात्मा फुले महाविद्यालयत इ.स. २००९ पासून 'करीअर गाईडन्स सेल' ची स्थापना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या कल्पकतेतून झाली. महाविद्यालयातील मुलांना पदवीनंतर कोणकोणत्या क्षेत्रात करीअर करता येते याची जाणीव ग्रामीण भागातील मुलांना नसते, याचसाठी हा विभाग सतत काम करती आहे.

करीअर गाईडन्स सेल सतत स्पर्धा परीक्षा विभागाच्या समन्वयातून अनेक, उपक्रम राबविले व विद्यार्थ्यांना नोकरीच्या नवीन संधी उपलब्ध करुन देते. राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्यातर्फे निघालेल्या नवीन नोकरीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यातयेते.

याच बरोबर विद्याथ्यार्नां वैयक्तिक मुलाखती कशा द्यावा्यात यासाठी 'मॉक इंटरव्यूव्ह' घेतले जातात. आज सर्वच क्षेत्रात महाविद्यालयाचे विद्यार्थी कार्यरत असून यामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक झालेला आहे. आमचे विद्यार्थी कार्यरत असून यामुळे महाविद्यालयाचा नावलौकिक झालेला आहे. आमचे विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, पोलीस विभाग, मिलीट्री विभाग, रेल्वे विभाग, महाराष्ट्र मंत्रालय, टेलिव्हीजन, पत्रकार, राजकारण, लेखक - कवी सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत.

**डॉ. बी.के. मोरे**
संचालक, करिअर गाईडन्स सेल

# सांस्कृतिक विभाग
# वार्षिक अहवाल २०१९-२०२०

सांस्कृतीक विभाग हा महात्मा फुले महाविद्यालयातील सर्वात महत्ताचा विभाग आहे. या विभागातर्फे वर्षभर विविध उपक्रमांचे व कार्यक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना दिली जाते. या विभागातर्फे २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम राबवून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कार्यक्रम घेण्यात आले ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या 'विकास - २०१९ युवक महोत्सवात' सहभाग -

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या विकास - २०१९ युवक महोत्सवात महात्मा फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात भाग घेऊन छाप पाडली. वक्तृत्व, वादविवाद, मूकाभिनय, विडंबन, एकांकिका, रांगोळी, चित्रकला इत्यादी युवक महोत्सवातील स्पर्धांमध्ये दमदार भाग नोंदवून प्रबोधनात्मक कार्य केले. तसेच शोभायात्रेत 'राष्ट्रीय एकात्मता' देखावा सादर करुन सर्वांचे लक्ष वेधले.

२) नेहरु युवा केंद्र अहमदपूरच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व आपल्या वक्तृत्वाची छाप निर्माण करुन महाविद्यालयाला लौकिक प्राप्त करुन दिला.

३) जोडीदाराची विवेकी निवड कार्यक्रम -

अंधश्रद्धत निर्मूलन समिती अहमदपूर व महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमान जोडीदाराची विवेकी निवड हा कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी साधन व्यक्ती कोल्हापूर व मुंबई येथून आली होते. त्यांनी तरुण विद्यार्थ्यांना भविष्यात जोडीदाराची विवेकीपणे कशी निवड करावी याचे यथोचीत मार्गदर्शन केले.

४) 'कारगिल विजय दिन' निमीत्ताने

'उरी द सर्जीकल स्ट्राईक' हा चित्रपट दिनांक २६.०७.२०१९ रोजी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मा. प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली लक्ष्मी चित्रपटगृह, अहमदपूर येथे मोफत दाखविण्यात आला. या चित्रपटासाठी सर्व प्राध्यापकांची सुद्धा उपस्थिती होती. या चित्रपटाद्वारे देशभक्तीचे धडे विद्यार्थ्यांना दिले गेले.

५) विविध जयंत्या व पुण्यतिथीयांचे आयोजन -

महात्मा फुले महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे विविध जयंत्या व स्मृती दिनांचे आयोजन केले जाते. माननीय प्राचार्यसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले परिवारातर्फे अहमदपूर शहरात शोभायात्रा काढून शिवजयंती साजरी करण्यात आली. या 'शिवजयंती महोत्सवात' सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचे अनेक कार्यक्रम घेण्यात आले.

महात्मा पुले जयंती, हुतात्मा दिन, छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन, शहीद दिन, महात्मा गांधी जयंती, डॉ. बाबासाहेब, आंबेडकर जयंती, बिरसा मुंडा जयंती स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता

जिजाऊ जयंती, सावित्रीबाई फुले जंयती, शहाजीराजे जयंती अण्णाभाऊसाठे जयंती, लालबहादूर शास्त्री जयंती अशा अनेक जयंत्या व पुण्यतिथी यांचे आयोजन सांस्कृतिक विभागातर्फे होते.

**६) विविध कार्यक्रमांचे आयोजन** –

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध वाद–विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयत्यावेळच भाषण रांगोळी स्पर्धा, बी.ए. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम, बी.ए. तृतीय वर्ष विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन सांस्कृतिक विभागातर्फे करण्यात आले व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला.

**डॉ. बब्रुवान मोरे**
प्रमुख, सांस्कृतिक विभाग

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेऊन महाराष्ट्रातील घराघरात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र सन २०११–२०१२ पासून या महाविद्यालयांमध्ये कार्यरत आहे. अल्प काळामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रात प्रवेश घेतलेला आहे.

मुक्त विद्यापीठाच्या अभ्यास केंद्रात पूर्वतयारी, बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्गाचे अभ्यासक्रम चालू आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून एम. ए. (मराठी) अभ्यासक्रम सुरू झालेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये जवळपास ५३७ इतक्या विद्यार्थ्यांनी अभ्यास केंद्रात प्रवेश घेतलेला आहे.

पूर्वतयारी वर्गातून प्रवेश घेतलेल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणातून नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. पदवी वर्गात मराठी,हिंदी, इंग्रजी,इतिहास,समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र विषय शिकण्याची सोय आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे
वैयक्तिक लक्ष देऊन मार्गदर्शन केले जाते.

**प्रा.डॉ.अनिल मुंढे**
केंद्र संयोजक
**प्रा. डॉ. संतोष पाटील**
केंद्र सहाय्यक